म. ग्रं. सं. ठाणें
विषय निबंध
सं. नं. ८५१८

# मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.

संग्रहालय/वाचनालय शाखा.

| | | |
|---|---|---|
| अनुक्रम नं. | विभाग निबंध | क्रमांक ८५१८ |

पुस्तकाचें नांव नवे मुशाफिर.

लेखक श्री. २१८५

**सूचना**—पुस्तक आठ दिवसांवर ठेवूं नका पुस्तकाची खराबी करूं नका.

REFBK-0005978

# नवे मुशाफिर

( विविध लेख संग्रह )

REFBK-0005978

**संपादक**

गोविंद भिकाजी रानडे
नरहर विठ्ठल घारपुरे

मराठी ग्रंथप्रकाशन, पुणें

[ पुष्प १ लें

—प्रकाशक—

का. रा. भालेराव

मराठी ग्रंथप्रकाशन

२३९ सदाशिव पेठ, पुणें २.

दुसऱ्या आवृत्तीचे सर्व हक्क
प्रकाशकाचे स्वाधीन.

किंमत सव्वा रुपया

बालकृष्ण

रि

~~निबंध २५२~~

स. नि. ६५४

महाराष्ट्रांतील

नियतकालिकांच्या

संपादकांस

अर्पण

# नवे मुशाफिर

पुरोगामी वाङ्मय मंडळ,
पुणे.

ह. वि. वाडेकर

र. गं. विद्वांस

गो. भि. रानडे

न. वि. घारपुरे

ज. वा. भिडे

दु. का. संत

भी. त्रिं. ढेकणे

अ. प्र. गाडगीळ

द. स. दरेकर

वि. प्र. महाजन

वि. त्र्यं. गर्दे

दि. मो. हातवळणे

वि. ग. भिडे

शा. ल. वर्वे

# पुणेंकडे !

सर्वच मुंबईकर ' प्रो. ज्यांडी ' नसतात, सारे मालवणी थापेबाज नसतात सगळेच नागपुरिये 'हिंसावादी' नसतात; त्याप्रमाणेंच पुणेकर झाले तरी सर्वच बुरसट नसतात—इतकेंच नव्हे तर इतर गांवकऱ्यांनीं बुरशीचें माहेरघर ठरविलेल्या सदाशिव पेठेंत सुद्धां जिवन्त, ताज्यातवान्या व टवटवीत वृत्तीची जवान मंडळी आहेत—याची साक्ष हा लहानसा लेखसंग्रह देईल. महाराष्ट्राच्या कडेपठारांइतक्याच डोंगराळ अशा मराठी वाङ्मय प्रदेशांत ' आगे बढो ! ' या स्फुर्तिदायक ध्येयवाक्याचें निशाण घेऊन, मोहिमेवर निघालेला हा आणखी एक काफिला आहे. ' पुढें ! ' अशी पुकार करून, वाङ्मय प्रदेशांतच काय पण हव्या त्या प्रांतांत घुसण्यास तयार असणारे काफिले ( व एकटे मुशाफिरही ) आमच्या पुण्यांत वरचेवर निपजतात. ते वेगवेगळ्या संस्थांच्या आणि व्यक्तींच्या नांवांनीं महाराष्ट्राला परिचितच आहेत. त्यांच्यापैकींच कित्येकांच्या पुच्छप्रगतीमुळें पुण्याच्या सदाशिव पेठेचा बाहेर इतका बोभाटा झाला असावा. पुढें जाणारा म्हणून एकादा चढणीचा व चिखलाचा रस्ता निवडावा, डोक्यावर तरंगणाऱ्या पगडीचा तोल सांभाळीत, उपरण्याचीं टोंकें टांग्याच्या चाकांत सांपडून गळफांस लावतील कीं काय अशी धाकधूक करीत, तीं टोंकें, लाँगकोटाचे कोपरे, ढिल्या धोतराचा घोळ नि छत्रीच्या बंडखोर काड्या हा सर्व पसारा काबूत ठेवीत, पुणेरी जोडा घालून, ती ( कित्येकदा स्वतःच निसरडी केलेली ) चढणीची वाट चालण्याचा प्रयत्न करावा, आणि अशा प्रयत्नानें एक पाऊल पुढें चालतांना दीड पाऊल मागें घसरण्याचें गणित अंकशः सिद्ध करावें—या चालीवर ज्यांनीं गेल्या तीस वर्षांत पुण्यांत इतिहास केला, त्या महानुभावांनींच ' सदाशिव पेठी ' हा दरीवाचक शब्द मराठी भाषेला मिळवून दिला. स्वास्थ आणि विश्राम या सोई आमच्या गांवीं असल्यामुळें, बाहेर गांवाहून जरा-सैन्याच्या ज्या नवनव्या तुकड्या

अव्यहितपणें पुण्यांत येऊन मोर्चे बांधीत असतात, त्यांनींच 'सदाशिव पेठ' या 'जुन्या तिनक्या सनातनी' संप्रदायाला येथें जिवंत ठेवलें आहे. यांपैकी कांहीं पोटाला मिळवण्याची निकड पेन्शनीनें किंवा स्थावर इस्टेटीनें अगोदरच भागलेली असल्यामुळें, त्यांना रिकामपण भरपूर असतें. अशा रिकामपणीं या लोकांना जीवनांत —विशेषतः दुसऱ्याच्या जीवनांत एक हौशी पण जर्जर अशी गोडी—गोडी कसली करपट कुतूहल वाटतें; या कुतुहलाचें आपापसांत व्याख्यान करतांना, प्रतिष्ठित भाषेंत लेखनाच्या वा भाषणाच्या द्वारें जरा पुढारी जो विचारसरणी जाहीर करतात तिलाच बाहेरगांवचे लोक 'सदाशिव पेठी' म्हणत असावेत.

हा सदाशिव व तत्सम पेठांच्या तरुण पिढीला मोठा अन्याय आहे हें परस्थांच्या लक्ष्यांत येणें जरूर आहे. पुणें शहरांत चिखली रस्ते जाऊन डामरी रस्ते आले, त्याप्रमाणेंच त्या डामरी रस्त्यावरून वावरणारी नवी पिढीही आली. आतां रस्त्यावरचें डामर वाळण्याआधींच त्यावरून चौखूर दौडत, 'पुढें चाललो !' 'तुफान निघालों !' 'पोहोचलोंच !' असा महाशब्द करीत सोसाटणारे (व लोळण घेणारे) तरुणही इथें सांपडतील, पण ते बाहेरगांवीं असतात तितक्याच प्रमाणांत; एरवीं आमची तरुण मंडळी इतर चार गांवांच्या तरुणांइतकीच मानवी आहे. त्यांच्या आशा—आकांक्षा, त्यांचे विचार व मार्ग सर्वसामान्य असेच आहेत; तेव्हां 'सदाशिवपेठी' या 'सजरामर' विशेषणाची पगडी आमच्या तरुण पिढीला घालणें चुकीचें ठरेल.

या कारवानातले नवे मुशाफिर बहुतेक पांढरपेशा मध्यम वर्गांतले आहेत. या थरांतल्या मुलांना इतरांच्या मुलांपेक्षां एक फायदा असा मिळालेला असतो, कीं त्यांची जीवनाशीं लढाई लहानपणींच सुरू होत नाहीं; शिक्षणामुळें त्यांच्या विचारांना योग्य दिशा लाभण्याची संधी असते, व कुटुंबाच्या आर्थिक आधारामुळें, श्रमांचा सौदा योग्य किंमतीला होईपर्यंत त्यांना पुष्कळदा सवड मिळूं शकते.

मध्यमस्थितीचा आणखी एक फायदा हा कीं, अखेर पोट भरण्याचें साधन म्हणून कां होईना, किमान शिक्षण घेण्याची निकड मुलांच्या आपोआपच मागे असते. त्यामुळें सुरक्षित बालपणाबरोबरच थोडीशी ज्ञानाची शिदोरी, अशा भक्कम तयारीनें त्यांना जीवनकलहाला तोंड देण्यास उभें राहतां येतें. उत्साह, भावनाशीलता आत्मनिवेदनक्षमता—व फुरसत हे गुण या वर्गाच्या तरुणांजवळ भरपूर प्रमाणांत असतात. या कारणांनीं -व लेखनसाहित्यही सवंग असल्यामुळें—बहुसंख्य लेखकांचा पैदास याच वर्गांतून होत असलेली आपण पाहतो. सामाजिक विषमते-मुळें वाटणारी अस्वस्थता, पीडितांबद्दल कळकळ व परिस्थिति सुधारण्यासाठीं निकड, अशा भावना मुलें वयांत येतांयेतां त्यांना साहाजिकच सतावूं लागतात, आणि लेखनाच्या रूपानें त्या व्यक्त होतात. या सर्वसामान्य निसर्गक्रमाला अनु-सरून पृथ्वीच्या पाठीवरील पुण्याएवढ्या कुठल्याही शहरच्या सभ्य, सालस, व प्रतिष्ठित कुटुम्बांतील निरोगी प्रवृत्तींच्या तरुणांनीं ज्या धर्तीचे लेख लिहिले असते त्याच धर्तीचे लेख प्रस्तुत संग्रहांत वाचकांना आढळतील.

एकदोन दुःखान्त व चारपांच सुखान्त लघुकथा, दोनतीन निबन्ध, एकादा विनोदी लेख, असें विविध वाङ्मय येथें जमविलेलें आहे. हे वेगवेगळे वाङ्मय-प्रकार हाताळणाऱ्या लेखकांवर सध्यांच्या वेगवेगळ्या लोकप्रिय लेखकांची छाप पडल्याचें प्रथमदर्शनीच दिसून येईल. ज्याअर्थीं या होतकरू लेखकांचे आदर्श जे सध्याचे लोकप्रिय लेखक ते पुरोगामी म्हणून प्रसिद्ध आहेत, त्याअर्थीं या घोळक्यांतील त्यांचा छात्रवर्गहि त्यांच्या अनुकरणापुरता तरी पुरोगामी असावा—निदान तशा प्रकारच्या पुरोगमनाची धडपड पुढील पानांतून व्यक्त होते हे खास. पण थोरांच्या अनुकरणाखेरीज, खंबीर आशावाद, दुःखितांचा कळवळा, अन्या-याची चीड, बांधवांच्या सुधारणेची तळमळ, बुद्धिप्रामाण्याची कसोटी लावून जीवनाकडे पाहण्याचा यत्न करणारी शास्त्रीय दृष्टी, इत्यादि गुणांचेहि स्वतंत्र पुरावे या संग्रहांत ठिकठिकाणीं मिळतील. 'जरीचें पातळ' किंवा 'चन्दनाचें खोड' या कथांतून जिव्हाळा व निवेदनचातुर्य हे गुण दिसून येतात; 'माणसं जगतात कशासाठीं?' या बोधप्रद निबन्धांत तत्त्वशोधक दृष्टि आढळते, तर 'माझा

अत्यहितेपणें पुण्यांत येऊन मोर्चे बांधीत असतात, त्यांनीच 'सदाशिव पेठ' या 'जरूर तितक्या सनातनी' संप्रदायाला येथें जिवंत ठेवलें आहे. यांपैकी कांही पोटाला मिळवण्याची निकड पेन्शनीनें किंवा स्थावर इस्टेटीनें अगोदरच भागलेली असल्यामुळें, त्यांना रिकामपण भरपूर असतें. अशा रिकामपणीं या लोकांना जीवनांत —विशेषतः दुसऱ्याच्या जीवनांत एक हौशी पण जर्जर अशी गोडी—गोडी कसची करपट कुतुहल वाटतें; या कुतुहलाचें आपापसांत व्याख्यान करतांना, प्रतिष्ठित भाषेत लेखनाच्या वा भाषणाच्या द्वारें जरा पुढारी जी विचारसरणी जाहीर करतात तिलाच बाहेरगांवचे लोक 'सदाशिव पेठी' म्हणत असावेत.

हा सदाशिव व तत्सम पेठांच्या तरूण पिढीला मोठा अन्याय आहे हें परस्थांच्या लक्ष्यांत येणें जरूर आहे. पुणें शहरांत चिखली रस्ते जाऊन डामरी रस्ते आले, त्याप्रमाणेंच त्या डामरी रस्त्यावरून वावरणारी नवी पिढीही आली. आतां रस्त्यावरचें डामर वाळण्याआधींच त्यावरून चौखूर दौडत, 'पुढें चाललो!' 'तुफान निघालों!' 'पोहोचलोंच!' असा महाशब्द करीत सोंसाटणारे (व लोळण घेणारे) तरूणही इथें सांपडतील, पण ते बाहेरगांवी असतात तितक्याच प्रमाणांत; एरवीं आमची तरूण मंडळी इतर चार गांवांच्या तरूणांइतकीच मानवी आहे. त्यांच्या आशा—आकांक्षा, त्यांचें विचार व मार्ग सर्वसामान्य असेच आहेत; तेव्हां 'सदाशिवपेठी' या 'सजरामर' विशेषणाची पगडी आमच्या तरुण पिढीला घालणें चुकीचें ठरेल.

या कारवानातले नवे मुशाफिर बहुतेक पांढरपेशा मध्यम वर्गांतले आहेत. या थरांतल्या मुलांना इतरांच्या मुलांपेक्षां एक फायदा असा मिळालेला असतो, कीं त्यांची जीवनाशीं लढाई लहानपणींच सुरू होत नाहीं; शिक्षणामुळें त्यांच्या विचारांना योग्य दिशा लाभण्याची संधी असते, व कुटुंबाच्या आर्थिक आधारामुळें, श्रमांचा सौदा योग्य किंमतीला होईपर्यंत त्यांना पुष्कळदा सवड मिळू शकते.

मध्यमस्थितीचा आणखी एक फायदा हा कीं, अखेर पोट भरण्याचें साधन म्हणून कां होईना, किमान शिक्षण घेण्याची निकड मुलांच्या आपोआपच मागे असते. त्यामुळें सुरक्षित बालपणाबरोबरच थोडीशी ज्ञानाची शिदोरी, अशा भक्कम तयारीनें त्याना जीवनकलहाला तोंड देण्यास उभें राहतां येतें. उत्साह, भावनाप्रवीणता आत्मनिवेदनक्षमता—व फुरसत हे गुण या वर्गाच्या तरुणांजवळ भरपूर प्रमाणांत असतात. या कारणांनीं -व लेखनसाहित्यही सवंग असल्यामुळें—बहुसंख्य लेखकांचा पैदास याच वर्गांतून होत असलेली आपण पाहतो. सामाजिक विषमते-मुळें वाटणारी अस्वस्थता, पीडितांबद्दल कळकळ व परिस्थिति सुधारण्यासाठीं निकड, अशा भावना मुलें वयांत येतांयेतां त्यांना साहाजिकच सतावूं लागतात, आणि लेखनाच्या रूपानें त्या व्यक्त होतात. या सर्वसामान्य निसर्गक्रमाला अनु-सरून पृथ्वीच्या पाठीवरील पुण्याएवढ्या कुठल्याही शहरच्या सभ्य, सालस, व प्रतिष्ठित कुटुम्बांतील निरोगी प्रवृत्तींच्या तरुणांनीं ज्या धर्तीचे लेख लिहिले असते त्याच धर्तीचे लेख प्रस्तुत संग्रहांत वाचकांना आढळतील.

एकदोन दुःखान्त व चारपांच सुखान्त लघुकथा, दोनतीन निबन्ध, एकादा विनोदी लेख, असें विविध वाङ्मय येथें जमविलेलें आहे. हे वेगवेगळे वाङ्मय-प्रकार हाताळणाऱ्या लेखकांवर सध्यांच्या वेगवेगळ्या लोकप्रिय लेखकांची छाप पडल्याचें प्रथमदर्शनीच दिसून येईल. ज्याअर्थी या होतकरू लेखकांचे आदर्श जे सध्याचे लोकप्रिय लेखक ते पुरोगामी म्हणून प्रसिद्ध आहेत, त्याअर्थी या घोळक्यांतील त्यांचा छात्रवर्गहि त्यांच्या अनुकरणापुरता तरी पुरोगामी असावा—निदान तशा प्रकारच्या पुरोगमनाची धडपड पुढील पानांतून व्यक्त होते हे खास. पण थोरांच्या अनुकरणाखेरीज, खरा आशावाद, दुःखितांचा कळवळा, अन्या-याची चीड बांधवांच्या सुधारणेची तळमळ, बुद्धिप्रामाण्याची कसोटी लावून जीवनाकडे पाहण्याचा यत्न करणारी शास्त्रीय दृष्टी, इत्यादि गुणांचेहि स्वतंत्र पुरावे या संग्रहांत ठिकठिकाणीं मिळतील. ' जरीचें पातळ ' किंवा ' चन्दनाचें खोड ' या कथांतून जिव्हाळा व निवेदनचातुर्य हे गुण दिसून येतात; ' माणसं जगतात कशासाठीं ? ' या बोधपर निबन्धांत तत्त्वशोधक दृष्टि आढळते, तर ' माझा

१९५० चा हिंदुस्थान' या आगाऊ स्वप्नादर्शा ( Utopia ) त व्यापक राष्ट्रीयत्वाचा प्रयत्न ओळखू येतो. 'उपेक्षितांचीं मृत्युपत्रें' या उत्कृष्ट कल्पनेंत, जीवनाच्या चरकात चिपाड होऊन ज्यांनीं आपला रस ऐतखाऊंना ऐषआरामांत विण्यास दिला त्यांचा सहानुभुतिपर परामर्ष घेतलेला दिसतो, तर 'मुके अश्रू' या गोष्टींत मानवी भावनांच्या सूक्ष्म खेळांची नोंद केलेली आढळते. 'रामायणाचे जैन अवतार' या मनोरंजक व विद्वत्ताप्रचूर टिप्पणींत दोन हजार वर्षांपूर्वींचीं माणसें सध्यांइतकीं धूर्त व व्यवहारचतुर होतीं या सत्यावर प्रकाश पडतो, तर 'मृतात्म्यास शान्ति' हा विनोदी लेख क्षुल्लक निमित्तानें होणाऱ्या समारम्भांचे कंदील उपरोधाच्या फूत्कारानें भडकावून टाकतो. 'रंगदास चांभार' ही गोष्ट तर वर्धा शिक्षणयोजनेच्या क्रमिक पुस्तकांतच दाखल होण्याइतकी नमुनेदार झाली आहे!

हे मुशाफिर निघाले कुठें? या प्रश्नाला 'पुरोगामी' या त्यांच्या बिरुदानें एका शब्दांतच उत्तर मिळतें. हे लोक खरोखरच पुढें जात आहेत काय, हें वाचक आपापल्या मतानुसार ठरवूं शकतीलच. माझ्या मतें या मंडळींचा सर्वसाधारण रोख निःसंशय पुरोगामी आहे. यांच्यातले कोणी जागच्याजागींच घोटाळत असले, कोणी अधिरेपणानें फाजील ओढ घेत असले, कांहीं जमिनीवरच्या खुणांची वाट शोधीत अमल किंवा कांहीं आकाशांतील ताऱ्यांच्या अनुरोधानें ठेंचकाळत जात असले, तरी एक तांडा करून सफरीवर निघण्यांत या मुशाफिरांनीं जें धूर्त धोरण दाखविलें आहे ते यांच्या पुरोगामित्वाचेंच एक गमक म्हणतां येईल. पुरोगमनासाठीं धोरणीपणा या गुणाची जरूर किती असते हें आपल्याला भोंवतालच्या 'चालू' उदाहरणांनीं पुरेपूर पटत नाहीं काय?

या चौदा मुशाफरांचीं तोंडें एकजात एकाच दिशेला नाहींत, त्यांचे वेग त्यांच्या चाली, त्यांच्या शिदोऱ्या नी त्यांचीं ओझीं यांत सारखेपणा नाहीं— म्हणूनच या काफिल्याबरोबर चार पावलें चालण्यांत मला मौज वाटते. हे एक

ठशाचें चौदाजण असते तर मुशाफिर कसचे, कोणाच्या तरी जरबेनें चालणारे निर्बुद्ध कळसूत्री शिपाई ठरले असते; पण स्वतःला वाटतें तें निर्भयपणें व्यक्त करणारे, स्वखुशीनें एकत्र येऊन गती चालू ठेवणारे, हे मुशाफिर आपले मानवी स्वातंत्र्याचे मूलभूत हक्क जिवन्तपणें बजावीत आहेत-यांना पहिल्या क्षितिजा-पर्यंत सोबत करण्यात मला आनन्द होत आहे.

'अनन्तधाम' पुणें,
७ मे १९४०

शामराव नीलकन्ठ ओक

निबंध पत्र ...

# आम्ही—

भरलेल्या बॅगकडे पाहून-आतां कांहींएक सामान भरावयाचें राहिलें नाहीं-ह्या भावनेनें थोडेसें अंग लवंडतो न लवंडतो-तोंच डोळ्यापुढें अशा किती तरी जिनसा भराभर येऊं लागतात-कीं ज्या अजून बॅगमध्यें भरावयाच्या राहून गेल्या आहेत ! आम्ही मुशाफिर आणि ते सुद्धां दोडून चालून नवे आणि वाङ्मय प्रांतांतले ! आमच्या प्रवासाचें कौतुक करा-आमचें चुकले तर आमच्या पाठीवर 'जीते रहो जीवा' म्हणून हात फिरवून आत्मविश्वास निर्माण करा—आणि 'हं व्हा पुढें-' असा उत्साहवर्धक आशीर्वादहि द्या !

वाङ्मय प्रांतांत 'पुरोगामी' ह्या शब्दाच्या उच्चारामुळेंच-आम्हा साहित्यिकासंबंधीं गैरसमजाचें धुकें निर्माण होण्याचा संभव आहे ! 'पुरोगामी' साहित्यिक म्हटला म्हणजे त्याच्याबद्दल प्रेम तर वाटण्याचें दूरच राहो-परंतु त्याबद्दल अप्रियता आणि तिरस्कारा सामान्य वाचक वर्गांत निर्माण झाल्यास नवल नाहीं ! समाजाचे हितचिंतक आम्हींच-नवे विचाराचे प्रणेते आम्हींच-नव्या पिढीचे नेते आम्हींच-अशा किंकाळ्या फोडीत अलम महाराष्ट्रांत कांहीं साहित्यिक संचार करीत असतात ! भीति वाटते ती आम्हांला अशा 'पुढारीपणाचें' उसनें अवसान आणून मिरवणाऱ्या महानावांची ! आणि त्यांच्या मुखांतून वेळोवेळीं पडणाऱ्या 'मुक्ताफळां' मुळेंच आमचा मार्ग कांटेरी होऊन बसण्याचा संभव आहे.

आमचें पुरोगामीत्व अशा तऱ्हेचें भयंकर नाहीं ! मुठा-मुळा नदीचें रूपांतर गंगेंत-नव्या पुलाचा अपोलो बंदर करणें-किंवा मंडईचा राजाभाई टॉवर करण्याइतकें जरूर नि जादुगिरीचें नाहीं हें खास ! खरें पाहिलें असतां 'आम्ही कोण

आहोंत त्यांचें निश्चित स्वरूप अजून ठरावयाचें आहे-परंतु जे होऊं घातलेले आहोत-ते असें आहोत-असें सांगणें गुन्हा आहे कां ? वाङ्मयांत फुलाचें कौतुक करणारा कवि कधीं टेबलावरील फ्लॉवर पॉट सजविण्याचें मनांत देखील आणणार नाहीं-पौर्णिमेच्या चंद्राच्या पिठोरी चांदण्याचें 'टाक' दिला होईपर्यंत वर्णन करणारा लेखक चुकून कधीं फर्ग्युसन कॉलेजच्या हिलवर आरामानें हिंडायला जाणार नाहीं नेहमीं मोटारीचें वर्णन करून आपण मोटार मेकॅनिक आहोत जणूं; असा भास दर्शविणारा लेखक-एकवेळ मजेनें घरच्या मंडळीसह हौसेनें ' सहल ' करणार नाहीं--महिलांच्या जीवनाविषयीं डोळ्यांची कारंजीं करून लिहिणारा लेखक-

आपल्या घरच्या पत्नीला-उठता लाथ न बसता बुक्की-असे वागविण्याचे ... करील-मदिरा माणुसकीला मुकविणारी आहे—संसाराचा नळबाजार करणारी आहे—असें प्रतिपादन करणारा लेखक—८॥ चे सुमारास कॉरनेलियांत सापडेल--स्त्रीयांच्या नीतीसंबंधीं बोलतांना 'दत्ताचा' आव आणून बोलणारा लेखक—केव्हां डोळा चुकून एकादी तरुणी पळवून नेईल ह्याचा नेम नाहीं-! लिहिणे आणि वागणें ह्यांचा ताळमेळ कधींहि बसूं नये हे ध्येय ! आमच्या जीवनासंबंधीच्या-नि लेखनासंबंधीच्या कल्पना भिन्न असूं शकणार नाहीत. लिहूं एक-वागूं एक-आणि दाखवूं तिसरेंच असलें ' तिरंगी ' धोरण आमचें नाहीं ! आम्ही जुनें तें सोनें म्हणून-पदरांत घेणार नाहीं-आणि नवें तें हवें म्हणून त्यांचाही हव्यास धरणार नाहीं ! जें आमचा समाज-संस्कृति-आणि शाश्वत आहे, असें तेंच आम्हीं डोक्यावर घेऊन नाचूं ! आम्हीं एकत्र येऊं-पटलें तर नांदूं-नाहींतर पुन्हा एकत्र येऊन भांडू-भांडू परंतु बोलूं-आपदा सोसूं परंतु लढू आणि जो कांहीं जगावयाचा अवधि आहे--त्या अल्प काळांत--हंसून खेळून--सहानुभुतीचे साथीदार होऊन एकमेकांचा अखेरचा निरोप घेऊं ! आम्ही कोण आहोंत--किंवा आम्ही कोण होणार आहोत--किंवा आम्हाला काय व्हावयाचें आहे, ह्या संबंधीचा अंधुक आराखडा वाचक वर्गापुढें आम्ही मांडलेला आहे.

संग्रहास, महाराष्ट्राला सुपरिचित असलेले लेखक रा. रा. शामराव ओक, ह्यांनीं प्रस्तावना देऊन आमचा अप्रत्यक्ष रीतीनें गौरव केलेला आहे. मराठी ग्रंथप्रकाशन ह्या संस्थेचे जनक श्रीयुत का. रा. भालेराव-ह्यांनीं प्रकाशनाचें कार्य हातीं घेऊन आम्हाला ऋणी करून ठेवलेले आहे. त्याचप्रमाणें "प्रगति प्रिंटिंगचे" व्यवस्थापक-रा. रा. बालकृष्ण गजानन वाघ ह्यांनीं मुद्रणाचे काम त्वरित करून दिल्याबद्दल त्यांचें आभार मानणें आम्ही आमचे कर्तव्य समजतो. मंडळांतील सदस्यांचा अमोलिक सहाय्याचा उल्लेख करणें अप्रस्तुत होईल काय ?

सदस्य,
**पुरोगामी वाङ्मय मंडळ, पुणें.**

# १ : : : चंदनाचें खोड

( श्री. हरि विनायक वाडेकर )

ज्याला आपण छंद अगर 'हॉबीज्' म्हणतो, त्या प्रत्येकाच्या निर-निराळ्या असतात. कांहीं लोकांना विशिष्ट मोटारचे नंबरस् लक्षांत ठेवण्याचा छंद असतो, कांहीं लोक एखाद्या विशिष्ट रस्त्यावरून सायकली किती जातात याची नोंद करीत असतात. प्रेमवीर तरूण कुठल्या तरुणी कुठल्या बाजूस फिरा-वयास जातात, यांकडे अवधान ठेवतात आणि माझ्यासारखे कांहीं उल्लू तरूण कुठल्या चित्रपटांत 'चुंबनाचें रेकॉर्ड' मोडलें हें 'नोट' करून ठेवतात. जिगर दोस्तांना माझा सहवास अगदीं हवासा वाटतो, पण नवीन होऊं पाहाणाऱ्या कच्च्या दिलाच्या मंडळींना मी अगदीं 'गणिताचा मास्तर' वाटतो ! कारण पहाल तर एकच–वय–शिक्षण–जात गोत लक्षांत न घेतां मी सरळ थोड्याशा सलगीनंतर बेधडकपणें विचारतों कीं, किती मुलींवर आतांपर्यंत प्रेम केलेंस ? सिगरेट केव्हांपासून ओढूं लागलास ? मिशा केव्हांपासून साफ करूं लागलास ? दारू पीत असशील, तर ती केव्हांपासून पिऊं लागलास ? एक कां हजार प्रश्नांचा भडिमार मी करी ! हेतु एकच असे, आयुष्यांतील लहानसहान घडामोडींचा 'श्री गणेशा' केव्हांपासून गिरविला हें कळावें ! मी कांहीं मोठा मानवी आयुष्याचा

अभ्यास करणारा जाडा विद्वान् नाहीं, परंतु ती एक माझी ' हॉबी '-छंद होऊन बसला होता.

× × ×

सुट्टीचा दिवस गांठून माझे सात-आठ मित्र माझ्या दाराशीं ' मजुराच्या ' आवेशानें येऊन माझ्या नांवानें बेंबीपासून कंठशोष करूं लागले. भांडवल-वाल्यांच्या आवेशानें मी झोंपेंतून उठून दार उघडलें. आणि सर्वांना साष्टांग नमस्कार केला ! खोडसाळपणा-सूड उगविण्याच्या बुद्धीनें सारे माझ्याकडे वेरकी नजरेनें पाहात होते.

—अरे ए

—काय म्हणतो रे ?

—आम्ही सर्व तुला एक प्रश्न विचारणार आहों. ईश्वराशपथ खरं सांग—

—चुकलास तूं–मला ईश्वरी शपथेचा लाल दिवा दाखविण्याऐवजीं जर माझ्या आवडत्या ' कुलंगी कुत्रीचा '—

—पाहिलत—ही तरुण पिढी !

—आणि तुमची कुणी शिकाळी हातांत घेऊन तयार आहे वाटतं ! बर, वाजीपणा पुरे करा, सरळ विचार काय विचारावयाचें असेल तें.

—पाहा वरं–मागून गांधींसारखा बदलशील !

—Excuse me— तुम्हाला वाटत असेल-गांधींचं नांव घेऊन मला ' सायकल ' वर चढवलं. परंतु पुनः जर त्या गृहस्थाचं नांव घेतलं, तर मला Shower bath घ्यावा लागेल.—

—आमचा असा विचार आहे कीं, तूं तुझ्या वैवाहिक आयुष्याच्या सुरुवातीपासून ते परवाचा वैवाहिक ' Once more ' घेईपर्यंत सारी हकीकत सांगावीस—

एकदम मला गहिंवर आल्यासारखें झालें. माझ्या खिलाडू वृत्तींत एकदम गांभीर्य आलें ! वरवर हंसणाऱ्या माझ्या मुखचंद्रम्यानें ' सुखी जीव ' म्हणून मला समजणारी माझी दोस्तमंडळी—माझ्या वैवाहिक आयुष्याच्या शाळेंतील—सुरु-

बातीचा पहिला धडा मीं कसा गिरविला हें विचारतील, अशी कल्पनाहि नव्हती. कांहींसा भानावर येऊन मी म्हणालो--

'ठीक! पुरें हा आतां विषय--Now let us have tea!
चहा घेऊं आणि मग जाऊं गांवांत पोळासारखे हिंडायला'.

× × ×

माझ्या स्वतःच्या आयुष्याचें सिंहावलोकन केलें-तर मला इतके धक्के बसतील कीं कदाचित् त्यामुळें एकदम 'गृह्यसंस्कारांत' प्रगट व्हावें लागेल! आणि ज्या स्थितींतून मी घोड्यावर, पगडी घालून गालाला काजळ लावून, तोंडांत विडा चघळीत चढलों, तेथपर्यंचा इतिहास 'न्हाव्याचा नटसम्राट कसा झालों' ह्या आत्मवृत्ताइतका मनोरंजक ठरेल. इसापनीतीसारखे थोडक्यांत--आजतागायतच्या आयुष्याचें सार काढून उपदेशामृत पाजतांना निःशंकपणें मी सांगू शकेन--'आमच्या आयुष्यांत अक्कलेपेक्षां नशीबाचा भाग अधिक आहे.' शिक्षण, विचारूं नका, सद्गुण-बोलूं नका वडिलार्जित इस्टेट, एकुलता एक हा दिवटा औरस पुत्र. अशा ह्या सर्वगुणसंपन्न चिरंजीवाच्या विवाहप्रसंगीं जर आईबाप असावेत अशी हुरहुर वाटून चारदोन अश्रु टाकले तर काय वावगें होईल कां? Bombay office मध्यें नोकरी, आईबापाला एकुलती एक असलेली आमची 'मंडळी' राहायला पुण्यासारखें शहर, मग काय विचारतां? आयुष्य म्हणजे मलबार हिल'!

× × ×

नेहमींच्या वेळेपेक्षां थोडासा अगोदरच तासभर ऑफिसांतून आलो होतेवा 'मंडळी' पलंगावर अजून 'लोडा' सारखी पसरलेलीच होती. कपडे खुंटीवर काढून ठेवून मीहि आपला मोर्चा पलंगाकडे वळून 'लोडा' ला टेकून फॅन सुरूं केला.

--'अय्या! केव्हां येणं केलं ते?

--येणं आतांच झालं-बरं अय्या-

—आज नेहमींपेक्षां लवकर येणं केलं?

—आमचा तो हेड क्लार्क आहे ना, त्याचं दुसरं लग्न नुकतंच झालं आहे. तो अलीकडे अगदीं चारच्या सुमारासच घरीं पळतो ! ! हेड क्लार्कचं लग्न दुसरें असलें तरी आमचं पहिलें आहे ह्याची जाणीव--

--काय तरी बाई एक-एक माणसाचा स्वभाव असतो ! जशी कांहीं बायको घरांत आली कीं लोकांना वाटतं--मेल्यांना म्हणावं एकदां बायको होऊन पहा नवऱ्याची म्हणजे कळेल काय सुख आहे तें !--

आपल्याला तर कांहीं नवऱ्याची बायको होता येत नाहीं ! आतां बायकोचा नवरा होऊन पाहतो काय वाटतं ते. बरं ए--

—समजलं--ही पहा आलेच--

'अग इकडे ये, दुसरं आणखीन तुझ्या कानांत सांगायचं आहे, अशी इकडे ये,' 'इश्य, कुणी पाहील ना--हे काय ते—! हेंच कां कानांत सांगायचं होतं ते'

'स्त्रियांशीं कानगोष्टी करतांना अशा 'गोष्टी' ही कराव्या लागतात ! रागावलीस वाटत ?

'—इतका राग आला आहे मला कीं असं वाटतं—'

'--कीं पुन्हां मी कानगोष्टी कराव्यात ! बरं बाईसाहेब, चहा आणा लवकर.

पलंगावरून उठून टेबलाजवळ आलों. 'मंडळीची' रवानगी करण्याबद्दल सासऱ्याचें आलेलें कार्ड दिसलें. झटकन वाचून सकाळीं आलेल्या दैनिकाकडे नजर टाकली--

—हं घ्या.

—आणा

--आणला आहे कीं--आतां करा सुरुवात प्यायला.

'—कशाला ?'

'इश्य, कसली ही कोटी ?'

'आम्ही ही कोटी–तुमच्या इश्य ह्या शब्दाइतकी कांहीं घाण नाहीं ! दुसरा कप नाहीं भरला–और एक ग्लास थंडा पानी लाव—

—' हिंदी ही राष्ट्र भाषा व्हावी अशी तुमची इच्छा असली, तरी घरांत 'आव-लाव-पाव ' कांहीं चालणार नाहीं ! फारच सुरसुरी आली हिंदी बोलायचं, तर द्या एखादं व्याख्यान !

—' बरं एक ग्लास पाणी आण—'

—' हे काय हॉटेल आहे वाटतं ?

—' तुझं आणि एका मोठ्या इंग्रजी लेखकाचं मतैक्य दिसतं ! आयुष्य हें एक हॉटेल आहे असं त्याचं मत आहे.

—' तो लेखक कोण ? कपबशा विसळणारा वाटतं ?'

—' चहा करा घ्यायला सुरुवात—नाहीं तर गार होईल—

—अरे बापरे—!

—' काय झालं इतकं दचकायला ? '

—' अग, आज व्याख्यान आहे.

—' कुणाचं ?

—' एका बाईचं.

—' मग त्यांत काय मोठंस नवल आहे ! पुष्कळ स्त्रिया अलीकडे बोलू लागल्या आहेत—'

—विषय पाहिलास कां काय आहे तो ? अजून नाहीं 'अग्या'चा धांवा केलास—

—' त्या बाईला नाहीं कवडीची अक्कल !'

—'तुला इतक्यांत नाहीं कळायचं त्या विषयाचे महत्त्व. संसाराला विटल्यावर संन्यास, तसाच हा प्रकार आहे ! चार दोन घरांत रांगू लागल्याशिवाय नाहीं कळणार तुम्हां बायकांना महत्त्व; जा, ठेवा नेऊन घरांत कपबशा ! '

× ×

[illegible] म्हणालो.

लग्न [illegible] वाजले—चहा कर '

अपल्याला ' रेनकोटा'प्रमाणें खांद्यावर टाकून (तीन फुटाच्या अंतरावर) पाय मोकळे करून यावे म्हणून हिंडतो.

रात्रीचें ९॥ वाजले होते, मी नवीनच आणलेल्या सेन्टचें चार थेंब हातरुमालावर शिंपडून त्याचा वास घेत–फाउंटन पेनमध्यें शाई भरत होतो. दूरच्याच अंतरावर सौभाग्यवती किर्लोस्करी पाळण्यांत घालून त्याला निजविण्यासाठीं भावगीत म्हणत होती. चिरंजीवांनीं न निजावें असेंच मला वाटे; कारण तिच्या मधुर कंठांतून येणाऱ्या गोड गीताच्या आलापांना मला पारखें व्हावें लागले असते.

पाळण्याची आंदोलनें स्थिरावत चाललीं–गाणेंहि हळूहळू ती बंद करू लागली–मी एकदम त्या शांत वातावरणाचा भंग करून म्हणालो–

––अजून तो निजला नाहीं.

––जरा इकडे येऊन पहावें कीं आपला बाळ किती सुंदर दिसतो म्हणून सांगू ! आतां ह्या दिवाळीला तो वर्षाचा होईल; तेव्हां त्याला उष्टावण करायचं आहे––

'आलें माझ्या ध्यानांत ! इतका वेळ बाळाला निजविण्यासाठीं गाणं म्हटलं आतां––

' कांहीं तरींच आपलें ! मी किती दिवस आपल्याला सांगते आहे घरीं एक बाबा गाडी आणायची म्हणून– ! मला नाहीं गडे त्याला घेऊन चालवत– ! बरं, आपण घेऊन चालायचं होईल ; नाहीं असें नाहीं पण मला अगदीं विरमल्या सारखं होतय ! मग होईल ना आणायची लवकर ? कां आपलं नुसतं ' हो ' ' पाहूं '

—अग, पण त्या बाबागाडींत एकटाच त्याला कसा बसवायचा– ! बाबागाडी आणण्या इतकी आपली प्रगति करून दाखवा-अन् मग सांगा आम्हाला ती आणायला––

तिच्यइश्य,त्यावर कांहींसा असंतोष प्रगट झाला. माझ्या उत्तराला प्रत्युत्तर द्यावयाचं आम्ही ही कोटातनुमेच्या इश्य ह्या शब्दाइत[illegible] पलंगाकडे दुसरा कप नाहीं भरला–और एक ग्लास थंडा पानी लाव—

तिच्या चतुर्थीच्या चंद्रासारख्या कमानदार भुंवया–अंतःकरणाचा सरळभाव दर्शविणारी सरळ नासिका–उमलणाऱ्या गुलाबाच्या पाकळ्याप्रमाणें दिसणारे तिचे ओंठ–सतेज कांती पाहून मनाला धन्य वाटलें. पुन्हां एकदा जवळ जाऊन निरखून पाहिलें आणि परमेश्वरानें निर्माण केलेल्या कला कृतीला नम्र भावानें नमस्कार केला.

× × ×

कांहीं वेळेला मला अगदीं पटूं लागतें कीं, जगांत-आनंद-सुख-प्रेम-ह्या गोष्टींचा ध्यास माणसाला जेव्हां अनिवार होतो तेव्हांच तो त्यांचें सौख्य भोगूं शकतो. पुत्रा-करिता नवस करून पुत्रवान होणारा संसारी आणि दरवर्षी Maternity Home मध्यें चकरा घालणारा कारकून–चार दिवस थारेपालट व्हावा म्हणून मुंबईला येणारा युवक–आणि दररोज यांत्रिक आयुष्याचा एक घटक बनून कंटाळणारा चाळींतील मजूर अगर मलबार हिलवरील शेट, पंढरपुरच्या विठोबाच्या गाभा-ऱ्यांत चोविसतास बसणारा बडवा आणि वर्षांतून काशीं रामेश्वराहून येणारा यात्रेकरू–लग्नाची आतुरतेने वाट पाहाणारा ब्रह्मचारी, आणि लग्नाच्या बेडींत अडकून पोरांचें लेंढार लागलेला संसारीक, सकाळ, दुपार, 'संध्याकाळ–मन मानेल तेव्हा मोटारीतून सहल करणारा ऐशारामी भांडवलवाला–आणि पुर्ण मुंबई सर्व्हिसचा मोटार ड्रायव्हर–येईल कां कधीं आनंदाची तुलना करायला ? आणि म्हणून मला वाटते–आनंद–सुख–प्रेम हे अनेक सायासानें प्राप्त झालेल्या संधीचा फायदा घेण्यांत असते ! संसारात सुद्धां अगदीं असेंच आहे. माझ्या संसाराच्या सुरुवातीचीं तीन चार वर्षे फार मोठ्या आनंदाची गेली–आणि आतां नेहमीं. तिच्या भोंवती मुलें ! लग्नानंतरच्या सुरवातीच्या कालाकडे आणि मी अनुभवतों या कालाकडे नजर टाकूं लागलो, तर उद्‌गार चिन्हच मला पुढें दिसते.

आज दुपारीं एक नवीन चित्रपट लागणार होता. माझ्या मनांतून तिनें माझ्या बरोबर यावें असें वाटत होतें. दुपारचे दोनचे ठोके पडताच–मुलांच्या गराड्यांत पडलेल्या तिला उठवून मी म्हणालो.

'दोन वाजले–चहा कर'

'आतांच कुठं आवरून-मुलाना झोंपवून पडलें होतें, तर लगेच चहा कर म्हणून आली स्वारी हूकूम सोडायला ! मला आला आहे कंटाळा ! तो स्टोव्ह आहे. ती स्पिरिटची बाटली-सारं आहे सामान तिथंच ! करा तुम्ही आणि माझाहि टाका एक कप चहा, मर्जी असेल तर- !

—कांहीं वाटते का शरम असं बोलायला ! गांवांत पुष्कळ आहेत हॉटेलस्-जरूर नाहीं मला तुझ्या त्या चहाची ! बरं, काढून ठेवलेस कां परटीचें कपडे बाहेर ? लावल्यास कां सदऱ्याला गुंड्या. टोपीला ब्रश केव्हां करणार ? चल! उठ मला दाढी करायची, दे 'केस' इकडे आणून !

—' कंटाळा आला मला ह्या संसाराचा ! ह्या मुलांकडे लक्ष देऊं, कां तुमची मर्जी संभाळू ? आज दोन दिवस झाले-बेबी खोकते आहे-थोरला तापानं फणफणून पडला आहे ! गेला होतां कां डॉक्टरकडे ? कमी जास्ती कांहीं झालं तर— !'

—काय व्हायचं असेल ते होईल त्याचें ! तूं आणि पोरं घाला गोंधळ !

—आणि तुम्ही ? कुणी नाहीं वाटतं त्यांचे ?

—काडीचाहि माझा त्यांचा संबंध नाहीं, असं तुला वाटत असेल, तर वाटो- ! हे बघ वाजले अर्डीच- ! चहा कर-कपडे कर-आणि चल माझ्या बरोबर सिनेमाला-संध्याकाळीं सिनेमाहून आल्यावर जाऊं डॉक्टरकडे घेऊन मुलांना !

--निर्दय आहांत ! घ्या तुम्ही सिनेमा पाहून-मला कांहीं यायचं नाहीं ! आणि सांगते, मला पांच रुपये हवे आहेत—

—कशाला ?

'हवे आहेत. चार आठ दिवसांनी मला जायचंय आईकडे, तेव्हां पुण्याहून जातांना कांहीं तरी तिला नेणार आहे ! सदा-सदा मीहि आजारी, पोरांनाहि बरं वाटत नाहीं ! येतें जाऊन दोन महिनें हवापालट करून- ! निदान आतां २ रुपये तरी द्या, डॉक्टरकडे संध्याकाळीं जायंच आहे तेव्हां —

कांहींशा चिडखोरपणानेंच मी दोन रुपये ड्रॉवर मधून काढून तिच्या पुढें फेकून दिलें.

× × ×

महिना दोन महिने डॉक्टरनें तिचा ताप हटविण्याचें प्रयत्न करून पाहिले. आणि शेवट Blood examination करून घेण्याचा सल्ला दिला! चार–आठ दिवसाच्या अंतरानें एक दिवस डॉक्टरनें मला खाजगी रीतीनें बोलावून सांगितलें ' मिस्टर, तुमच्या वायकोला क्षयाची भावना झाली असा माझा समज झाला होता, परंतु आज रिपोर्ट आला असून त्यांत T. B. चें germs सांपडलें आहेत! नुसता क्षयच असता, तर कांहीं वरी होण्याची आशा होती. परंतु त्यांतून त्यांनीं कांहीं दिवस गेले आहेत–! प्रत्येक बाळंतपणानें त्यांना आलेला अशक्तपणा आणि दरम्यानचा असणारा अल्प अवधी, ह्यामुळें she has utterly lost her constitution! अगदीं हतबुद्ध झालों आणि जड अंतःकरणानें मी घरीं परतलों. दिवे लागणी झाली होती. तिच्याभोंवतीं मुलें होती. एक रडत होता, तर दुसरा अंगाशीं दंगामस्ती करीत होता. तिसऱ्यानें अंग भाजून घेतलें होते आणि काय? एकूण चूल आणि मूल! मला पाहतांच तिनें उठण्याचा प्रयत्न केला! माझा चेहरा उतरलेला पाहातांच तिच्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले.

—काय म्हणाले डॉक्टर?

—कांहीं नाहीं. ठीक आहे. वाटेल बरं औषध घेऊनच.

—अगदीं खरं ना सांगायचं हे? मला कांहीं कळत कां नाहीं?

—एक प्रकारची मला घमेंड वाटत होती, कीं मी सुखी आहे–माझा संसार सुखाचा होणार, पण दुर्दैव कुठें तो सुखानें साजरा करुं देणार! नीज तूं. मी करतों स्वयंपाक, पोरांनाही संभाळतो, तूं अगदीं स्वस्थ नीज, डॉक्टरनीं विश्रांति घ्यायला सांगितली आहे. ऐक एवढें माझं!

× × ×

एकच मला काळजी लागून राहिली होती, माझें कसें होणार? मुलें उघडीं पडणार—गृहिणीला मी मुकणार. किती स्वार्थी! मी कां रडतों, तर

माझ्या सुखासाठीं ! मी कां हळहळतो, तर माझ्या अर्ध्या अधिक उभारलेल्या संसार-मंदिराचा महाल कोसळणार म्हणून ! डोक्यांत किडे पडेपर्यंत विचार कां करतो, तर माझें पुनः लग्न झालें तर अशी बायको मिळणार नाहीं म्हणून ! भवितव्य भेडसावीत असता—मी निष्ठुरासारखा हा सारा प्रकार एखाद्या राक्षसा-प्रमाणें पाहतों तो कां म्हणून ? गुन्हेगार आहे म्हणून ! लग्न कशाला करायचें, तर बायकांना बाळंतपणाच्या रोगराईनें मारण्याकरितां त्यांनी चंदनाच्या खोडासारखा झिजून उगाळलेल्या सुवासिक गंधाचें टिकलें कपाळीं लावून आमचे वारसदार म्हणून मिरविण्यासाठीं ! अनेक आशाआकांक्षा मनांत धरून माहेरचा—मायेचा उंबरठा ओलांडून जन्मदात्या आईबापाचें पाश तोडून नवऱ्याच्या घरीं नांदायला यावयाचें तें कशासाठीं ? आमच्या वैषयिक वासनांना बळी पडण्यासाठीं ? त्यांच्या तारुण्याचा उन्मादक आनंद भोगून त्याना निःसत्त्व करून भरल्या मळवटानें सरणावर शय्या करण्यासाठीं ! अंतःकरण फुटून जातें—मन दुभंगून जातें आणि मति गुंग होतें ! आणि सृष्टि निर्माण करणाऱ्या परमेश्वरानें ह्या असहाय्य बनविलेल्या स्त्री जातीकडे पाहून ढसढसा रडावेंसें वाटतें ! कोणी विचार करील कां ह्याचा ? देवाचें देणें म्हणून देवाकडे दोषानें बोट दर्शविणाऱ्यांना विचार करण्यासारखा हा प्रश्न आहे ! अगदीं आवश्यक आहे. ज्या आनंदाचा खजिना तुमच्या हातीं लुटावयास दिला आहे, तो लुट-तांना परिणामाकडे नजर ठेवून लुटायला हवा ! वैभवाचा सांठा, सौख्याचा सांठा हातीं दिल्यावर तो टिकवितां आला पाहिजे. देवानें तो दिला, पण आम्ही तो टिकविला पाहिजे. दोषी कोण ? देव ! छे मुळींच नाहीं ! आम्ही बेअकली जनावरें, कामांध पशु, अविचारी पागल !

—ऐकलंस कां ? ९॥ वाजले, औषध घ्यायची वेळ झाली. असा कंटाळा करून कसं चालेल ? थांब, मीच देतो तुला औषध ग्लासांत ओतून !

—इतका काय तो त्रास करून घ्यायचा माझ्यासाठीं ! अलिकडे सारं घरचं पाहणं होतं. पुन्हां ऑफिसांतील काम. मुलांचे हट्ट, आणि शिवाय माझी सारी बारकाईनें पाहणी !

—नको कां मला करायला ? ज्याचं मन त्याला खात असतं ! अजून मी माणुसकी सोडली नाहीं, मला अंतःकरण आहे. देवानें दिलेल्या मेंदूचा उपयो-

यही कसा करावा हें कळतं म्हणून मला हे निमूटपणें सहन करावें लागतं! नवराबायकोचं नातं दूर करून--मी तुला अगदीं धुतलेल्या जिव्हेनें सांगतो--ह्या तुझ्या स्थितीला कारण हा तुझा मंगळसूत्राचा मालक आहे.

—छे छे, असं भलत सलत कांहीं नाहीं बरं मनांत आणायचं! अगदीं माझ्या गळयाची शपथ आहे बरं! असं मनाला लावून घेतलं, आपला काय अपराध आहे ? असं वेड्यासारखं कांहीं नाहीं बोलून घ्यायचं! सारी प्रभूची इच्छा त्यानं जोडलं, त्याला वाटलं तर तोच तोडणार—

—बरं, तसं कां होईना तुझ्या समजुतीप्रमाणें. मग तर हरकत नाहीं! चल, घे हा भाग! झोंप घे-अगदीं स्वस्थ पड-

नीज म्हणताच निजली! तिच्या त्या केविलवाण्या स्थितीकडे पाहून जीव गुदमरला! अंतःकरण द्रवलें! तिच्याकडे सारखे टक लावून पाहवेना म्हणून सहज मान मागें वळविली तोंच मुलें दिसलीं—काळीज फाटलें!

चटकन उठलो—बटन ऑफ केलें-अंधार! सारीकडे अंधार पडला! एक दिवस असाच माझ्या संसारांत अंधार पडणार आहे.

× × ×

महिन्यानंतरची गोष्ट.

सकाळच्या आठचा सुमार, इझीचेअरवर मी चहा पीत बसलो होतो. थोरले चिरंजीव, मधली मुलगी आणि सगळयांत धाकटे चिरंजीव तिला सतावून सोडीत होते. त्यांच्या अंगावर खेकसून मी म्हणालो.

—प्राण-घेऊं कारटीं! आणि तूंग बेबे, लहान आहेस कां तिला त्रास द्यायला ? तिच्यापुढं काय बसली आहेस वेणी घालायला ?

—' मीच होऊन तिला बोलावलं! आज किनई, मी स्वयंपाक करणार, मुलांना आंघोळी मी घालणार—तुम्हांला सर्वांना मी वाढणार.

' जागेवरून इकडून तिकडे हालायची शक्ति तरी आहे कां ?'

—' आज किनई, तुम्हीं माझं ऐकलं पाहिजे! बरं का बेबी, आणि तूंरे गुलामा ?

--आईग-मी भात करीन-

--मी पोळ्या करीन

--आणि तूं रे टोणोबा

--' आम्ही आपली गोल गोल तुमची पापी घेऊं-

--काय वाटेल ते करा-!तु ही नाहीं ऐकायच्या

—कुठं निघालांत तुम्हीं ?

--बजारांत

—मग मला चांगला एक बनारसी खण, हिरवं टोप पदराचं लुगडं-कुंकवाची पेटी फणी-आरसा आणि मुलाकरितां खाऊं-आज मी आपल्या हातानं वाढणार आहे--

--काय विचार आहे तुझा ? तुला बरं वाटल्यावर एकच काय पण दहा लुगडी आणून देईन—

--मग काय हो उपयोग त्याचा ? आज मला हवं आहे. हे सारे पैसे नाहींत कां आपल्या जवळ ? ह्या घ्या पाटल्या-केव्हां तरी काढायच्याच आहेत.

—कल्पना आहे तुला माझ्या मनाला किती त्रास होतो आहे तुझ्या बोलण्यानं ! अगदीं एक शब्द बोलूं नको--

—इतके दिवस जसे बोललांत, तसें आजच्या दिवस तरी—मग होईल ना माझं ऐकायचं एवढं ? निघाला बाहेर म्हणून सांगतें. होईल ना आणायचं ?

कुठल्या जिभेनें मी "होकार" दिला हेंच माझें मला कळेना

× × ×

दुपारचे तीन वाजले होते. तिला झालेल्या श्रमामुळें कल्पनातीत अशक्तपणा आला होता. तरी माऊली मुलाशीं गोष्टी करीत होती.

—बेबी, इकडे त्रास द्यायचा नाहीं बरं कां !

आणि तुरे, लबाडा, दांडगाई नाहीं अशी करायची नेहमीं नेहमीं; दररोज सकाळीं उठून त्यांच्यापाशीं बसून अभ्यास करायचा--

—आई--मी करीन तुझ्यापाशीं अभ्यास, दादा चि.नई आमची पाती फोडतो.

--नाहीं ग आई, हिने माझं पुस्तक फाडलं--म्हणून मी तिची पाटी फोडली.

--कां असं दूरदूर बसायचं होतं माझ्यापासून ? पाळण्यांतून मुलीला द्या मजजवळ. मला घेऊं द्या तिला मांडीवर. आणायची ना तिला इकडे ?

' हट्टी ! हं घ्या

"ऊठ बाई--उठायचं ना ? किती वेळ झोंपायचं ? हंसा बाबा-हंसा. आमच्याकडे पाहून ! कां, केली रडायला सुरवात ! बरं नाहीं, एक गोल पापा तरी'

--आणि आमचा ग

--दादाचा तेव्हढा घेतला !

-- तुला सांगितलं ना तूं स्वस्थ पड म्हणून !

--अगदीं आतां स्वस्थ पडते हं ! माझं किनई डोकं मांडिवर घेऊन दाबायचं म्हटलं, नाहीं कां ऐकायचं ?

मी तिचें डोकें मांडीवर घेतलें, डोळ्यांतून घळघळ पाणी वाहूं लागले, तिच्या निस्तेज डोळ्यांतून अश्रु प्रवाह वाहत होता. एकमेकाशी पुष्कळ बोलावेसें वाटत होतें -- पण ते सारे दृष्टीनें

--काय हवं आहे तुला ?

--कांहीं नको. मुलांना जपा, स्वतःला, मला सोडून जायचं नाहीं अं कुठं आतां !

किती तरी वेळ ती माझ्याकडे पाहात होती. साता समुद्राचें अंतर तोडून जातां येईल, मोठमोठाले घाट-दऱ्या-पर्वत, ओलांडून जातां येतील ! परंतु हा घराचा उंबरठा ? कायमचा ओलांडून जाणें कठीण आहे ! पोलादी शृंखला तोडता येतील-पण मायेच्या रक्ताच्या सहवासाच्या शृंखला--?

मुलाच्या मायेला-पोटच्या लेकरांना-माझ्या उभारलेल्या संसाराला सोडून ती कायमची बंधमुक्त झाली.

निबंध २१ ]

--आईग-मी भात करीन-

--मी पोळ्या करीन

--आणि तूं रे टोणोबा

--' आम्ही आपली गोल गोल तुमची पापी घेऊं-

--काय वाटेल ते करा-तु ही नाहीं ऐकायच्या

--कुठं निघालांत तुम्हीं ?

--बाजारांत

--मग मला चांगला एक बनारसी खण, हिरवं टोप पदराचं लुगडं-कुंकवाची पेटी फणी-आरसा आणि मुलाकरितां खाऊं-आज मी आपल्या हातानं वाढणार आहे--

--काय विचार आहे तुझा ? तुला बरं वाटल्यावर एकच काय पण दहा लुगडी आणून देईन---

--मग काय हो उपयोग त्याचा ? आज मला हवं आहे. हे सारे पैसे नाहींत कां आपल्या जवळ ? ह्या घ्या पाटल्या-केव्हां तरी काढायच्याच आहेत.

--कल्पना आहे तुला माझ्या मनाला किती त्रास होतो आहे तुझ्या बोलण्यानं ! अगदीं एक शब्द बोलूं नको--

--इतके दिवस जसे बोललांत, तसें आजच्या दिवस तरी--मग होईल ना माझं ऐकायचं एवढं ? निघाला बाहेर म्हणून सांगतें. होईल ना आणायचं ?

कुठल्या जिभेनें मी ' होकार ' दिला- हेंच माझें मला कळेना

× × ×

दुपारचे तीन वाजले होते. तिला झालेल्या श्रमामुळें कल्पनातीत अशक्तपणा आला होता. तरी माऊली मुलाशीं गोष्टी करीत होती.

--बेबी, इकडे त्रास घ्यायचा नाहीं बरं कां !

आणि तुरे, लबाडा, दांडगाई नाहीं अशी करायची नेहमीं नेहमीं; दररोज सकाळीं उठून त्यांच्यापाशीं बसून अभ्यास करायचा--

--आई--मी कलीन तुझ्यापाशीं अभ्यास, दादा बिनई आमची पाती फोडतो.

--नाहीं ग आई, हिने माझं पुस्तक फाडलं-म्हणून मी तिची पाटी फोडली.

--कां असं दूरदूर बसायचं होतं माझ्यापासून ? पाळण्यांतून मुलीला द्या मजजवळ. मला घेऊं द्या तिला मांडीवर. आणायची ना तिला इकडे ?

' हट्टी ! हं घ्या

'ऊठ बाई-उठायचं ना ? किती वेळ झोंपायचं ? हंसा बाबा-हंसा. आमच्याकडे पाहून ! कां, केली रडायला सुरुवात ! बरं नाहीं, एक गोल पापा तरी'

--आणि आमचा ग

--दादाचा तेव्हंढा घेतला !

-- तुला सांगितलं ना तूं स्वस्थ पड म्हणून !

--अगदीं आतां स्वस्थ पडते हं ! माझं किनई डोकं मांडिवर घेऊन दाबायचं म्हटलं, नाहीं कां ऐकायचं ?

मी तिचें डोकें मांडीवर घेतलें, डोळ्यांतून घळघळ पाणी वाहूं लागले, तिच्या निस्तेज डोळ्यांतून अश्रु प्रवाह वाहत होता. एकमेकाशी पुष्कळ बोलावेसें वाटत होतें -- पण ते सारे दृष्टीनें

--काय हवं आहे तुला ?

--कांहीं नको. मुलांना जपा, स्वतःला, मला सोडून जायचं नाहीं अं कुठं आतां !

किती तरी वेळ ती माझ्याकडे पाहात होती. साता समुद्राचें अंतर तोडून जातां येईल, मोठमोठाले घाट-दऱ्या-पर्वत, ओलांडून जातां येतील ! परंतु हा घराचा उंबरठा ? कायमचा ओलांडून जाणें कठीण आहे ! पोलादी शृंखला तोडता येतील-पण मायेच्या रक्ताच्या सहवासाच्या शृंखला--?

मुलाच्या मायेला-पोटच्या लेकरांना-माझ्या उभारलेल्या संसाराला सोडून ती कायमची बंधमुक्त झाली.

निबंध

# २ अहिल्योद्धार

(श्री. र. गं. विद्वांस)

मंजुळा देसाईच्या घरीं जाऊन आलं, कीं, तिच्या घरीं ऐकलेल्या गमती नि तिच्या आईची हेल काढून बोलण्याची विचित्र लकब वगैरे गोष्टी आपल्या आईला सांगितल्याशिवाय मीनेला चैन पडत नसे. जणूं काय ही सारी माहिती सांगितली, म्हणजेच त्या दिवशींचा कार्यक्रम पुरा झाला असें तिला वाटे.

आणि आजहि मंजुळेच्या घरून निघाल्यानंतर ती जेव्हां लोकलमध्यें बसली, तेव्हां, तिच्या मनांत हेच विचार चालले होते. दुपारीं पोएट्रीचा तास संपल्यानंतर नेहमींप्रमाणें ती कॉलेजमधून घरीं यायला निघाली असतांना 'मंजुळा देसाई' नांवाच्या तिच्या एका मैत्रिणीनें तिला पार्ल्याला आपल्या घरीं चलण्याबद्दल आग्रह केला होता. त्यावर मीनेनें तिला कितीतरी वेळां सांगितलें, "आले असते ग! पण आईनं जरा लवकर घरीं बोलावलंय नी तुझ्याकडे आलें म्हणजे उगीच उशीर होईल."

त्यावर मंजुळा म्हणाली होती, "तर तर! म्हणे उशीर होईल! तें काहीं नाहीं. माझं नवं व्हायोलिन् पहायला आज येईन असं आठ दिवसांपूर्वीच कबूल केलंयस तूं! घरीं पाहायला तर नाहीं येणार ना कुणी?"

इतकें झाल्यावर 'नाहीं म्हणणें तिला शक्यच नव्हतें. आणि मग ती मंजुळेच्या घरीं गेली तेव्हां मंजुळेच्या आईनें तिला विचारलें, "काय मीनाताई, आला नाहींत बरेच दिवसांत?"

मीनेनें उत्तर देण्यापूर्वींच मंजुळेनें सांगितलें, "अग आई! आपलं माणूस आलं की मैत्रिणी दूर व्हायच्याच! परवांच तिच्या आई मला सांगत होत्या, की आमच्या मीनेचं लग्न व्हायचंय्. लवकरच बडोद्याचे नुकतेच बॅरिस्टर होऊन आलेले 'चंद्रकांत प्रधान.' म्हणून आहेत कुणी, त्यांच्याशीं!"

"पुरे ग! तुला उद्योगच नाहीं दुसऱ्यांचीं लग्नं लावण्याशिवाय! आई वाटेल तें म्हणेल, पण मी तयार पाहिजे ना!"

तोच तर वाद आहे! तूं जर लग्नाला तयार असशील तर तुझा तो तरुण बॅरिस्टरच काय, पण बरंचसं वय झालेले आपल्या कॉलेजचे प्रिन्सिपॉल पहिली बायको जिवंत आहे तरी खालीनं दुसरं लग्न करतील तुझ्याशीं."

जराशी रागावून मीना म्हणाली, "यासाठींच बोलावलंस वाटतं मला?"

तिच्या उत्तरानें मंजुळेला मनापासून हंसूं आलें, आणि आपल्या नेहमींच्या खेळकर पद्धतीनें आपले दोन्ही हात मीनेच्या खांद्यावर ठेवीत नि तिच्याकडे पहात ती म्हणाली, "बरं बाई! राह्यल!"

मग मात्र मंजुळेनें एक नवीन गाणें बसविलें होतें तें तिला वाजवून दाखविलें. नेहमींप्रमाणें चहा वगैरे झाला नि संध्याकाळीं ती परत दादरला आपल्या घरीं यायला निघाली.

घरीं जायला उशीर होणार नी अर्थातच अप्पा बाहेरून आलेले असणार. आपण दारांत दिसलों कीं ठराविक वाक्यांनीं स्वागत होणार आपलें—"या मीनाताई! सध्यां एकटी आहेस तों ठीक आहे. पण उद्यां चंद्रकांतांशीं लग्न झालं की कसं इतक्या उशिरापर्यंत बाहेर रहाता येणार ग तुला?"

जणूं काय या गोड थट्टेचा आस्वाद घेतां यावा म्हणूनच तिला कधींकधीं घरीं यायला उशीर करावासा वाटे.

लहानपणापासून मीनेला दुःख फारसें माहीत नव्हतें. वडिलांची चांगल्या प्रकारची सरकारी नोकरी आणि घरांत माणसे म्हणजे आई, ती स्वतः, वडील

नि धाकटे दोन भाऊ. चंद्रकांतच्या वडिलांचा नि त्यांचा फार घरोबा. चंद्रकांतचे नि मीनेचें लग्न व्हायचें असें लहानपणापासूनच ठरलें होतें. धांवत्या गाडीप्रमाणेंच मीनेच्या डोळयांपुढून ते प्रसंग वायुवेगानें धांवत होते.

रुबाबदार कपडे घालून, दुसऱ्यावर हुकमत चालविण्याची चंद्रकांताला लहानपणापासूनच हाव! एकदां लहानपणीं मीना आजारी होती. आठ दिवसांच्या तापानंतर ती ओढलेली नि कसलीतरीच दिसत होती. गाल आंत गेलेले नि तोंडावरचें तेज पार नाहींसें झालेलें. चार दिवसांत चद्रकांत तिच्याकडे फिरकला नव्हता, आणि तो आला तेव्हां डोळ्यांत पाणी आणून तिनें विचारलें, " चंदू! आला नाहींस ना-अगदीं चार दिवसांत?"

जरासें लांबूनच चंद्रकांतनें उत्तर दिलें, " शीः! कसली दिसतेस ग तूं! मला नाहीं आवडत तुझ्याजवळ बसायला."

" मग मी आजारी पडलें त्याला मी तरी काय करूं रे?" म्हणून तिनें मोठा गळा काढला.

चंद्रकांतचें आपल्यावर प्रेम आहे, कां आपल्या सौंदर्यावर नि पैशावर? असंच का असतं पुरुषी प्रेम?

आणखी कितीतरी वेळ तिचे विचार चालले असते; पण पाठीमागच्या बाकावर चाललेल्या संवादानें तिचें लक्ष वेधून घेतलें.

दोन गुजराथी शेटजी नि एक तरुण यांचा कांहींतरी वादविवाद चालला होता. प्रचलित राजकारण हा त्यांचा वादविवादाचा विषय होता, हें न सांगतांहि कळण्यासरखें होतें.

त्या दोन गुजराथ्यांपैकीं एक लठ्ठसा इसम त्या तरुणाला सांगत होता.

" अेर, तमी तरुण लोक कशाला राजकारणाच्या गप्पा करते? गांधी तो डाकोरनाथ छे! डाकोरनाथ!

त्या तरुणानें जराशा आवेशानें हातांतलें पुस्तक बाकांवर आपटीत उत्तर दिलें, ' हे पहा शेटजी, सत्य नी अहिंसेच्या नेभळट तत्त्वांवर विश्वास ठेवायला मूर्ख नाहीं आजची तरुणपिढी! खरं स्वातंत्र्य नी शांतता पाहिजे असेल तर व्यक्तित्वाची चाललेली गळचेपी नी कुचंबणा प्रथम थांबविली पाहिजे आणि ती

नि धाकटे दोन भाऊ. चंद्रकांतच्या वडिलांचा नि त्यांचा फार घरोबा. चंद्रकांतचें नि मीनेचें लग्न व्हायचें असें लहानपणापासूनच ठरलें होतें. धांवत्या गाडीप्रमाणेंच मीनेच्या डोळयांपुढून ते प्रसंग वायुवेगानें धांवत होते.

रुबाबदार कपडे घालून, दुसऱ्यावर हुकमत चालविण्याची चंद्रकांताला लहानपणापासूनच हाव! एकदां लहानपणीं मीना आजारी होती. आठ दिवसांच्या तापानंतर ती ओढलेली नि कसलीतरीच दिसत होती. गाल आंत गेलेले नि तोंडावरचें तेज पार नाहींसें झालेलें. चार दिवसांत चद्रकांत तिच्याकडे फिरकला नव्हता, आणि तो आला तेव्हां डोळ्यांत पाणी आणून तिनें विचारलें, "चंदू! आला नाहींस ना-अगदीं चार दिवसांत?"

जरासें लांवूनच चंद्रकांतनें उत्तर दिलें, "शीः! कसली दिसतेस ग तूं? मला नाहीं आवडत तुझ्याजवळ बसायला."

"मग मी आजारी पडलें त्याला मी तरी काय करूं रे?" म्हणून तिनें मोठा गळा काढला.

चंद्रकांतचें आपल्यावर प्रेम आहे, कां आपल्या सौंदर्यावर नि पैशावर? असंच का असतं पुरुषी प्रेम?

आणखी कितीतरी वेळ तिचे विचार चालले असते; पण पाठीमागच्या बाकावर चाललेल्या संवादानें तिचें लक्ष वेधून घेतलें.

दोन गुजराथी शेटजी नि एक तरुण यांचा कांहींतरी वादविवाद चालला होता. प्रचलित राजकारण हा त्यांचा वादविवादाचा विषय होता, हें न सांगतांहि कळण्यासरखें होतें.

त्या दोन गुजराथ्यांपैकीं एक लठ्ठसा इसम त्या तरुणाला सांगत होता.

"अेर, तमी तरुण लोक कशाला राजकारणाच्या गप्पा करते? गांधी तो डाकोरनाथ छे! डाकोरनाथ!

त्या तरुणानें जराशा आवेशानें हातांतलें पुस्तक बाकांवर आपटीत उत्तर दिलें, 'हे पहा शेटजी, सत्य नी अहिंसेच्या नेभळट तत्त्वांवर विश्वास ठेवायला मूर्ख नाहीं आजची तरुणपिढी! खरं स्वातंत्र्य नी शांतता पाहिजे असेल तर व्यक्तित्वाची चाललेली गळचेपी नी कुचंबणा प्रथम थांबविली पाहिजे आणि ती

थांबवायची म्हणजे, अंधश्रद्धेचा बळी दिला पाहिजे. छानछोकी नि विलास दूर सारून समाजवादी तत्त्वाची जोपासना प्रथम केली पाहिजे."

त्या तरुणाच्या चेहेऱ्यावर बोलतांना जो आत्मविश्वास दिसत होता, नी त्याच्या रुंदट भालप्रदेशावर येणाऱ्या केसांचा जो मनोहर खेळ चालला होता, तो पहात रहावा असें तिला वाटलें. त्याच्या उंच मूर्तीला त्याच्या अंगातला नेहरू शर्टही मोठा आकर्षक दिसत होता.

त्याचे ते मुद्दे खोडून काढतां येईनात म्हणून म्हणा, अगर गांधीबद्दलच्या त्यांच्या भावना दुखावल्या म्हणून म्हणा, पण ते दोघे शेटजी उठून पलीकडच्या बाकांवर जाऊन बसले.

त्या तरुणानें सहज मागे वळून पाहिले. मीनेची व त्याची नजरानजर होतांच दोघांनीहि स्मित केलें नी तो तरुण तिला उद्देशून म्हणाला, "पाहिलंत कशी गरम झालीत शेठमंडळी ती !"

मीनेने हंसत म्हटलें, "चालायचंच ! नाहींतरी कुठल्या तरुण पिढीचे विचार जुन्या पिढीला पटलेत आजपर्यंत; आणि त्यांतून गांधींना डाकोरनाथच्या पंक्तीला बसविणारी ही गुजराथी मंडळी !"

"मूठभर गुजराथी म्हणजे कांहीं तरुण पिढी नव्हे सारी ! आणि गुजराथी, बंगाली, मद्रासी, महाराष्ट्रीय हे भेद विसरायला नकोत का आजच्या तरुणांना ? एकट्या महाराष्ट्रीयांचा जसा हिंदुस्थान होऊं शकत नाहीं तसा तो एकट्या मद्राशांचा अगर गुजराथ्यांचाही होऊं शकत नाहीं."

तो तरुण आणखीहि बोलला असता आणि त्यानें तसेंच सारखे बोलत रहावे असें मीनेला वाटत होते, पण गाडी 'खार'च्या स्टेशनमध्यें शिरल्यामुळें नी "जगदीश ! जगदीश" म्हणून त्या तरुणाला कुणीतरी हांका मारल्यामुळें त्यानें खिडकींतून बाहेर पाहिले. सात आठ वर्षांची एक मुलगी प्लॅटफॉर्मवर उभी राहून त्या तरुणाला हांक मारीत होती.

खालीं उतरणाऱ्या त्या तरुणाला मीनेने विचारलें, "खारला राहतां आपण ?"

" छे ! पुण्याला असतों मी. मावशी आहे इथं माझी ! "

" अस्सं ! "

त्या लहान मुलीबरोबर दूर जाणाऱ्या त्या तरुणाकडे ती किती वेळ तरी पहात होती. ' जगदीश ' हे त्याचे नांव तिला मनापासून आवडले होते आणि. त्या तरुणाचे आडनांव नी व्यवसाय कळावा म्हणून तिला मनस्वी उत्कंठा लागली होती.

तिच्या मनांत आलें—" हे समाजवादी तरुण म्हणजे जरासे लहरी नी विक्षिप्तच खरे ! इतका वेळ बोलून आपलें नांवहि सांगितलं नाहीं नी माझंहि विचारलं नाहीं स्वारीनं ! ".

" चंद्रकांत राहिला असता कां अशा विचारांत नी वेषांत ? एकदा त्याच्या एका मित्रानें त्याला खादी वापरण्याबद्दल आग्रह केला होता, तेव्हां कितीं रागानें उत्तर दिलं होतं त्यानें ! " खादी वापरायला काय येरवड्याचा कैदी आहे मी ?

' खादी वापरणं म्हणजे कैदी होणं ? समाजवादी मतं बोलणं म्हणजे जुन्या पिढीचा उपमर्द करणं ? गांधींवर टीका करणं म्हणजे देशद्रोह करणं ? किती विचित्र कल्पनेचीं विचित्र माणसं ही ? कोणत्या नाजूक पण घट्ट तंतूनं हे जीव एकत्र जोडले जायचे ? "

ती परत बाकावर येऊन बसली.

तो तरुण बसला होता त्या जागेवर निळ्या कव्हरचें नी सुबक बांधणीचें एक पुस्तक पडलें होतें. मघाशीं-बोलतांना त्या तरुणाच्या हातांतलें तें पुस्तक तिथेंच चुकून राहिलें होतें.

'Daughters cf India' असें त्या पुस्तकाचें नांव असून नामवंत देश-सेविकांचीं शब्दचित्रें त्यांत दिलीं होतीं. निदान या पुस्तकावर तरी त्या तरुणाचें नांव असेल या अपेक्षेनें तिनें पहिलें पान उघडलें. उजव्या हाताच्या कोपऱ्यांत हिरव्या शाईनें बायकी अक्षरांत लिहिलें होतें——

Miss Ellsy Rooth
Green Csttege
SANTACRUZ

'असं काय ? कुणा तरी मैत्रिणीचं दिसतंय पुस्तक स्वारीच्या !' पण जगदीश या नांवापलीकडे त्या तरुणाचें नांव तिला कळलें नाहीं तें नाहींच !

दादर स्टेशन आल्यामुळें एका हातांत तें पुस्तक घेऊन नी दुसऱ्या हातानें पुढें पुढें येणारा वेणीचा शेपटा मागे करीत ती प्लॅटफॉर्मवर उतरली ती जवळ जवळ उडी मारीतच !'

संध्याकाळ होऊन बराच वेळ झाला होता—दोन तीन विद्यार्थी घोळका करून पलीकडे उभे होते-त्यांपैकीं एकजण म्हणाला—

"अरे ए ! ती पाहिलीत कां 'नॉर्मा शिअरर' ?"

मीनेनें तिकडे लक्ष दिलें नाहीं. अतिशय मूल्यवान वस्तु सांपडली म्हणजे माणसाला जसा आनंद होतो तसा आनंद तिच्या चेहेऱ्यावर दिसत होता.

ती घरीं गेली तेव्हां जराशा घाबरट स्वरांत आईनें विचारलें, "मीने ! किती उशीर केलास ग ?"

खांद्यावरचा पदर सारखा करीत तिनें उत्तर दिलें,

"इश्श ! आई, जरासा उशीर झाला तर काळजी करायला काय लहान आहे वाटतं मी ? आणखी तासभर आलें नसतें तर मला वाटतं पोलिसांत वर्दीच दिली असतीस तूं !"

"पोलीस कांहीं नाहीं, पण बडोद्याला तार ठोकणार होतो मात्र चंद्र-कांतला, की मीना आलीय का बडोद्याला म्हणून ?" टक्कल पडलेल्या आपल्या डोक्यावरून हात फिरवीत आंत येणाऱ्या अप्पासाहेबांनीं हंसत हंसत तिचें वाक्य पुरें केलें.

तिला एरवी ही थट्टा आवडली असती; पण आज जराशा रागानेंच तिनें उत्तर दिलें,

"चंद्रकांतशिवाय जगांत कांहींच कां नाहीं ?"

"अरे वा ! पण ए पोरी, हें पाहिलंस का ? आज दुपारच्या डाकेनं पत्र आलंय चंद्राच ते ! तुझ्या नांवावर आहे म्हणून फोडलंहि नाहीं मी !"

अप्पांनीं दिलेलं तें पत्र घेऊन ती आपल्या खोलींत गेली. एरवीं तिला

त्या खोलींबद्दल केवढा अभिमान वाटे! पण आज–ती अस्ताव्यस्त पडलेली बरीचशीं रंगींबेरंगीं पातळें व निरनिराळे ब्लाऊझ, उंची फर्निचर, नी टेबला-वरचा फ्लॉवरपॉट–सारं सारं तिला भडक नि कृत्रिम वाटलें.

चंद्रकांताचें पत्र तिनें फोडलें. भडक रंगाच्या त्या कागदाला कसला तरी उग्र सेंटचा वास येत होता नी त्यावरील अक्षरें जरी काळजीपूर्वक काढण्याचा प्रयत्न केला होता तरी तीं बरींचशीं विकृत वाटत होतीं. भरकन् पत्रावरून तिनें नजर फिरविली.

'बॅरिस्टर होऊन आल्यापासून तुझी नी माझी निवांतपणें भेट झाली नाहींच, नाहीं? एकदां बडोद्याला ये ना! काय झालं एखादे वेळीं कॉलेज बुडालं म्हणून? लग्न झाल्यावर इंग्लंड रिटर्नड–बॅरिस्टर चंद्रकांतबरोबर निरनिराळीं पातळं नेसून समारंभ नि पार्ट्या घेण्यांतच वेळ जाणार तुझा! मजा असते नाहीं तुम्हां बायकांची! कष्ट करायचे आम्ही नि बॅरिस्टरीण म्हणून मिरवणार तूं! बरं, असो. लंडनला असतांना केलेल्या गमती तुला सांगायच्या आहेत एकदां–किती भित्र्या असतां तुम्ही हिंदु मुली ग! नाहीं तर लंडनच्या मुली! किती खेळ-कर! सारं समक्षच सांगेन तुला मी.

चंद्रकांत

ता. क.—मीने! तुला दुसरं एक सांगायचय! तुझ्या अप्पांनीं माझा बॅरिस्टरीचा निम्मा खर्च द्यायचा कबूल केलंय! एकदां गोष्ट काढून पहा ना! आपल्या दोघांच्याही भावी आयुष्याच्या दृष्टीने फायदेशीर आहे तें!"

तिनें तें पत्र रागानें दूर भिरकावून दिलें. आणि दिव्याचा प्रकाश असह्य झाल्यामुळें तो बंद केला. गाडींत सांपडलेलें तें निळें पुस्तक ती तोंडावर धरून स्वस्थ पडून राहिली. स्टेशनवरील गाड्यांची धांवपळ नि तिथल्या गडबडीचा संमिश्र ध्वनी कानांवर येत होता.

जेवायला बोलवायला आलेल्या आईला तिनें तुटक उत्तर दिलें.

"खरंच ग, मला अगदीं भूक नाहीं पडूं दे ना मला अशीच! अं!"

× × ×

त्यानंतर चार दिवसांनीं तिच्या कॉलेजला कसलीशीं सुटी होती नि त्यामुळें 'ग्रँटरोडला' तिची एक मावशी रहात असे. तिच्याकडे जायला म्हणून ती सकाळींच निघाली होती.

मावशीकडे जायचं म्हणजे आणखी एक महत्वाची कामगिरी तिला करावी लागे –नि ती म्हणजे कसलें तरी सुंदरसें पुस्तक तिला नेऊन द्यायचें. मावशींना इतर पुस्तकें मिळत नसत असं नाहीं, पण कांहीं माणसांचा मनोधर्म असा विलक्षण असतो कीं–विविक्षित गोष्टी विविक्षित व्यक्तीकडून झाल्या तरच त्या हव्याशा वाटतात. त्यांतलीच ही एक होती.

टेबलावरचें ' Daughters of India ' हें पुस्तक घेऊन ती बाहेर पडली. डब्यांत तिच्याच पलीकडे एक अँग्लो इंडियन तरुणी बसली होती. वर्णानें ती बरीचशी गौर असली तरी अस्सल गौरवर्ण म्हणतात तो तिच्या ठिकाणीं नव्हता. आपले पिंगट केस मधोमध भांग पाडून दोन्ही बाजूंनी तिनें सोडून दिले होते. आणि तिनें घातलेल्या निळ्या रेशमी झग्यांतून तिचा पीत वक्ष भाग उठून दिसत होता.

वास्तविक त्या तरूणीकडे लक्ष द्यायचं तिला कांहींच कारण नव्हतें, पण त्या तरूणीजवळ डाव्या हाताला जी एक छोटीशी कातडी हँडबॅग होती त्यावर जो पत्ता लिहिला होता तो स्पष्ट दिसत होता—

Miss Eliza Rooth
Green Cottage
SANTACRUZ

आपल्याला ही बाई काय म्हणेल, शिष्टाचाराचा आपल्याकडून भंग होईल कीं काय, याचा यत्किंचितहि विचार न करता मीनेनें जवळ जाऊन तिला विचारलें,

" माफ करा हं! पण एलिझा रूथ आपण ? "

ही घाऱ्या डोळ्यांची सुंदर तरुणी आपलें नांव कां विचारते याचा उलगडा न होऊन तिनें जराशा चमत्कारिक आवाजांत सांगितलें; " हो मचि, कां वरं ?"

" तर मग हें पुस्तक आपलंच का ? "

रविवारीं दुपारीं बंगल्याबाहेर पडतांना–जॉर्जेटच्या पातळावर खुलून दिसणारा वेणीचा शेपटा खादीच्या पातळावरहि तितकाच खुलून दिसतो हें पाहून तिचं तिलाच समाधान वाटलं.

ती सांताक्रुझला रूथकडे गेली, तेव्हां रूथ कांहीं तरी वाचीत पडली होती. मीना खारकर ' ला पाहातांच तिच्याशीं ' हस्तान्दोलन ' करीत ती म्हणाली,

'माझ्याशी, गप्पा मारणं तुम्हाला कंटाळवाणं नाहीं ना वाटणार ? '

जरासें गोंधळून मीनेनें विचारलें,

' म्हणजे ? '

' म्हणजे असं ! अं ! हें पत्रच पहा ना ? '

रूथनें पुढें केलेल्या पत्रावरून मीनेनें नजर फिरविली--

" मी यणार होतों तुझ्याकडे, पण आतां मला कितपत जमेल याची शंका वाटते. म्हणजे मी मुंबईला येणारच; पण तुझ्याकडे मात्र शक्य झालं तरच येईन. रागावणार नाहींस ना ?

' दुसरी एक गोष्ट लिहायचीय तुला. नक्की रागावशील तूं. परवां मी तुझ्याकडून वाचायला घेतलेलं पुस्तक ' Daughters of India ' गाडींत राह्यलंय विसरून. गाडींत नि लढाईंत हरवलेल्यावस्तू क्वचितच परत मिळतात पण कुणा महाभागानं तें परत आणून दिलं तर मी त्याचा फार आभारी होईन. '

अत्यंत आवडत्या नाटकाच्या खेळाला जावं नी कांहीं अपरिहार्य कारणानें खेळ बंद असावा म्हणजे जसें माणसाला वाटतें तसे मीनेला झाले.

कांहीं वेळ बसल्यानंतर ती म्हणाली—

' जाते बाई मी आतां ! मावशी यायचीय घरीं. '

रूथ नी ती बंगल्याबाहेर आली. समोरून येणाऱ्या एका व्यक्तीकडे पाहून जराशा आनंदानें, हातरुमाल हालवीत रूथ म्हणाली.

" अय्या ! जगदीश ! खरंच ! "

मीनेनें चमकून समोर पाहिलें. एका हातानें रुमाल हालवीत नि लांब-लांब पावलें टाकीत जगदीश येत होता.

कां कोण जाणें, पण आपल्या छातींत कुठेंतरी बांध बसल्यासारखे होते आहे असें तिला वाटलें. उगीचच तिने आपले पातळ सारखे केल्यासारखें केलें.

मीनेला पाहून थोडेसे चमकून त्यानें विचारलें.

' परवां आपल्याला लोकलमध्यें पाहिल्यासारखं वांटतय कुठंतरी. आमच्या या मैत्रिणीची नी तुमची बरीच गट्टी दिसते कीं ?'

' अंहं ! ' रूथनें त्याचा हात आपल्या हांतात घेत सांगितले, ' उलट तुझ्या विसरभोळेपणानंच यांची नीं माझी ओळख झाली, आणि तूं येणार म्हणून मुद्दाम बोलावलयं मी यांना ! "

" खरंच ! ती कशी काय ? "

मग रूथनें तें पुस्तक कसें विसरलें वगैरे माहिती सांगून मीनेची त्याला ओळख करून दिली; तेव्हां तो मीनेला म्हणाला—

' खरंच ! तुमचे आभार कसें मानावें तेंच मला कळत नाहीं. पण जर कां तुम्ही हें पुस्तक परत आणून दिलं नसतंत तर आजची ' बडी मेजवानी ' एल्सीनं माझ्यावरच भागविली असती."

त्याच्यावर एवढाले डोळे करीत लटक्या रागानें रूथ म्हणाली, " पाहिलंत ! तुमच्या मराठींत म्हण आहे ना, चोराच्या उलट्या......"

' जगदीश आणि मीना ' दोघेहि तिच्या बोलण्यावर मनापासून हंसली.

चहा पीतां पीतां जेव्हां मीनेनें त्याला विचारलें, कीं इतर गोष्टीकडे आपल्या बुद्धीचा उपयोग करायचा सोडून तुम्ही मास्तरकी कां करितां ? तेव्हां हातांतला कप अर्धवट खालीं ठेवीत त्यानें सांगितलं—" ज्या शाळेंत मी शिकत होतो तिथंच अगदीं अल्प वेतनावर काम करतोय मी ! कदाचित् सोडूनही द्यावं लागेल मला."

" कां ? "

" सध्यां संपबंदी बिल चालूं आहे ना ! मजुरांच्या हक्कावर गदा आणणारं बिल आहे तें. परुळेकर, आंबेडकर, जम्नादास, झाबवाला तुटून पडतात

नुसते सरकारावर. त्या बिलाच्या निषेधार्थ लवकरच संप घडवून आणायचाय् तेवढ्याचसाठीं मला परत मुंबईलाहि--यावं लागेल. "

मीनेला त्याच्या बोलण्याचें कौतुक वाटलं. तिच्या मनांत आलं; "चंद्रकांत इथं असतां तर ? आपण लंडनमध्यें काय केलं हेच सांगत सुटला असता तो ! नवीन सूट घालायच्या तऱ्हा काय आहेत नी हिंदी लोक इतरांच्या मानानं किती बावळट आहेत हेंच पुराण त्यानं लावलं असतं. "

लहानपणापासून पाहिलेल्या चंद्रकांताबद्दल आपल्याला इतका तिरस्कार कां वाटावा नी एकदोन वेळा पाहून नुकत्याच ओळख झालेल्या जगदीशबद्दल इतका आपलेपणा कां वाटावा याचें तिला आश्चर्य वाटलें.

घरीं परत जातांना दोघंहि बरोबरच निघाली. खारच्या स्टेशनवर तो उतरला, तेव्हां मीनेनें त्याला विचारलें, ओळख ठेवाल ना गरिबाची ? "

त्यानें सांगितले, " तुमची ओळख विसरणं शक्य आहे कां कधीं ? "

× × ×

त्यानंतर खरोखरच जगदीशला शाळेतली नोकरी सोडावी लागली. संपबंदी बिलाविरुद्ध जितकें प्रचंड लोकमत करतां येईल तितकें करण्याबद्दल त्यानं खटपट चालविली होती. आणि मजूर पक्षाकडूनही या बिलाला तीव्र असंतोष दाखविण्यांत येत होता.

ता. १६ ऑक्टोबर १९३८ रोजीं या बिलाच्या निषेधार्थ मुंबईला परळ येथील कामगार मैदानावर जी प्रचंड सभा भरली होती त्यांत डांगे, निमकर वगैरे मजूर पुढाऱ्यांचीं भाषणे झालींच, पण जगदीशनेही छोटेसें भाषण केलें. त्यानें सांगितले--

कॉंग्रेस सरकार हे बिल पुढें आणून, भांडवलवाल्यांना पाठीशीं घालण्याचा प्रयत्न करीत आहे, आणि हुकमी बहुमतामुळें ते पास होणं अवघडहि नाहीं. हे बिल म्हणजे 'कामगार नि कारखानदार' यांना जोडणारा दुवा ! म्हणून कॉंग्रेसछाप वृत्तपत्रांनीं सरकारला 'दुवा' द्यायचा कितीहि प्रयत्न केला तरी कॉंग्रेसनें हें पूर्ण लक्षांत ठेवावं, कीं 'कॉंग्रेस गरिबाची कनवाळू आहे' ही भाषा यापुढें

बोलतां येणार नाहीं. ' मालक आणि मजूर ' यांच्यामधली मोठी दरी आहे. हे बिल म्हणजे मजुरांना मालकाविरुद्ध कधींच जाता येणार नाहीं. संपवाल्या मजुरांना अन्नपाणी देणं हाही सरकारनं गुन्हा ठरविला आहे. उठल्यासुटल्या संप करणं म्हणजे ' महालक्ष्मीवर ' जाऊन रेस खेळणं नव्हे हें सरकारला समजायला हवं होतं. ' ट्रेड युनिअन 'ची ही चळवळ दडपून टाकणारं हे बिल आणून काँग्रेस सरकारनं माणुसकीला काळं फासलं आहे. आणि म्हणून ता. ७ चा संप सर्वतोपरी यशस्वी करून या बिलाला कामगार वर्गाचा केवढा विरोध आहे हे दाखविण्याची वेळ आली आहे, असं मला वाटतं. कामगार अर्धपोटीं राहिले; त्यांच्या अंगांत त्राण नसलं, तरी अद्याप ते मनानं जिवंत आहेत हे सरकारला कळूं द्या."

बोलतांना त्याच्या चेहेऱ्यावर छाया-प्रकाशाचा जो मनोहर खेळ होत होता तो प्रचंड जनसंमर्दात अगदीं पुढें उभ्या असलेल्या मीनेला फार मोहक वाटला. आणि भाषण संपवून तो खालीं बसला तेव्हां उत्साहातिरेकानें ' हिअर हिअर !' हे शब्द तिनें इतक्या जोरानें म्हटलें कीं तिच्या आसपासच्या लोकांनीं जराशा विचित्र नजरेनें तिच्याकडे पाहिलं.

व्याख्यान संपल्यावर ' जगदीश 'जवळ जाऊन ती म्हणाली,

' किती छान बोलतां हो तुम्ही ! माझी कांहीं मदत होईल कां तुम्हांला ? '

" हो ! या वस्तींत हिंडून इथल्या बायकांची मनं वळविणं हे केवढं तरी काम आहे तुम्हाला करतां येण्यासारखं. "

" खरंच ! "

" तर ! मी पुण्याला जाणार आहे उद्यां नी चार दिवसांनीं पुन्हां परत येईन. "

" मग मी एकटीच काय करूं बाई ? "

" वा ! असं कसं ? इथं एक तरुण कार्यकर्त्या आहेत 'सुशिलाबाई पाटसकर' म्हणून, त्यांची नी तुमची ओळख करून देतों. "

आणि त्यानें खरोखरच सुशिलाबाईशीं तिची ओळख करून दिली.

× × ×

मीनेचा एका समाजवादी तरुणाशीं वाढता परिचय आणि तिनें त्या सभेला हजर रहाणें अण्णांना आवडलें नाहीं. त्यांच्या ' रावसाहेब ' या सुरवंटाचं रूपांतर ' रावबहादुरांच्या ' फुलपाखरांत अद्याप व्हावयाचे होते. फार तर कपडे नि शिक्षण या बाबतींत मीनेनें स्वातंत्र्य घ्यावें, पण असल्या पेटत्या राजकारणांत तिनें उडी घालूं नये, असें त्यांना व त्यांचे भावी जामात ' चंद्रकांत ' यांना वाटत होते. अण्णांनीं तिची जराशी कानउघाडणी केली नि तिला चंद्रकांतचें पत्र दाखवून म्हटलें,

" पाहिलंस ! परवां तूं सभेला गेल्याचं नी कुठल्याशा कॉमरेड बरोबर हिंडत असल्याचं त्याला कुणीतरी कळवलंय. लग्नाच्या बाबतींत आधिक थांबायला तो तयार नाहीं. तुझी संमति आहे असं समजून त्याला उत्तर धाडलंय मी ! "

मीनेनें जराशा रागीट नजरेनें त्यांच्याकडे पहात म्हटलें

" अण्णा..."

× × ×

दिपावलीच्या दिवशीं मीनेला चंद्रकांताकडून दोन वस्तू भेट म्हणून आल्या. एक पॅरिसमध्यें तयार केलेला स्त्रियांनीं गळयांत घालायचा अलंकार, नि दुसरी वस्तू म्हणजे मोहक बांधणीचे एक पुस्तक; HOW TO WRITE LOVE LETTERS !

त्याखालीं दोन ओळी लिहिल्या होत्या--

" यापुढचीं तरी तुझी पत्रं काव्यमय नि मोहक येतील ना ? "

त्या वस्तूंबद्दल तिला आनंद झाला नाही; पण त्या परत करणेंहि शक्य नव्हतें.

त्याच दिवशीं संध्याकाळीं एलिझा रूथ तिच्याकडे आली ती हातांत कसलेसें पुडकें घेऊन.

आळसानें आरामखुर्चीत पडलेल्या मीनेपुढें तें फेकीत ती म्हणाली, 'हे घ्या तुमच्या पुण्याच्या मित्राकडून आलेलं दिवाळीचं बक्षीस ! '

मीनेनें अधीरतेनें तें पुडकें सोडलें. साधेंच पण आकर्षक असें खादीचें पातळ होतें तें, आणि आंत असलेल्या चिठ्ठीवर लिहिलें होतें—" यापेक्षां जास्त चांगलं बक्षीस काय देणार मी ?"

नंतर रूथ जेव्हां कांहीं वेळानें परत गेली तेव्हां मीनेनें आपल्या खोलीचें दार घट्ट बंद केलें. सकाळपासून टेबलावर ठेवलेले चंद्रकांताकडून आलेले ते दोन जिन्नस तिनें दूर भिरकाविले. आणि ते खादीचें पातळ छातीशीं घट्ट धरीत गद्‌गद् स्वरांत ती म्हणाली—

" जगदीश ! जगदीश ! कधीं कळेल माझं अंतःकरण तुम्हाला ? "

× × ×

जगदीश पुन्हां मुंबईंत आला. सात तारखेच्या संपाकरितां त्याची नि त्याच्या सहकाऱ्यांची रात्रंदिवस मेहनत चालूं होती. तहानभुकेची पर्वा न करितां ते मजूर वस्तींतून हिंडत होते.

ता. ३० ऑक्टोबर १९३८ रोजीं कलकत्ता येथें ऑक्टरलोनी स्मारकाजवळ ' अखिल भारतीय ट्रेड युनिअन ' तर्फे ' डॉ. सुरेशचंद्र बानर्जी ' यांचे अध्यक्षतेखालीं कामगारांची प्रचंड सभा होऊन तींत मुंबई सरकारच्या संपबंदी बिलाचा तीव्र निषेध करण्यांत आला. त्याच दिवशीं नागपूरला अशीच प्रचंड सभा भरून तींतही या बिलाचा निषेध करण्यांत आला होता.

खुद्द मुंबईंत सात तारखेच्या संपाकडे सर्वांचे डोळे लागून राहिले होते. कामगार जगांत प्रचंड जागृती झाली होती.

काँग्रेसचीं पत्रें नि पुढारी आपल्या नेहमींच्या भाषणांनीं संपाचा तीव्रपणा कमी करण्याचा प्रयत्न करीत होती; पण खरोखरीच त्याचा कांहीं उपयोग नव्हता.

× × ×

संप मिरवणुकींत भाग घ्यायची मीनेला विलक्षण इच्छा होती. पण चार तारखेलाच अप्पांच्या सांगण्यावरून तिला पुण्याला आपल्या मामांकडे जावं लागलं.

जगदीश टिळकरोडवर रहात होता, तो पत्ताही तिला माहीत होता, नि त्याला एकट्या श्रीमंत आत्येशिवाय कुणीहि जवळचे नातलग नव्हते हेंहि तिला माहीत होतं.

पण त्या आत्येची नि तिची ओळख नव्हती. आणि खुद्द जगदीश तर मुंबईंत

नंतर एक दिवस ती आपल्या मामीबरोबर त्यांच्या नवीनच ओळख झालेल्या बाईकडे बसायला गेली होती. तेव्हां तिला कळलं कीं या नवीन बाई दुसऱ्या तिसऱ्या कुणी नसून जगदीशच्या आत्याच होत्या.

× × ×

सात तारखेच्या संपाकडे परीक्षेच्या निकालाइतक्या अधीरतेनें मीनेचे डोळे लागले होते. एकदां तिला वाटे; 'संप संप असा काय? एक दिवसाचा प्रश्न नि-पोलिस तर पर्यायानें आपलेच! आहे काय त्यांत!

खुद्द पुण्यांतहि संपाचा जोर बराच होता; बहुतेक छापखाने बंद होते नि संध्याकाळीं बुधवार चौक; अप्पा बळवंत चौक वगैरे ठिकाणीं टोळया करून उभे असलेले तरूण–आपआपसांत मुंबईच्या संपाबद्दलच बोलत होते.

मुंबईचा संप कल्पनेबाहेर यशस्वी झाला होता. जवळजवळ ऐंशी हजार मजूर संपांत सामील झाले होते.

दुपारीं अकरा वाजतां संपवाल्यांनीं डिलाइल रोडवर जराशी गडबड करून विटकरीचे तुकडे फेकले नि गोऱ्या नोकरशाहीलाहि लाजविणारें कृत्य कॉंग्रेस सरकारनें प्रथम लाठी नि नंतर गोळीबार करुन केलें.

दोघेजण ठार होऊन बऱ्याच जणांना तीव्र जखमा झाल्या. खुद्द जगदीशच्या कपाळावर जबरदस्त तडाखा बसून चांगलीच जखम झाली होती. हॉस्पिटलमध्यें नेल्यावर जवळजवळ सहा तासांनीं तो शुद्धीवर आला.

त्याच दिवशीं संध्याकाळीं कामगार मैदानावर पुन्हां प्रचंड सभा भरून तींत संपबंदी बिलाची गांधी टोपी नि चष्मा घातलेली प्रतिमा जाळण्यांत आली.

आणि दादर विभागांत पुन्हां गोळीबार होऊन 'बहिरू चव्हाण' नांवाचा एक मजूर जखमी झाला. तो त्याच रात्रीं हॉस्पिटलमध्यें मरण पावला. पण ही गोष्ट दुसरे दिवसपर्यंत गुप्त ठेवण्यांत आली होती

पण त्याच्या बायकोला जेव्हां ही गोष्ट कळली तेव्हां पुढाऱ्यांच्या मदतीनें तिनें तें शव आपल्या ताब्यांत घेतलें नी मग त्या 'शवाची' प्रचंड मिरवणूक काढ-ण्यांत आली.

जगदीश त्यांत भाग घेणार होता पण त्याच्या मित्रांनीं रात्रीच्या गाडीनें त्यास पुण्यास पोंचते केले.

× × ×

दुसरे दिवशीं सकाळी मीनेनें जेव्हां वर्तमानपत्रांत ही सारी हकीकत वाचली तेव्हां संपाचा तीव्रपणा तिच्या लक्षांत येऊन तिला भीती वाटली. ‘ जगदीश’ना लागलं तर नसेल अशी शंका येऊन तिनें वर्तमानपत्राचा कोपरान कोपरा वाचला आणि जगदीश कर्वे, यांना थोडासा मार बसल्याचें तिनें वाचलें, तेव्हां तर ती चांगलीच घाबरली.

आणि संध्याकाळीं कांहीं जास्त बातमी कळेल—म्हणून ती ‘ जगदीश ’च्या आत्येकडे गेली, तेव्हां ‘जगदीश ’ आल्याचं तिला कळलं.

त्याच्या बाहेरच्या बसावयाच्या खोलींतच ‘ कॉटवर ’ तो पडला होता. कपाळाला पट्टी बांधली होती नि चेहेऱ्यावर ग्लानी आली होती, तरी त्यावर नेहमीं दिसणारी लढाऊ वृत्ति तशीच कायम होती.

मीना आंत आली तेव्हां दोन हात डोक्याखालीं घेऊन तो पडला होता. तिनें जवळ जाऊन विचारलं—

‘ कसं काय वाटतंय ? ’

‘ ठीक आहे कीं ! नि आतां तर जास्त बरं वाटायला लागलयं ? ’

‘ खरं ! कां ? ’

‘ तुम्हीं आलांत म्हणून ’

‘ इश्श ! ’

‘ इश्श नाहीं ! खरंच ! मुंबईला मला मदत करायचं आश्वासन दिलं होतं ना ! इथं खरं करावं लागेल ते ! ’

‘ तयारी आहे माझी ! ’

‘ मग पलीकडे तेवढं मुसुंब आहे ते घ्या बरं. मला या नि प्राप्तीचा अर्धावाटा म्हणून........ ’

‘ आतल्यां खोलींतून आत्या आल्यामुळें संभाषण तितकंच राहिलं.

× × ×

त्या रात्रीं आत्याबाईंना सोबत म्हणून ती तिथंच राहिली होती. जगदीशला बरं बाटत असल्यामुळें आत्या आंतल्या खोलींत जरा आडव्या झाल्या होत्या.

मंद निळा प्रकाश खोलींत पडला होता, नि 'जगदीश' शांतपणें झोंपला होता. मीना टेबलावर कसलंसं पुस्तक वाचीत बसली होती. वाचतां वाचतां त्या पुस्तकांतून एक वहीचं पान खालीं पडलं.

तिनें तें हलकेंच उचललें. त्यावर तारीख नव्हती, पण सुबक अक्षरांत *लिहिलं* होतं.

'अहिल्या रामाच्या चरणस्पर्शानें पुनीत झाली. आपला समाज तरी काय? शीला *होऊन पडलेली आहिल्याच! खाणंपिणं! उंची कपडा!* संगीत, सिनेमा, उत्तम नि शिकलेला रंगेल नवरा नि सुंदर पत्नी या पलीकडे आमचं लक्षच जात नाहीं. चैन एवढीच गोष्ट, शिक्षण जर आयुष्यांत शिकवत असेल तर ते नसलेलचं चांगलं नाहीं कां? या शीला बनलेल्या आहिल्येला पावन करून माणसांत आणणारा राम कधीं भेटेल?"

कितीतरी वेळ त्या कागदाकडे ती पहात होती. आपणही शीला बन-लेली आहिल्याच नव्हतो कां? बॅरिस्टर 'चंद्रकांत प्रधान' आपले पती होणार म्हणून केवढा आनंद होत असे आपल्याला! पण आतां! माझं माणसांत रूपांतर कुणीं केलं? 'जगदीश' नें?

तिनें चमकून त्याच्याकडे पाहिलं, आणि अगदीं हलक्या पावलानें ती त्याच्या बिछान्याजवळ गेली. किती शांत झोपला होता तो!'

अतृप्त नजरेनें त्याच्याकडे पहात हलकेंच पण जलदीनें तिनें आपले ओठ त्याच्या ओठावर टेकले.

शेजारच्या घड्याळांत पडणारे 'बाराचे ठोके' शांत वातावरणांत विलीन होत होते.

# ३ ईश्वर मृतात्म्यास शांति देवो !

( श्री. गोविंद भिकाजी रानडे )

पैसे खर्चल्याशिवाय बंबईची मजा चाखतां येत नाहीं—शील विकल्याशिवाय नटी होतां येत नाहीं--याच सुरावर 'मेल्याशिवाय स्वर्ग दिसत नाहीं' हें लक्षांत घेऊन जगांतील प्रत्येक 'माणूस' स्वर्गांत तरी 'सुखाचा शोध' लागतो कीं नाहीं हें पाहण्याकरितां परलोकास गाजावाजा न करतां रवाना होऊं शकतो. एखादा सुप्रसिद्ध इसम मृत पावला तर त्याच्या आप्तांना अपरंपार दुःख होतें; पण वात्रट विद्यार्थ्यांना मात्र एक दिवस फुकटची सुट्टी मिळाली म्हणून आनंद होतो. कांहीं वर्तमानपत्राचे संपादक--"पाहा त्यानं मरतां मरतां सुद्धां आम्हाला मृत्युलेखाचा मजकूर पुरवून आमच्यावर उपकार केले"---असं म्हणायला कमी करीत नाहींत !

हे सुप्रसिद्ध मृत आसामी जन्मभर उद्योगांत असल्यामुळें त्यांना जिवंतपणीं 'चार घांस' खायला फुरसत नसते. आणि मेल्यानंतर वर्षश्राद्धाच्या दिवशीं वर्तमानपत्रांतील अफाट स्तुतीमुळें श्राद्धाचे 'चार पिंड' खायला सुद्धां त्यांना जड जातें. स्मशानभूमीवर एखाद्या अगांतुकाला वक्तव्याची उर्मी भरून येते व तो त्या मृत व्यक्तीची एवढी तोंड फाडून स्तुति करतो कीं, ह्या तोंडाळ

माणसाच्या दोन तोंडांत द्याव्यात असं त्या मृत व्यक्तीला वाटत असेल. **पण** कोणी याच्या तोंडाला तोंड द्यावं असा विचार करून मृत व्यक्ति गप्प बसते. 'इतरांत नसतें तें आमच्या पत्रात असतें ' ह्या ब्रीदाचं लोढणं अंगावर घेतलेले कांहीं संपादक मृत व्यक्तीच्या ' बुद्धीची ' तारीफ न करतां त्यांच्या शारिरीक अवयवांची देखील मन मानेल तशी स्तुती करतात ! कांहीं संपादक मृत पशुपक्षांकरतां आपल्या पत्रांचे चार स्तंभ खर्ची घालतात. वाचकहो; मी खालीं कांहीं मासलेदार नमुने देण्याची कोशीस करीत आहे. ते शेवटपर्यंत वाचाच. पण वाचतां वाचतां कांहीं ' कमीअधिक ' झाल्यास कृपा करून ह्या बिचाऱ्या लेखकाला भूत होऊन पछाडू नका. सावधान !

× × ×

## शेळी स्वर्गवासी झाली !

दिनांक २४ रोजीं गडहिंग्लज येथें एक पठाण एका धनगराकडे दिलेलें ५ रु. चें कर्ज मागण्यासाठीं गेला होता. धनगरानें आदले दिवशींच सरकारांत ' सारा ' भरला असल्यामुळें त्याच्या जवळचा ' सारा ' पैसा संपला होता. चार पांच दिवसांनीं मी तुझ्या पैशाची परत फेड करीन असें धनगरानें पठाणास ' दोन हात ' जोडून सांगितलें, पण पठाण हमरीतुमरीवर येऊन त्याच्याशीं ' चार हात ' करूं लागला. शेजारीं गोठ्यांत असलेल्या शेळीला हें सहन न होऊन व 'पठाणापुढं हिंदू शेळी बनतों' ही म्हण तिच्या कोंवळ्या मनाला लागून ती धनगराच्या मदतीस ' वाघासारखी ' धांवून गेली ! तिनें पठाणाला एक जोराची ढुशी दिली.त्याबरोबर पठाण 'या अल्ला' म्हणत शेजारीं असलेल्या दगडावर आपटला. पण अल्लानं त्याच्याकडं येण्याऐवजीं तोच डोकें दगडावर आपटल्यामुळें अल्लाकडे रवाना झाला ! पोलिसांत धनगरानें पठाणास मारलें असा रपोट जाऊन धनगर फांशीं गेला ! आपण दोघांच्या प्राणांस ' कारणीभूत ' झालों— आतां दोघेजण आपणांस ' भूत ' होऊन छळतील ह्याची हाय घेऊन ती शेळी आजारी पडली. कॉंग्रेसची एक स्वयंसेविका त्या शेळीला औषध देण्याचा प्रयत्न करीत असे. पण मुंडी खालीं घालून ती ' नीरा ' पाहिजे असा आग्रह धरी. परतेशेवटीं ती शेळी झिजून झिजून मेली.

शेळीच्या स्मशानयात्रेस मुद्दाम गांधींची शेळी आली होती, कांहीं बोकड, पुष्कळसे खेडवळ एडके, उत्तर हिंदुस्थानांतील मेंढे, गुजराथच्या कांहीं बकऱ्या, इ. इ. हजर होते. स्मशानयात्रा चालली असतांना 'खादा' न दिलेल्या शेळ्या आजूबाजूच्या बाभळीच्या शेंगा खात होत्या. 'राम बोलो भाई राम बोलो' या चालीवर शेळ्या त्यांचें ऑल इंडिया कमिटीनें मान्य केलेलें "बेंऽबें ऽऽऽ बें ऽऽऽ" हें गीत झिंजोटी रागात म्हणत चालल्या होत्या. स्मशानयात्रा योग्य स्थळीं जाऊन पोंचल्यावर शेवग्याच्या शेंगांची चिता रचण्यांत येऊन मृत शेळीला त्यावर ठेवण्यांत आलें व तिच्यावर 'किस झाडका पाला' टाकण्यांत आला. त्यानंतर मृताला अग्नी दिला गेला !

नंतर पुष्कळ वक्त्यांची शेळीच्या गुणवर्णनपर भावनाशून्य नि हृदयविदारक भाषणें झाली. प्रथम पुण्यांतील शेळयांचे प्रतिनिधी उठलें, ते म्हणाले—

"शेळ्या ही हिंदभूची संपत्ती आहे. मुसलमान लोकांचें खाद्य आहे. धनगरानें पठाणाकडून कधींहि कर्ज घेऊ नये. घेतल्यास काय परिणाम होतात हें त्या मृत शेळीच्या चरित्रावरून तुम्हांस कळून चुकलें आहे......खाटकांच्या तावडींतून आपली सुटका करून घेण्यासाठीं एकजूट करा कष्ट करा. कष्ट करा. ( टाळ्या ).

त्यानंतर दोनतीन वक्त्यांची मामुली भाषणें झाल्यानंतर गांधींची शेळी बोलण्यांस उठली प्रथम तिनें 'वैष्णव जन तो' हें गीत गाईलें. ती म्हणाली 'शेळी ही एक य:कश्चित वस्तू आहे अशा दृष्टिकोनानें आजपर्यंत मानवजात आमचा उपमर्द करीत आली आहे; पण हिंदुस्थानचें एकमेव पुढारी महात्मा गांधी यांनी अस्पृश्यांप्रमाणेंच आमचाही उद्धार केला. माझ्यांवाचून तर गांधींचे मुळी अडतेंच ! असो. आज या शेळीच्या मृतप्रसंगीं मला हिच्यावर टीका करण्याची 'पाळी' यावी याबद्दल मनापासून वाईट वाटत आहे- या मृत शेळीनें तीन गुन्हे केले आहेत. लो. स्व. प. च्या बोकडाशीं ही 'गुफ्तगू' करीत असे. म्हणजे आपल्या नैष्ठिक ब्रह्मचर्यापासून ही नक्की ढळली असली पाहिजे. हिनें अहिंसेचें व्रत झुगारून पठाणाला ढुशी दिली—हिंसा केली- हा तिचा दुसरा गुन्हा होय. त्यानंतर हिंदु धनगर व मुसलमान पठाण ह्यांचें भांडण चाल-

लेलें ही पाहात होती. आपण होऊन पठाणाजवळ जायचं व कर्जाऐवजीं मला घेऊन चल असं त्याला सांगून–विनवून हिनं मध्यस्ती करायची होती. त्यामुळें हिंदुमुसलमानांच्या एकीस मदत झाली असती. ही नामी संधि ह्या शेळीनं दवडली हा तिचा तिसरा गुन्हा !”......गांधींच्या शेळीनं हें म्हणायला आणि कोठूनसे अंडे यायला एकच गांठ पडली. आणि गोंधळांतच सभा मोडली गेली.

अशा गंभीर प्रसंगीं हें व्हायला नको होतं. असो. मृत शेळीच्या पाठी-मागें तिचें कोणीहि आप्त न उरल्यामुळें आम्हांस कोणाच्याहि दुःखांत सहभागी होतां येत नाहीं, याबद्दल दुःख होते. ईश्वर मृताच्या आत्म्यांस चिरशांति देवो !

×

## सुप्रसिद्ध घोड्याचें निधन !

गेल्या शनिवारीं मुंबई येथें भरणाऱ्या महालक्ष्मी रेसग्राउंडवर रस होती. अकबर नांवाचा फेव्हरिट घोडा असलेली तिसरी रेस सुटली. रेस संपत आली असतांना अकबर क्रमांकांत चवथा होता. अकबर रेस हरणार असें वाटूं लाग-ल्यामुळें त्या घोड्यावर पैसे लावणाऱ्यांचीं तोंडें ‘ टाटा डिफर्डचा ’ भाव जसा एकदम उतरतो तशी उतरली होती. “ आतां जर आपण धांवलो आणि पहिला आलो नाहीं तर लोक वराती पाठीमागून घोडे काय उपयोग, असं म्हणतील, आणि धांवलोंच नाहीं तर काय लेकाचा ‘ गद्धा ’ आहे हो—धांवलासुद्धां नाहीं असें म्हणून आपणांस खिजवतील— ” अशा दुहेरी मनःस्थितींत अकबर सांपडला ! इतक्यांत अकबरनें शेवटचा निकराचा प्रयत्न करून आपल्या प्राणा-चीहि पर्वा न करतां तो वीरासारखा धांवला, अन् त्यानें पहिला नंबर पटकावला! पण तावडतोब त्यानं धरणीला आलिंगन दिलं ! हृदयक्रिया बंद पडून त्याचें प्राणोत्क्रमण झालें होतें !

त्या घोड्यावर पैसे लावणाऱ्या प्रमुख मंडळींत–उडीदचे महाराज केशर-सिंह, रा. ब. मनुका, बॅ. बदामजी, प्रि. खिसामिस, खा. ब. पिस्तेवाला, मौलाना खजूरअली हे होते. अकबरनें आतांपर्यंत बऱ्याच रेसेस जिंकल्या होत्या. त्याचा

जन्म १९२५ सालीं बलुचिस्थानांत झाला. अकबरची खापरपणजी पेशव्यांच्या वेळेस ‘ हुजूरपागेंत ’ होती. शिवाजीच्या काळ्या घोडीच्या वंशांतलि आपण आहोंत, याबद्दल ‘ अकबर ’ला अभिमान असे. फ्रेड थॉम्सनचा ‘ सिल्व्हर किंग’ घोडा अकबरचा चुलता असून हिंदुस्थानांतील लक्ष्मीपुत्र तिकडच्या पदव्या घेण्यासाठीं जसें परदेशांत जातात,-किंवा आपल्याकडील नर्तिका हिंदुस्थानांत त्यांचे चीज होत नाहीं ( नाचतां येईना अंगण वाकडे ! ) म्हणून जशा परदेशांत जातात, त्याच चालीवर ‘ अकबर ’चा चुलतां तिकडे गेला ? वाडिया मुव्ही-टोनचा ‘ पंजाब का बेटा ’ हा अकबरचा आतेभाऊ आहे !

अकबरच्या निधनामुळें जुन्या पिढींतील एक नामांकित घोडा गेला आहे याबद्दल त्याच्या जॉकीला—मालकाला व इतरांना जें अपरिमित दुःख होणार आहे, त्यांत आम्हीहि सहभागी आहोंत. ईश्वर मृतात्म्यास शांति देवो !

×

## कै. कपिला गाय !

काल येथील सुप्रसिद्ध वे. शा. सं. विश्वनाथाचार्य यांच्या मठांतील कपिला नांवाची गाय सायंकाळीं ७ वाजतां कैलासवासी झाली, हें नमूद करण्यास आम्हांस फार वाईट वाटत आहे. एखाद्या माणसाच्या मरणसमयीं जशी भगवद्गीता वाचतात, त्याच चालीवर विश्वनाथाचार्यांनीं कपिलेच्या अंत्यसमयीं तिला गोरक्षणांतील एक लेख वाचून दाखविला. ( त्यामुळें ती मेली असावी असा गैरसमज कोणी करून घेऊं नये ! ) नंतर कपिलेनें तिचा वारस वासरूं यांच्या-अंगावरून मायेनें तोंड फिरवून सुखानें प्राण सोडला.

‘ कपिला ’ गांवांत फार पॉप्युलर असल्यामुळें हें वर्तमान कळतांच पांजरपोळांतील गरीब बापुडीं जनावरें—शुक्रवार पेठेंतील गाईच्यासह गवळी—व इतर शेंकडों लोक कपिलेचें अंत्यदर्शन घेऊन गेले. त्याच दिवशीं कपिलेची मोठ्या प्रमाणावर स्मशानयात्रा काढण्याचा सनातनी लोकांचा विचार होता. पण कलेक्टरला ही गुणगुण लागतांच, हिंदु-मुसलमानांचें भांडण होऊन शांततेस धोका पोंचेल या सबबीवर त्यानें परवानगी देण्याचें साफ नाकारलें. लागलीच

मठांत सनातन्यांनीं शेंड्या झाडून गोमूत्र पीत पीत त्या गोष्टीचा निषेध केला. दुसरे दिवशीं सकाळीं मोटारींतून कपिलेला मुडदेफरासांच्या हवालीं करावी असें ठरलें. पण मोटारीचा खर्च फार होईल--त्यापेक्षां छकडा बरा--शिवाय छकड्याच्या बैलाचें व कपिलेचें दूरचें नातें आहे--असें कोणीसें सुचविल्यावरून तिला छकड्यांत ठेवण्यात आलें. त्याच वेळीं कपिलेच्या शवावर हार घालण्याचा समारंभ झाला! विश्रामधाम--गोवर्धन कचेरी--पुणें प्रांतिक गवळी संघ--डेअरीज असोसिएशन--अखिल महाराष्ट्र भूमीजन कार्यालय--वगैरे संस्थांतर्फे हार घालण्यांत आले.

त्यानंतर पुण्याचे सुप्रसिद्ध सनातनी--व विनोदी वक्ते--एकांडे शिलेदार --श्री. नानासाहेब उपटकर यांचें भाषण झालें. ते म्हणाले--

" ऐका--विश्वनाथाचार्यांची कपिला आपणा सर्वांना सोडून गेली, याबद्दल मला किती दुःख होत आहे, हें दुःखमापन यंत्र असतं तर समजून आलं असतं--( हंशा ) मागच्या निवडणुकींत मी पडलों-- कामण्णाला घेऊन पडलों, -- माझं डिपॉझिट जप्त झालं--तेव्हां जितकं मला वाईट वाटलं नाहीं, तितकं आज वाटतंय! ( प्रचंड हंशा ) हंसूं नका. प्रसंगाचं गांभीर्य लक्षांत घेऊन शांत रहा. मला प्रथम तात्याराव सावरकरांचा निषेध करावयाचा आहे. रत्नागिरींत बद्ध असतांना ते एकदां म्हणाले होतें--अमेरिकेंत गेल्यावर गोमांस खाण्यास हरकत नाहीं. ( शेम् ) ते म्हणतात गाय ही पशू आहे. ( शेम् शेम ) त्या बिचाऱ्या गाईनें सावरकरांचे काय एवढें घोडे मारले आहे देव जाणे! ( हंशा ) सावरकरांपेक्षां तो अत्रे परवडला. अत्र्यांनीं 'ब्रँडीची बाटली' बोलपटांत श्रीकृष्णाची विटंबना केली, पावित्र्य विडंबन केलं--लागलीच तुम्ही जाहीर सभा भरवून त्याचा निषेध केलात. शंभर फूट फिल्म कापलीत. असला उद्योग केल्यावर थोडंसं कापावच लागतं. ( प्रचंड हंशा ) पण--तुम्ही सभा भरवून गाय ही पशू आहे असं म्हणणाऱ्या सावरकरांचा निषेध कां करीत नाहीं? ( करूं! करूं! ) अत्र्यानं श्रीकृष्णाची म्हणजे एकाच देवाची टिंगल केली. पण ज्या गाईंत तेहतीस कोटी देव समाविष्ट आहेत, त्या गाईंची टिंगल करणाऱ्या सावरकरांचा तुम्ही निषेध करा. मला मत न देतां त्या सहभोजनी कामण्णाला मतं देऊन तुम्ही ब्राह्मणत्वाला डाग लावलात. मी सांगतो--येत्या निवडणुकींत

कामण्णाच काय--तो अजून बच्चा आहे--पण सावरकर जरी उभे राहिले, तरी त्यांना पाडून काँग्रेसचाच उमेदवार विजयी होईल. असो. मुसलमान लोक बिर्याणी खातात--तुम्ही गाईच्या दुधाची बासुंदी खा. (हंशा) मी रोज सकाळीं एक कप गाईचें दूध व एक बशी बदामाचा शिरा खातो सनातन्यांचं राज्य झालं-आणि मी जर व्हाइसराय झालों तर प्रथम गोवध बंद करीन. त्यामुळं खाटकांचा धंदा बसेल. हिंदु-मुसलमानांचे दंगे थांबतील. रस्त्यावरून मुसक्या बांधलेल्या व पाठीवर चाबकाचे तडाखे बसणाऱ्या गाई तुम्हाला दिसणार नाहींत. हल्लीं ज्याप्रमाणें शाळा कॉलेजांतील पाठीवर शेपटें सोडून जाणाऱ्या पोरी मिनिटा मिनिटाला दृष्टीस पडतात; तसें आपल्या शेपट्या उडवत जाणारी गाईंची खिल्लारें तुम्हांला दिसतील. दारू पिऊन गटारांत लोळण्यापेक्षां गाईचें दूध पिऊन सुखसमृद्धींत लोळा. ( हंशा ) मोहात्मा गांधी खादीची तरफदारी करतो. मी शेतकऱ्यांना बैल पुरविणाऱ्या गाईंची तरफदारी करीन. आणि मग सरकारकडून पदवी नाहीं तर नाहीं पण स्वर्गातील कामधेनू-कडून तरी ह्या धेनुवल्लभाला शाबासकी मिळेल. ईश्वर कपिलेच्या आत्म्यास शांति देवो !

# ४ मुके अश्रू....

(श्री. न. वि. घारपुरे)

"आम्हाला लग्नचिठी अवश्य आली पाहिजे बरं कां?"

उषेनें आपल्या पदराचा चोळामोळा करीत म्हटले.

"जरूर, पहिली आपल्याकडेच येईल" आपले भावपूर्ण टपोरे डोळे उषेकडे रोखून नंतर मावशीकडे हंसत हंसत विद्याधर म्हणाला.

आणि जेव्हां मोटार सुटली तेव्हां आपल्या डोळ्याच्या कडा पाणावल्या होत्या त्या मावशीला न दिसतील अशा तऱ्हेनें पुसून मोटारीच्या मार्गाकडे सादरयुक्त नजरेनें उषा पहात होती.

"बरं मी लग्नचिठ्ठी घेईन!" असंच जणू कांहीं ती साभिनय आपल्या मनाशीं म्हणत होती.

मोटार सुटली तेव्हां विद्याधर एका सुखसृष्टींत विचारमग्न झाला होता.

"कुठं इनामदारांकडे आला होता वाटतं."

एका ३०–३५ वर्षांच्या गृहस्थानें विचारलें.

"हो" म्हणून विद्याधरानें सांगितलें.

"मावशींकडच्या उषेचा तुमचा बराच परिचय दिसतो" त्यानें हा प्रश्न विचारतांच विद्याधराच्या चित्तवृत्तींत बरीच चलबिचल झाली, आणि या

गृहस्थानें आंब्याच्या झाडाखालीं आपणाला पाहिलें कीं काय याची त्याला भीति वाटूं लागली.

"छे! नुकताच परिचय झाला, फारच मनमोकळा नि गोड स्वभाव आहे. हो तिचा-बिचारीच्या घरची अत्यंत गरिबी, घरांत खायची भ्रांत-मावशींनीं घेतली ठेवून तिला; मावशीची प्रकृति नसते ठीक; तिला कोणी तरी माणूस जवळ पाहिजेच ना? एकंदरींत स्वभावानें उत्तम आहे"

विद्याधरानें माहिती दिली.

"तुम्हाला सुद्धा गळाला लावलन् वाटतं"

मोटार वळणावर येऊं लागल्यामुळें ड्रायव्हरनें मोठ्या कुशलतेनें तें अवघड वळण घेतलें, तरी थोडासा धक्का सर्वांनाच बसला, पुन्हां सर्व कांहीं स्थिरस्थावर झाले.

नेमक्या त्या गृहस्थाच्या 'त्याच' प्रश्नानें विद्याधराची स्थिति भांबावल्या-सारखी झाली.

मी गळाला लागलों-आणखी तिनें असे किती लावले-फक्त जाळें टाकण्याचा ती उद्योग करते काय! विचारांचा खळखळाट त्याच्या मनांत सुरू झाला.

स्वच्छ नि संथ अशा जलाशयांत कोणी कपरी भिरकावावी नि त्या पाण्या-वर गोल वर्तुळे उठत जातात तीच नेमकी स्थिती विद्याधराच्या मनाची झाली.

दुपारीं उन्हाची तगमग होत होती. एका बाईचे मूल तहानेचा शोष पड-ल्यामुळें रडूं लागलें होतें, तिनें फिरकीच्या तांब्यातून घोटभर पाणी त्याला पाजलें. परत त्या मुलाचें तोंड प्रफुल्ल-टवटवीत दिसू लागलें—

पण विद्याधराची स्थिति!--

"म्हटलं वेळीच सावध व्हा! – तुमच्यासारख्या नवजवान तरुणाला सुंदर मुलींना काय तोटा गेलाय" कशाला त्या भिकार नि चटोर मुलीच्या जाळ्यांत सांपडतां— आमच्या गांवची ती उनाड मैनाच आहे म्हणानात"–

त्या गृहस्थाचे भिकार नि चटोर हे दोन शब्द म्हणजे. धारदार दोन सुऱ्याच. आपल्या लोभानिय नि चित्तवेधक स्मृतिपटाचे त्या सुऱ्यांनी तुकडे तुकडे झाले आहेत. असें त्याला वाटलें.

जेव्हां एका गांवी मोटार थांबली तेव्हां त्याच्या डोक्यांतील विचारांचा भणभणाट थांबला.

परत मोटार सुरू झाली.—

" जगांत माणसानें कसं नेकीनं—नीतिन वागावं—कुणाच्या डोळ्यावर येईल असं आपलं वर्तन असूं नये, अजून पुरे जाळ्यांत ओढले गेला नाहींत म्हणून मुद्दाम सांगावस वाटलं " —

तो गृहस्थ गंभिरतेने म्हणाला.

नीति – अनीति – जणू कांहीं द्वंद्व त्याच्या मनांत चालले होते–

—" मीं गरीब – तुम्ही कपकी मला पत्करनां ? "

" कां ? गरीब मुलीशी लग्न करू नये असं कोठे लिहून ठेवलय वाटतं"–हे घे वचन म्हणून तिच्या हातावर हात ठेवतांनां तिचं श्यामल असणार तोंड किंचीत लाल झालं ! –

तो प्रसंग विद्याधराच्या डोळ्यासमोरून चालला होता. – मोटार आतां बरीच वेगांत चालल्यामुळें पाठीमागून खूप धुळ उडत होती व मागाऊन जराशान बसत होती. तेवढ्यांत एखाद्या खेड्यांतलि नागड्या–उघड्या पोरांचा मोटारीकडे बघून ओरडा कानी येई—

रस्त्यानें उडालेली धूळ मोटार पुढें गेल्यावर तरी बसत होती. पण जननिंदेची धूळ त्यांच्या मनांत सारखी उडत होती.

एरवी मावशीकडून विद्याधर आला म्हणजे शहराची नालस्ती नि खेडे-गांवची स्तुती ठरलेली असायची – ' खेड्याकडे चला ' हा त्याचा मंत्र आपला जपलेला असायचा–व मावशीकडल्या गंमती सांगतां सांगतां पुरेवाट व्हायची.

पण या खेपेस तसें कांहींच झालें नाहीं– –

" विद्याधर या खेपेला किती वाळलास रे ! ही बघ मानेची हाड किती वर आली " आईनें विचारलें—

"कधींहि माणूस गांवाहून येवो, आपलं घरच्या माणसांनीं किती वाळलास हा प्रश्न त्याचा आपला ठरलेलाच असावयाचा ! डॉक्टरला नि आईला आपल

मुलगा वाळलेलाच दिसावयाचा " विद्याधर हंसत म्हणाला.

× × ×

उषा नेमकी ११॥–१२ च्या सुमारास दरवाज्यांत येऊन एका माणसाची वाट पहात उभी राहायची, आणि तो माणूस घरावरून गेला कीं ती मग फारच उदास होत असे. आणि मनांत पुटपुटे ' आज सुद्धां कांहीं पत्र नाहीं ना !––'

नदीवरली तिला आठवण झाली कीं तिचें हृदय आनंदीत होई. विद्याधराला पोहण्याचा किती विलक्षण नाद होता; तो पोहाला जायच्या वेळेस उषा नेमकी धुवाला जायची. पोहण्यांत विद्याधर किती तरबेज होता. तो किती पद्धतशीर सूर मारीत असे. पाण्यांतून विद्याधर वरती आला कीं उषेची दृष्टी त्याच्याकडे खिळून राही. त्याचें तें प्रमाणबद्ध शरीर, विशेष म्हणजे त्याची ती भरदार छाती, विपूल केस पुन्हां पुन्हां मागे करण्याची त्याची ती लकब आणि त्याच्या तोंडावर विलसणारे मोहक हास्य यांनीं तो उषेस आधिकच आकर्षक वाटत असें.

तुम्हाला येत कां पोहायला !

"नाहीं––"

तुम्ही खेड्यांतल्या, तुम्हाला तर यायला पाहिजे ! पुण्यांतल्या मुली पोहण्यांत किती तरी तरबेज झाल्या आहेत–– ! "

मग मला शिकवा कीं–असे शब्द अगदीं ओठावर आलेले मागे लोटलेले तिला आठवलें––

आंब्याच्या झाडाखालचा प्रसंग तिच्या डोळ्यासमोर उभा राहिला. रस्त्यानी जातांना किती तरी लोक डोळे फाडून दोघांकडे संशयी दृष्टीनें पहात–एका दुकानांतून जाताना " हा कोण नूत ... " असे उद्गार कोणी तरी काढले–त्यावेळीं विद्याधराची मुद्रा किती संतप्त झाली होती. किती वेळ तरी आपण फिरत होतो. शेवटीं एका झाडाखालीं बसलों झालं–––

विद्याधराला त्या खेड्यातल्या निसर्गाप्रमाणेंच तिचा देह त्याला आकर्षक वाटला. नाजिकच्या ओढ्यांतील सळमळणाऱ्या जलप्रवाहाप्रमाणेंच तिच्या अवयवांतून तारुण्य ओसंडत आहे असें त्यांस वाटलें. आकाशांतील सौम्य निळसरपणा तिच्या डोळयांत सांठवलेला आहे असें त्यांस भासलें.

५८०८

दोघेजण किती वेळ तरी गप्पा मारत बसलों. विद्याधर आपणांकडे किती आसुसलेल्या नजरेनें पहात होता त्यानें शेवटीं जवळ ओढून चुंबन घेतलंन झालं—

अंधार बराच पडूं लागल्यामुळें रानांमधून रातकिड्यांची किरऽऽर ऐकूं येत होती. शेजारी वहाणाऱ्या ओढ्याचे खळखळणें व मधूनच विस्तीर्ण वृक्षांची वाऱ्यामुळें होणारी सळसळ कानावर येत होती. मधूनच शेतामधून हांकेकऱ्यानी मारलेल्या हांका ऐकूं येत होत्या.

परत जातांना विद्याधराकडे ती मोठ्या कौतुकानें पहात होती. त्यानें सहज सुंदर मारलेला काचा, अंगाबरोबर त्याचा बसणारा कोट, केसाची विशेषशी काळजी न घेतल्यामुळें वाऱ्यानें भुरभुरणारे केस, टोपी हातात घेऊन ती हातावर आपटत जाण्याचा त्याचा चाळा, विशेष त्याची ऐटदार चाल फारच तिला मोहक वाटली.

× × ×

मावशी आज किती तरी दिवसांनीं विद्याधराकडे आली होती. त्यामुळें विद्याधराची एकच गडबड उडाली. मावशीला काय आवडतं–काय आवडत नाहीं–याची त्यांनें विचारणा केली. मावशीच्या आगमनामुळें विद्याधराच्या घरांत एक प्रकारचे उत्साहाचें वातावरण पसरलें होतें. श्रीमंत इनामदारीण मावशी फार दिवसांनीं आली, त्यामुळें तिची व्यवस्था राखण्यांत प्रत्येकजण तत्पर असे–

मावशी आल्यापासून विद्याधराच्या मनांत एक प्रश्न सारखा उभा राही.

मावशी आली पण उषा ?—

उषा मावशी बरोबर कां आली नाहीं याचा तो सारखा विचार करूं लागला. कदाचित तिचें लग्न झालें असेल—असेहि त्याच्या मनास वाटले. पण लग्न झालं असत तर आपल्याला कळलच असतं––त्याला कांहीं सूचेना, त्याच्या स्मृति त्याला डिवचून त्याला अस्वस्थ करीत––

शेवटीं त्यानें विचारलें झालं––

" खरंच मावशी उषा कशी तुझ्याबरोबर आली नाहीं–वास्तविक तुझी बरदास्त राखायला ती पाहिजे,"

मावशीच्या तोंडातून बाहेर पडणाऱ्या उत्तराकडे विद्याधरांचे लक्ष लागले.

" खरच या दिवसांत कोणी कोणावर उपकार करू नयेत, चांगली गरीब-कामसू मुलगी, घरांत खायची भ्रांत म्हणून ठेऊन घेतली-तिनें चांगलेच उपकार फेडलेन. गांवीं तिच्याबद्दल ओरड होतीच. बोर्डाची शाळा आहे ना — तिथल्या एका मास्तराचा हात धरून गेली झालं--' मावशीनें माहिती दिली.

विद्याधराचें मन कसं भांबावल्यासारखं झालं--

" हात धरून गेली—" त्या मोटारींतल्या गृहस्थाचे चटोर-भिकार हे शब्द म्हणजे कसे जळजळीत निखारेच वाटले.

विद्याधराचें एक मन म्हणू लागलें--' पहिल्यापासून उनाडपणाची संवय, गेली असेल पळून !—' पण लगेच दुसरें मन म्हणे--' चांगला १५ दिवस तिच्या सहवासांत राहिलास-तिचा हात घेऊन तिला वचन सुद्धां दिलेस, त्याच्या नंतर तिची चौकशी सुद्धां केलीस कां ? कधीं बोटभर चिठ्ठी तरी पाठविलीस कां ?--तिच्या येणाऱ्या पत्राचे पुडके मात्र जपून ठेवलेस--भेकड आहेस झालं--! "

लगेच पहिलें मन म्हणू लागे--

' जिच्याबद्दल गांवीं ओरड-असल्या चटोर मुलीबरोबर मी जन्माची गांठ मारू वाटतं ? माझा दर्जा, घराणें-'

दुसरें मन जागृत होऊन म्हणे-कधीं सूक्ष्म रीतीनें तिची चौकशी करण्याचे श्रम घेतलेस कां ? घराणं-दर्जा-! आंब्याच्या झाडाखालीं प्रणयाचे खेळ खेळतांना ती कांहीं वेश्या नव्हती—एक गरीब कुमारिका होती. तुझ्या वर्तनानें चिडून—तिनें असें केलें--तूंच जबाबदार तिच्या नाशाला--!

त्याचं मनच त्याला भेडसावूं लागले—पण पहिल्याच मनाचा विजय झाला-नीति-अनीति यांचे अर्थच उलटे झाले.

× × ×

विद्याधराचे एका गांवातील प्रतिष्ठित वकीलाच्या मुलीशीं लग्न ठरले—

मावशीला त्यानें येण्याविषयीं पत्र घातलें,पण लगेच उषा त्याच्या डोळ्या-समोर उभी राहिली.

" आम्हाला लग्नचिठ्ठी अवश्य आली पाहिजे बर कां "

मोटार सुटण्याच्या वेळचे उषेचे मानभावीपणाचे शब्द त्याला आठवले—!

## ५ : 'प्रतिभा आणि विलास !'

(श्री. ज. वा. भिडे)

प्रतिभाबाई, यांस—

सप्रेम नमस्कार वि. वि.,

माझं हें पत्र वाचून तुमच्या मनांत बऱ्याच दृष्टीनं भयंकर संभ्रम अन् विस्मय निर्माण होणं अगदीं सहाजिकच आहे. प्रस्तुत पत्राचं हस्ताक्षर तुमच्या ओळखीचं नसणार; शिवाय मथळ्यावर गांवाच नांवही नाहीं. पत्रांतला मजकूर तर अगदींच चमत्कारिक रीतीनं लिहिलेला ( पण प्रामाणिकपणें विचार केल्यास खराही असेल कदाचित. )

फारसं घोटाळ्यांत न पडतां मी प्रथमच प्रामाणिक उघडपणें सांगून टाकतों कीं, तुमची न माझी ओळख बिलकूल नाहीं हे तर खरेंच पण आपण एकमेकाला पाह्यलेलंही नाहीं. मग हें पत्र ल्याहयाचा उद्देश म्हणाल तर थोडीशी गंमत इतकंच मला सांगता येईल. दुसरं असं कीं तुमची माझी पुढं केव्हां तरी ओळख झाल्यास ह्या पत्राची उकल होऊन जो आनंद आपल्याला अनुभवतां येईल त्याची अत्तांच मी माझ्या मनांशी केलेली कल्पना, हाहि एक त्या गमतीचा भाग होय.

त्याचं असं झालं. उन्हाळ्याची सुटी संपवून सतरा जूनला संध्याकाळीं मद्रास फास्टनें लोणावळयाहून परत पुण्यास यायला मी निघालों होतो. डब्यांत

प्रवेश करून माझ्या जवळ असलेल्या एक दोन बॅग्ज् वरच्या फळीवर नीट सरकवून ठेवत असतां माझ्या हाताला एक ' सूट केस ' लागली. मी बसलों होतों त्या जागेच्या आसपास कांहीं म्हातारी कोकणी मंडळीं, दोन तीन कुणबी, कांहीं बोहरी आणि इतर मंडळीं बसलेली दिसली. त्यांची कुणाची तरी हीं इतकी सुबग बॅग असेलसं मला वाटणं शक्यच नव्हतं. आणि असल्या त्या उतारूंच्या सहवासांत इतक्या सुबक सुटकेसचा मालक बसला होता ही कल्पना मनांत येतांच फार गंमत वाटली मला. ती सूटकेस म्हणजे माझ्याच सामानां-तील एक वस्तू आहे असं सहज रीतीनं दाखवून मी, ती गाडी चालूं झाल्यावर खालीं घेतली; आणि तिची दाबलेली चापाची कुलपं उघडली. पहिल्यांदा सर्व लोक माझ्याकडे एकसारखे पहात होते. मला थोडीशी प्रथम भीतीहि वाटली. पण मग मी ती सूटकेस अगदीं खरीखरी माझीच आहे हें दाखविण्या-साठीं मी माझं फाउन्टन्पेन, पैशाच पाकीट, माझा हातरुमाल, सिगारेटकेस इत्यादि वस्तू खिशांतून काढून तींत ठेवल्यासारख्या केल्या; अन माझी बतावणी बेमालूम साधली.

× × ×

घरीं जाऊन ती बॅग उघडल्याबरोबर मला कसल्यातरी उंची सेंटचा एकदम दर्प आला. हो दर्पच नाहींतर काय? तो सेंट होता फारच सुगंधित आणि तो मित प्रमाणांत शिंपडला असतां तर त्याचा सुवास दरवळला असतां. यावरून मला वाटतं तुम्हाला भपकेबाज वागण्या करण्याची फारच आवड असावी. कुणाचेही सौजन्याचे निर्मळ सद्गुण तुमच्या डोळ्यांत भरणं शक्य दिसत नाहीं. भडक पराक्रम, फाजील कपड्याचे झोकनोक अन उत्कट भावनांच्या आहारीं अविवे-कानें जाणं तुम्हाला फारच आवडत असावं! तो सेंट ज्या रुमालावर टाकला होता, तो रुमालही वेधक रंगीबेरंगी आकृतींनें नटलेला—नव्हे भरलेला दिसला. पण तो रुमाल जरासा चाळविल्यानंतर आंतमध्यें मला ' नव्या गुजगोष्टी ' सांपडल्याबरोबर तुमच्याबद्दल आदर वाटूं लागला. एक तर वाङ्मयाविषयींची तुमची विलक्षण आवड- ( रेशमी रुमालांत सेंटच्या सुगंधात—मोठ्या काळजीनें ठेविलेले तें पुस्तक पाहुनच मी ' विलक्षण आवड ' असे शब्द वापरले आहेत. ) मला प्रतीत झाली नि प्रो. फडके माझेही अगदीं आवडते लेखक, म्हणून

माझा तुमच्याबद्दलचा आदर दुणावला. पण तो त्या वेळेपुरताच ! कारण ' नव्या गुजगोष्टी ' तुम्ही इतक्या जपून कां ठेवल्या होत्या तें मला तावडतोब कळलं. पुस्तकाच्या पहिल्या पानांवर–

प्रिय प्रतिभाराणी,

हिला सप्रेम भेट

—विजयराव —१३-६-१९३८

असा मजकूर लिहिलेला दिसला. यावरून तुम्ही ' नव्या गुजगोष्टी ' विकत घेतलेल्या नाहींत हें लक्षांत आलंच. शिवाय त्याच पुस्तकाच्या शेवटच्या कोऱ्या पानांवर तुम्ही लिहिलेला मजकूर वाचल्यावर मी विचार केला, कीं वाङ्मयाची आवड म्हणून नव्हे, तर प्रेमस्मृतींची जपणूक करण्याकरितांच या ' नव्या गुजगोष्टी ' रुमालांत गुंडाळून ठेवल्या असाव्यात.

विजयरावांनी भेटीच्या मजकुरांत लिहिलेलें ' प्रिय प्रतिभाराणी ' हें शब्द वाचून मला प्रथम गंमत वाटलीच; पण विजयरावांच्या प्रेमपूर्वक भेटीला साद म्हणून आपल्या अंतःकरणातील प्रेमभावना व्यक्त करण्यास्तव शेवटच्या कोऱ्या पानांवर जे भाष्य तुम्ही केलं आहेत त्याची तर मला राहून राहून मजा वाटते. कारण, पुस्तकाच्या पानांवर आपलं प्रेम उघड होईलसें शब्द लिहिणं ही गोष्ट एका अर्थी अशिष्ट तर खरीच; पण आपल्या अनुरक्त भावनांवर जें आवरण आपण मोठ्या तत्परतेनें कायम ठेवीत असतो ते उडून जाण्याचा अशानं फार संभव असतो. कारण कोणतही पुस्तक चारचौघांच्या हातांत जाणं अपरिहार्यच असतं. तुम्हां दोघाची परस्परांवरली अनुरक्ती उत्कट असेल; मला वाटतं ती उघड करतांना तुम्ही दोघंही भयंकर भावनाविवश होत असाल; अन त्या वेळेस काळ वेळ प्रसंगाचा विधिनिषेध न पाळतां तुमची मनोवृत्ती अगदींच विवेकहीन होत असावी !

तुमच्या रुमालांतील रहस्य एका बाजूस केल्यावर मला एक नोटपेपरचं पॅड सांपडलं. काय हो, हा नोटपेपरचा तांबडा भडक रंग तुम्हाला आवडला एवढा ? प्रेमाचा रंग गुलाबी असतो म्हणतात. तांबडा भडक नव्हे बरं कां ! त्यांतली नोटपेपरशी मॅच न होणारी अगदींच फिकट गुलाबी रंगाची पाकिटही

पाहिली, अगदींच विसंगत दिसतं यावरून तुमचं वागणं न् करणं! आंत एक नि बाहेर एक असा स्वभाव आहे काय तुमचा ? '

नोटपेपरच्या खालीं दुसऱ्या एका लहानशा सुबक नकशी काम केलेल्या पेटींत तुमचं सौंदर्य प्रसाधनाचं साहित्य होतं. सेंट स्प्रे रोज वापरतां वाटतं ? बराच सोस दिसतोय तुम्हाला प्रसाधनाचा ! .

माझं असं मत आहे कीं; स्त्रियांनीं शक्य तितकं आपल्या नैसर्गिक सौंदर्यांत असावं. नैसर्गिक सौंदर्य तुमच्या वाट्यांस फारच कमी तरी असावं किंवा रिकाम्या छानछोकीची अन् डौल मिरविण्याची तुम्हाला भयंकर हौस असावी असा तर्क मी केला तर तो चुकीचा ठरेल काय ? तुमचा प्रेमाचा प्रश्न तुमच्या ' विजयरावांनी सोडविलेला आहे ती गोष्ट वेगळी !

पण—"People prefer a modest violet not a flirting flower " हे एका नाटककाराचे उद्गार कलात्मक सौंदर्याचा दृष्टिकोन असणाऱ्या प्रत्येक माणसाला पटलेलें आहेत. तुम्ही Flirt आहांत कां Modest violet आहांत ते मला माहीत नाही. पण विनंती एवढीच कीं अगत्यपूर्वक पहा हे उद्गार पटतात कां ते !

तुमच्या बॅगेंतील सर्व वस्तूंवर माझं अतोनात प्रेम बसलयं. तेव्हां त्या सर्व बॅगेसकट माझ्याजवळ ठेवून घेण्याचा माझा निश्चय ठरलाय्. मात्र तुमचे ते नोट-पेपर अन् तो भडक रंगाचा हातरुमाल माझा पत्ता न कळवितां तुमच्याकडे पाठविण्याच्या विचारांत मी आहे. पाहूं कसं काय जमत तें !

तुमचा मुंबईचा पत्ता तुमच्या नोटपेपरवर लिहिलेला आहे, त्याचा मला हा असा उपयोग झाला. तुम्हांला ह्या पत्रानं काय वाटेल ते वाटो; पण मला मात्र विलक्षण आनंद होतो आहे खास !

तुम्हांला मुंबईच्या पत्त्यावर केव्हां तरी—योगायोगानें कां होईना पाह्यलं नसल्यास—मी मुंबईस येईन तेव्हां प्रत्यक्षच पाहीन.

कळावें. असलं चमत्कारिक पत्र वाचून लोभ निर्माण होणं मानवी मनाच्या प्रवृत्तीविरुद्ध असल्याकारणानें ' लोभ असावा ' असा मजकूर लिहिण्याचें धाडस

मी करीत नाहीं. आणि तसा लोभ निर्माण न झाल्यास मला फिकीर करण्याचं कारणच काय ? अन् मग ही विनंतीहि तरी कशाला लिहायचं ?

रात्रीं ११–३० वाजतां
१८ जून १९३८ } **विलास**

× × ×

प्रतिभेनें विलासचं तें पत्र पुन्हां पुन्हां वाचलं. अगदीं आश्चर्यमूढ झाली होती ती ! किती गंमत वाटली तिला त्या पत्राची ! पाकिटावरच्या पोष्टाच्या शिक्क्यावरून तें पान कुठून आलयं तें पहाण्याचा तिनं प्रयत्न केला. पण छे ! अगदीं गिचमीड झाली होती साऱ्या पाकिटावर. एक तर विलासनें तें पत्र तिच्या मुंबईच्या पत्त्यावर पाठविलं होतं. पण प्रतिभा कॉलेज सुरू झाल्यामुळें पुण्याला गेली होती. त्यामुळें तें पत्र ' रिडिरेक्ट ' होऊन तिच्या पुण्याच्या पत्त्यावर आलं होतं. त्यांतल्या पत्त्यावरची खोडाखोड अन् एका मागून एक मारले गेलेले पोष्टाचे शिक्के.

—' काय बाई तरी ! चमत्कार हा !...

दोन्ही हाताचे पंजे डोळ्यावर घट्ट दाबून किती वेळ विमनस्क स्थितींत ती बसली होती. समोरच फोडलेलं तें पत्र पाहून तिच्या आईनें तिला विचारलं.

' कां ग ? प्रभा ! कुणाच पत्र ? '

" कांहीं नाहीं ? विजयरावांचं पत्र आलाय् ? "

" मग चेहेरा कां उतरलाय् असा ? "

' कुठं काय ? उन्हातनं आलेय ना मी ? म्हणून झालयं दमल्यासारखं ! '

' प्रभे आईशीं खोट बोलायचं नसत हं ! पण लोणावळ्याहून आल्यापासून असं चुकल्या चुकल्या सारखं काय करत असतेस ग ? तुझं तें नेहमींच हसणं खेळणं.

इश्श ! तुझं आपलं कांहींतरीच ? मुंबईहून इथं–आल्यापासून करमतच नाहीं बघ ! मुंबईच्या त्या मैत्रिणी, तिथल्या गप्पा, हिंडण ! मुंबईतल्या माणसाला पुण्यांत चुकल्या चुकल्यासारखं वाटत नाहीं ? पण आई ! एक गोष्ट सांगायचीय् तुला ? '

'एवढंच ना? आईजवळ सांगायची ग कसली चोरी' निबंध ६८

'आपण परवां मुंबईहून येतांना तात्यामामांना भेटायला म्हणून लोणावळ्याला उतरलों होतो ना? तेव्हां स्टेशनवर डब्यांतून उतरतांना माझी एक सूट केस बाहेर घ्यायची तशीच राहून गेली. कित्ती कित्ती छान छान सामान होतं तिच्यांत! रेशमी हातरुमाल,, नोटपेपर्स, टॉयलेट सेट, अन् एक पुस्तक–त्या साऱ्या वस्तू विजयरावांकडून 'प्रेझेंट म्हणून मिळाल्या होत्या मला.'

प्रतिभेला वाटलं आई काय म्हणते कोण जाणे! पण ती म्हणाली––

'एवढंच ना? त्याचं काय एवढ? विसरतात अशा पुष्कळ गोष्टी! गेलं ते का परत मिळायचाय? चहा घे तो, निवून चाललाय बघ!'

आईनं पुष्कळ सांगितलं पण आपलंन् विजयरावांच प्रेम आतां अगदीं विकृत होणार ही चिंता प्रतिभेच्या मनांतून जाणं कसं शक्य होतं?

आणि त्यामुळें विलासचं पत्र आल्या दिवसापासून ती फारच बावरल्यासारखी वागूं लागली. एकलकोंडेपणानें आपल्या खोलींत ती तासचेतास बसून घालवी. तिच्या सहाध्यायी आपापसांत कुजबुजत––

'काय ही चमत्कारिक मुलगी? आढ्यतेची दिसतेय मोठी! बोलणं नाहीं; हसणं नाहीं; कांहीं विचारलं तरी तुटक उत्तरं!'

तिचे कपड्याचे झोकनोक; अन् प्रसाधनाची भयंकर आवड किती तरी कमी झालेली तिच्या आईला दिसत होती, असेच विषण्णतेनें तिचे दिवस चालले होते.

× × ×

कॉलेज सुरू होऊन आतां दीड महिना होऊन गेला होता. तिच्या बावरलेल्या मनाचा पहिला विस्मय, चिंता, खेद इत्यादि मनोविकारांचा जबरदस्त पगडा आतां बराचसा कमी झाला होता. तिला दुसरी एक भीति वाटत होती आणि ती म्हणजे विलास असलीं पाणचट पत्र पुन्हां तर पाठविणार नाहीं?

पण विलासचं तसलं पत्र पुन्हां आलं नव्हतं. उलट विजयरावांची छान छान मजकुरांची प्रेमपत्रं मात्र दोनचार दिवसांनीं न चुकता येत. नि त्यामुळें

तिच्या मनोवृत्ति किती तरी उल्हासित होत चालल्या होत्या. विलासच्या पत्राविषयींचा अविचारी अति विचार तिच्या मनांतून हळूंहळूं जात चालला होता.

त्यानंतर एका दिवशीं—

पहिल्या तासानंतर पुढले दोन तास ' ऑफ ' होते. म्हणून ती घरीं येऊन आपल्या खोलींत वाचत पडली होती. एकदोन पुस्तकें चाळून झाल्यावर कालच आणलेला पण उलगडायचा तसाच राहून गेलेल्या कॉलेज मॅगेझिनची तिला आठवण झाली.

मॅगेझिनचीं बहुतेक पानं तिनं उलटली—मराठी मजकुरांत वाचायसारखं—

तिला कांहींच वाटेना. प्रथमच वर्षांत पदार्पण केलेल्या उत्साही लेखकांच्या कवितां, नाट्यछटा, शब्दचित्रें अन् दीडपानी लघुकथा इत्यादि मजकुरानींच सबंध मराठी विभाग भरलेला दिसला तिला ! पण अगदीं शेवटीं शेवटीं मात्र उलटतांना तिला एक बरीच मोठी लघुकथा दिसली; अन् ती मनाशीं थोडीशी गंमत वाटून हंसली सुद्धां ! लघुकथेचे नांव ' मद्रास फास्ट ' असं होतं.

' मद्रास फास्ट ' ती मनांत पुटपुटली.

पण लघुकथेच्या लेखकाच्या नांवाची तिला फार गंमत वाढली असावी केवढयादां वाचलं तिनं ते नांव—

लेखक-विश्वंभर लाडोबा सहस्रबुद्धे, बी. ए. ( ऑनर्स ) माजीविद्यार्थी— मग तिंन ती गोष्ट कसलेच विकल्प न काढतां वाचायचं ठरवलं ! अन् थोड्याच वेळांत आश्चर्यानं दिङ्मूढ होऊन विचारांच्यां कोलाहलांत सांपडण्याची तिच्यावर पाळी आली.

गोष्ट छानच होती.

मोहक भाषाशैली अन् कथनचातुर्य वाचकाला वेधक वाटावें असंच होतं.

अन् कथानक ! ! !—

—गोष्टीचा नायक विलास एक मुलगी पहायसाठीं म्हणून मद्रास फास्टनें पुण्यास जाण्यासाठी कल्याणहून निघतो. डब्यांतली एक छोटी कातडी बॅग तो लाटतो, त्या बॅगमध्यें 'त्याला एकदोन इंग्लिश पुस्तकें एक डझन उंची

न् सुंदर हात रुमालांची पेटी, स्त्रियांना लागणारं सौंदर्यप्रसाधनाचं नवं कोरं सामान, एक दोन इंग्लिश वाटल्या एक मनीबॅग आणि कांहीं सुया, नोटपेपरचं पॅड अशा गोष्टी सांपडतात—

नोटपेपरच्या पॅडवर एका कोंपऱ्यांत सहज रीतीनें इंग्लिशमध्यें त्याला एक पत्ता लिहिलेला आढळतो—

—कु• कल्पना विजयकर, (इंटर आर्टस) "आनंद सदन" श्रीराम रोड, दादर—

असला कल्याणचा खजिना हातांत आल्यावर तो साहाजिकच हर्षभरित होतो. अन् कोण नाहीं होणार?

× × ×

पुण्यास गेल्यावर त्याला कळलं, कीं ज्या मुलीला तो 'पहाणार' असतो ती दोनतीन दिवसांनीं यायचीय म्हणून! तिचं नांव त्याचे मामा त्याला ती पसंत पडली तर मागाहून सांगणार होते.

तेव्हां तो एक प्रकारें रिकामटेकडा असतो.

अन् त्याच्या डोक्यांत एक कल्पना येते कीं आनायसानें ह्या कल्पना विजयकरचा पत्ता आपल्यापाशीं आहेच, अन् बॅग हरवली म्हणून आतां ती फारच काळजींत असेल. तेव्हां तिच्या ह्या वस्तु घेण्याच्या निवडीचं कौतुक करून अन् त्यावरुन तिच्या स्वभावाचं गौरवपूर्ण चित्र पत्रांत लिहून तिला एक पत्र पाठवावें! अन् बॅग तुम्हाला मिळेलच, काळजी करण्याचं कारण नाहीं असंहि कोरंच आश्वासन तिला देऊं, म्हणजे तिचा विश्वास आपल्याला संपादन करतां येईल.—

तसं पत्र तो लिहितो अन् कल्पनेला ते मिळतंहि—

विलास दोनच दिवसांनीं त्या मुलीला पाहयला जातो, अन् त्याच वेळेस त्याला कळतं कीं त्या मुलीचं नांव कल्पना विजयकरच म्हणून!

अन् असा गोड योगायोग जुळवून आणायाला 'मद्रास फास्टच' कारणी-

भूत झालेली असतें म्हणून त्या विश्वंभर लाडोबानें आपल्या गोष्टीचं नांव "मद्रास फास्ट" असं ठेवलं होतं.

× × ×

आज "मद्रास फास्ट" चे लेखक विश्वंभर लाडोबा फारच खुषींत होते. त्यांना न् मॅगेझिनच्या संपादकांना प्रतिभेनं आपल्या घरीं चहाला बोलावलेलं होतं. मात्र तें आमंत्रण करतांना संपादकांना तिनं शक्य तितक्या काळजीनं आपलं 'प्रतिभा विजयकर' हें नांव विश्वंभर लाडोबांना कळूं देऊं नका असं वारंवार बजावलं होतं. विश्वंभर लाडोबांचा आतां कॉलेजशींच काय पण पुण्याशींहि संबंध राहिलेला नव्हता.

लोणावळयाला त्यांना नोकरी लागली होती एका शाळेंत. संपादकांच्या विनंतिवरून—

—(कारण–कॉलेज मॅनेझिनचे गेल्या चार वर्षांचे ते एक आवडते लेखक होते.) त्यांनीं आपली 'मद्रास फास्ट' पोष्टानेंच पाठवून दिली होती. तेव्हां कॉलेजांत यंदा नवीनच आलेली प्रतिभा विजयकर त्यांना माहीत असायचं कारणच काय होतं ?

विश्वंभर लाडोबा आज मोठ्या खुषींत होते, ते एकाच कल्पनेनं कीं एका सुंदर मुलीनं त्यांची गोष्ट तिला फार फार आवडली म्हणून घरीं चहाला बोलावलंय !

संपादकांनीं विश्वंभर लाडोबांची रिवाजाप्रमाणें ओळख मोठ्या तत्परतेनें करून दिली न् तितक्याच तत्परतेनें ते म्हणाले—

"ह्या आमच्या कॉलेजांतल्या मिस्—"

पण प्रतिभेनं त्यांना डोळ्यांनीं लगेच आवरलं.

"तुमची गोष्ट मला फार फार आवडली !"

"असं कां ! हं ! तरी ही गोष्ट मी फारच घाईत लिहिली पहा !" विश्वंभर लाडोबा लाडावले.

" तुम्ही आपल्या कथांची उभारणी अगदीं व्यावहारिक सत्त्यावर करतां काय ? "

" हो बुवा ! वास्तववादाचा मी कट्टा पुरस्कर्ता आहे. माझी " मद्रास फास्ट " ही गोष्ट अगदीं नव्वद टक्के सत्यावर आधारलेली आहे !-- " बिस्किटाचा एक तुकडा मोडतां मोडतां त्याचा भुगा स्वच्छ शर्टवर पाडत विश्वंभर लाडोबा बोलले.

संपादक चकित होऊन उग्दारले--

" काय ?-- सत्त्यावर आधारलेली आहेस तूं ती गोष्ट ? "

" खरचं ! "- प्रतिभा विस्मय चकित होऊन म्हणाली.

" अहो, हो, हो, हो ! -- " It is a truth not a fiction

" निव्वळ थापा मारतो आहेस !-- "

संपादक म्हणाले.

मग विश्वंभर लाडोबांनीं आपला एक अगदीं खराखरा अनुभव सांगायला सुरवात केली. बराचसा भाग सांगून झाल्यावर प्रतिभा आश्चर्यचकित होऊन उद्गारली --

" काय ? त्या मुलीला निनावी पत्र पाठविणारे विलास ते तुम्हीच म्हणतां ?--"

" होय मिस्... "

" --त्यांचं नांव प्रतिभा विजयकर !-- "

संपादकांनीं सहज रीतीनें घसरुन सांगितलें.

--"ऑं ! काय तुम्हीच का त्या प्रतिभा विजयकर ! " विश्वंभर लाडोबा घाबरले कीं आश्चर्यचकित झाले हें सांगणें कठीणच होतं. पण अब्रुनुकसानीच्या फिर्यादीची त्यांना विजेसारखी कल्पना आली !

" होय, मीच ती प्रतिभा विजयकर ! पण तुम्ही ते विलास कसे ते सांगा अगोदर ! ... "

" त्याचं असं आहे, विलास ह्या टोपण नांवांनेंच गेल्या चार वर्षांत मॅगेझीनमध्यें माझं लेखन केलेलं आहे. कारण विश्वंभर लाडोबा सहस्रबुद्धे हें नांव अगदींच नीरस नी कसंसंच वाटलं मला ! अन् वाचकांच्या मनावर लेखकांच्या नांवाचाहि कित्येक वेळां परिणाम होतो, हीहि गोष्ट मी लक्षांत घेऊन माझ्या नांवाचीं आद्याक्षरें एकत्र करून ' विलास ' हें टोपण नांव घेतलं होतं. अन् त्याच नांवानें मीं तुम्हांला तें पत्र लिहिलं होतं. पण आतां माझ्या नांवापुढं मला बी. ए. असंहि लिहितां येईल अन् टोपण नांव प्रसिद्धीच्या दृष्टीनें फारच हितावह असं वाटल्यावरून मीं ' मद्रास फास्ट ' वर माझं सबंध नांव घातलं इतकंच. पहा, तुम्हांला लिहिलं नव्हतं मीं, माझ्या पत्राची उकल होण्याच्या आनंदाबद्दल कुठंय तें पत्र ? "

" फाडून टाकलाय मी त्याच वेळेला "

प्रतिभा म्हणाली—

# ६ : माणसं जगतात कशासाठीं !

श्री. दु. का. संत, बी. ए., ( ऑनर्स )

निरनिराळ्या मतांचे लोक एकत्र जमले व तेथें प्रश्न निघाला-

" माणसं कशासाठीं जगतात ? "

प्रत्येकानें आपापल्या बुद्धीप्रमाणें विचार करावयास सुरुवात केली. पुष्कळांनीं अद्यापपर्यंत विचारच केला नव्हता या गोष्टीचा. शेवटीं एकानें बोलावयास सुरुवात केली—

" माणसं कशासाठीं जगतात ? साधी गोष्ट, परंतु कुणाच्या लक्षांत आली नसेल आजपर्यंत. परंतु माझं असं ठाम मत आहे, कीं माणसं या जगांत एकाच गोष्टीसाठीं जगत असतात — "

प्रत्येकजण उत्कंठेनें आपले कान टवकारून स्तब्धतेनें ऐकूं लागला. सर्वांच्या स्तब्धतेचा पुरेपूर फायदा घेऊन वक्ता पुढें बोलूं लागला--

" साऱ्या जगांतला कलह एकाच गोष्टीसाठीं चालू आहे. ती गोष्ट कोणती हें मी न सांगताहि तुम्ही ओळखलं असेल. ती तुम्हांस माहीत आहे. तिच्या-साठींच तुम्ही आपल्या जिवाचं पाणी करीत असतां. जगांत उजळ माथ्यानं जगण्यास त्या गोष्टीची अत्यंत आवश्यकता असते.

" प्रत्येकजण तीच गोष्ट मिळवण्याचा प्रयत्न करतो-"

" पाल्हाळ पुरे ! लवकर बोला ती गोष्ट कोणती ? " एकानें हटकलें.

"ती गोष्ट दुसरीतिसरी कोणतीहि नसून रस्त्यातल्या भिकाऱ्यापासून तों गादी-वरल्या श्रीमंतांपर्यंत तिची प्रत्येकाला आस लागलेली आहे' ती म्हणजे 'पैसा !' पहा, पैशाशिवाय जीवन नाहीं, पैशाशिवाय शहाणपण नाहीं; ज्ञान नाहीं, सत्ता नाहीं, कांहीं नाहीं. जगांत लोक दुःखी आहेत ते एकाच गोष्टीनं. त्यांच्याजवळ पैसा नाहीं म्हणून. ज्याच्या घरीं लक्ष्मी आहे त्याच्या घरीं ऋद्धिसीद्धि पाणी भरतात. "

कित्येकजण मान डोलवीत होते; पण कित्येकांना तें पटत नव्हतें ! तो पुढें म्हणाला, " स्वार्थत्यागास या जगांत किंमत आहे त्याचं तरी काय कारण? पैसा ही मोठी गोष्ट आहे, असाध्य आहे आणि म्हणूनच तिचा जो त्याग करतो तो श्रेष्ठ. या त्यागाच्या कल्पनेनंच पैशाचं मोठेपण साठविलेलं आहे कीं नाहीं ? साऱ्या धर्मबहादुरांना राजांना, प्रधानांना विचारा, तुम्ही कशासाठी जगतां ? तुमचं राष्ट्र कशासाठी जगतं ? ते उत्तर देतील ' पैशासाठी. ' आणि म्हणून मी म्हणतों कीं माणसं पैशासाठी जगतात. "

इतक्यांत एका कोपऱ्यांतून एक मनुष्य पुढें आला आणि त्यानें मत-भिन्नता दाखवण्यास सुरवात केली–

" सभ्य मित्रहो ! पैशाचं हें वर्णन बरोबर आहे. पैसा ही अत्यावश्यक गोष्ट आहे हें खरं; परंतु प्रचलित समाजांत जी विषमता पसरली आहे ती तरी पैशामुळंच ना ? "

" अहो, गरिबांजवळ पैसा नाहीं म्हणून ते दुःखी आहेत. त्यांनीं पैसा मिळवावा आणि श्रीमंत व्हावं, नाहीं म्हणतो कोण ? " एक सभासद ओरडला.

त्या मनुष्याने आपलें बोलणें चालू केलें.

" मघाच्या सद्गृहस्थांनी पैशाचं वर्णन केल तें बरोबर आहे. पण ज्या वेळीं त्याला असं पटलेलं असतं, कीं पैसा हें जीवनसर्वस्व नव्हे. त्यापेक्षा इतर गोष्टी महत्वाच्या आहेत; की त्यांसाठीं आपण जगलं पाहिजे आणि मेलंहि पाहिजे. "

प्रत्येकाला वाटलें, खरी गोष्ट आहे ही. कित्येक महान कार्ये पैशाच्या अभावीं यशस्वी होऊं शकलीं, म्हणून पैसा हें सर्वस्व नव्हे. सर्वजग पैशासाठीं जगत नाहींत. मग जगतात तरी कशासाठीं ? प्रत्येकापुढें तोच प्रश्न होता.

जरा वेळानें दुसरें गृहस्थ उठले. आणि त्यांनी बोलावयास सुरवात केली.

" सभ्य गृहस्थहो, मघाच्या गृहस्थांचं पैशाचं तत्वज्ञान आपणांपैकीं बसुसंख्य लोकांना पसंत नाहीं. पैसा म्हणजे चैन, पैसा म्हणजे व्यसन. पैसा म्हणजे आळस, पैसा म्हणजे भाकरी, नुसत्या भाकरीच्या तत्वज्ञानाची आपणांस जरूरी नाहीं ! "

लोकांना वाटलें, खरेंच कीं ! आणि कित्येकांनीं आपले कान तिकडे लावले. त्यांना वाटलें, आतां आपल्याला एक अभिनव गोष्ट ऐकावयास मिळणार, जीवनाचें कोडें सुटणार. म्हणून साहजिकच सभेचें लक्ष तिकडे लागले.

त्यानें बोलावयास सुरवात केली,--" जगांत माणसं एकाच गोष्टीसाठीं जगत असतात-- "

" कोणती ती गोष्ट ? लवकर सांगा. " जनसमूहानें विचारलें.

" आणि त्या एकाच गोष्टींत सर्व जीवनाचं रहस्य साठवलं आहे. आपल्या सर्व पूर्वजांना तीच गोष्ट प्रिय होती. त्यासाठींच ते लढले; त्यासाठीं त्यांनीं आपलं जीवित वेचलं. "

लोकांच्या अंगांत अभिमानाचा संचार झाला, त्यांची शरीरें फुगून गेली.

" ती गोष्ट, ' स्वातंत्र्य ' असे तुम्हांस वाटेल ! छे, स्वातंत्र्याची आजची कल्पना त्यावेळीं कुठून असणार ? ती गोष्ट म्हणजे प्रत्येकाच्या मनावर जिचा संस्कार झाला आहे--ती धर्म, ईश्वर, ब्रह्म, परमात्मा यांचा समावेश धर्मांतच होतो. ' स्वधर्मे निधनं श्रेयः ' असं गीतेंत म्हटलं आहे तें उगाच का ? "

आणि अशा प्रकारें शास्त्राच्या आधारानें व प्रत्येक वाक्यागणिक शिवाजी, रामदास, तुकाराम, शंकराचार्य, ल्यूथर इत्यादि धर्मवीरांचीं नावें घेऊन त्यानें सांगितलें, की हे हुतात्मे धर्मासाठीं लढले-- '

श्रोत्यांपैकीं एकानें सावरकरांचें नांवहि सुचविलें.

परंतु श्रोतृवृंदाच्या एका भागांत चुळबुळ सुरू झाली. त्यांना वक्त्याची धर्माची संकुचित कल्पना व स्पष्टीकरण पाहून वाईट वाटलें. त्यांना वाटलें कीं, खऱ्या मानवधर्माची विटंबना त्याच्या शत्रूनेहि इतकी केली नसेल!

वक्ता बोलत होता—

" साऱ्या जगाचा इतिहास म्हणजे धर्मयुद्धाचा इतिहास. मी एक वेळ अन्नावाचून राहीन. पण धर्मावाचून एक क्षणहि राहतां येणं शक्य नाहीं. "

मघाच्या भागांतून एकजण उभा राहिला व बोलूं लागला—

" देवाला आणि धर्माला न मानणाऱ्या राष्ट्रांच वाटोळं व्हावयास हवं होतं. प्रत्यक्ष हिंदुस्थानांत कितीतरी नास्तिक होऊन गेले. ते काय धर्मासाठीं जगले आणि मेले ? विसाव्या शतकांत या भावनाधिष्ठित अंधभक्तांना नि धर्म-भोळेपणास वाव नाही, आजचे लोक धर्मासाठीं जगत नाहींत. "

लोकांना हें म्हणणें पटलेसें दिसलें. मग तीं माणसं जगतात कशासाठीं ?

बराच वेळ गेल्यानंतर एक तरूण मनुष्य उभा राहिला. त्यानें अत्यंत मधुर आवाजांत बोलावयास सुरुवात केली.—

" मघाच्या वक्त्यांनीं पैसा म्हणजे भाकरीचं तत्वज्ञान असं म्हटलं, तसं मीहि म्हणेन, की धर्म म्हणजे अफूची गोळी ! नागड्या स्वार्थाला लावलेला मोठेपणाचा मुलामा ! आज देवावांचून आणि धर्मावांचून कुणाचं अडणार नाहींच. जितके दिवस हा खोटा धर्म टिकेल तितके दिवस जग दुःखांत राहील, निराशेत लोळेल, दारिद्र्यांत काल काढील. माझं बोलणं तुम्हांस नुसतं पटेल असं नाहीं, तर अंतःकरणांतून होकार येईल. तुमच्या जीवनांत एकदां तरी त्या गोष्टीची जाणीव पटेल. तुम्ही कुठंही असा, त्या गोष्टीची कल्पना सुखावह असते. ती साध्य नसते त्यावेळीं साध्यासाठीं अखंड प्रयत्न चालू असतो. ती साध्य झाल्याबर तिच्या सातत्याविषयीं मानवी प्राणी काळजी घेतो. तिच्यासाठीं तो जगत असतो. माणसं तिच्यासाठीं जगत असतात. "

" स्वातंत्र्य असेल झालं ! मघाच्या वक्त्यांनीं त्याला महत्व दिलं नाहीं, तें यांनीं दिलं आणि त्याचीच पूर्वसुचनाहि झाली असेल झालं ! " श्रोतृगणांपैकीं एक म्हणाला.

" छे, छेः! स्वातंत्र्य खालीनं नव्हे. स्वातंत्र्याचाही मी सांगणार आहे, त्या गोष्टींत समावेश होतो." त्यानें आपले वक्तृत्व चालू ठेवलें.—

" कोणती गोष्ट? लवकर सांगा" एकजण म्हणाला.

" सांगू? ती धर्म नव्हे; पैसा नव्हे, पैसा स्वार्थी भावनेपोटीं जमवितां येतो. स्वातंत्र्यहि नाहीं. गुलामागिरींतलें गुलामहि जगत असतात. ती गोष्ट दुसरीतिसरी कोणतीही नसून प्रत्येकाजवळ असलेलें 'प्रेम' ही होय."

त्या शब्दाच्या उच्चाराबरोबर कित्येकांचीं हृदयें भरून आलीं.

त्या गृहस्थानें पुढें सुरुवात केली—

" मोठमोठ्या कवींनीं प्रेमाचं महत्त्व गाइलं आहे. 'प्रेम बोले! प्रेम डोले! प्रेमें जग हालें!' असं एक कवि म्हणतात तें खोटं का? 'निष्प्रेम चिरंजीवन तें जागीं दगडालाहि मिळतें, धिक तया' या कव्युक्तीचं तरी रहस्य काय? जगांतल्या काव्यापैकीं निम्मं काव्य प्रेमकाव्य आहे. शेले हा कवि माहित आहे? त्याची प्रेमाची कल्पना फार उच्च होती. त्याचा प्रेमावर फार विश्वास होता. तो नेहमीं म्हणत असे— 'जगांतले हे कृत्रिम नीतिनियम, बोजड बंधनं काढून घ्या आणि एकट्या प्रेमाला जगावर आनिर्बंध राज्य करूं द्या.' या सर्वांचं कार्य सुरळीतपणें घडवून आणण्याचं सामर्थ्य एकट्या प्रेमांत आहे. परंतु हें प्रेम कुणाला मिळतं?—'प्रेम लाभे प्रेमळाला, त्याग ही त्याची कसोटी—"

प्रत्येकाला वाटलें, किती उदात्त विचार सांगितला यांनीं.

"आपल्या जीवनाच्या निरनिराळ्या देशांत हें प्रेमाचं स्थान बदलतं, त्याचं व्यापकत्व वाढत असतं. शैशवी मातापित्यांविषयीं किती आदर आणि प्रेम असतं आणि तारुण्यांत तर पत्नीच्या प्रेमासाठीं जगाचंहि मोल देण्यास मनुष्य तयार होतो. त्याचं प्रेमसर्वस्व एकच असतं यावेळीं आणि वर्धमान् आयुष्याबरोबर वात्सल्याचा उद्भव होतो, व कित्येकांच्या हृदयांत ही प्रेमाची जागा देश, देव, विश्व यांनीं व्यापलेली असते. म्हणून मी म्हणतो, " माणसं प्रेमासाठीं जगतात."

मघाच्या कोपऱ्यांतलि एकानें सुरुवात केली—

" सभ्य गृहस्थहो, आताचा विचार फार उज्ज्वल आहे हें खरं, पण या कल्पना कितीहि आदर्श व उदात्त असल्या तरी पण त्या कोणासाठीं आहेत ? थोडंसं सुख ज्यांच्या वाट्याला आलेलं आहे, अशा मुठभर लोकांसाठीं ! पण सर्व साधारण समाज ! "

" आणि मघाच्या धर्माच्या बाबतींतहि हीच गोष्ट खरी नाहीं कां ? " दुसऱ्याची पुस्ती.

वक्त्याचें भाषण चालू होतें--

" दिवसभर ज्याच्या जीवितांत ' कष्ट व श्रम ' यांशिवाय दुसरा विचार व आचार नसतो, तो पशुतुल्य मानवी प्राणीं दारूचा आश्रय करतो तो काय तिच्याविषयीं त्याला प्रेम वाटतं म्हणून का ? आणि त्या नशेंत बायकामुलांचे प्राण घेणाऱ्या त्या प्राण्याचं प्रेम कुठं गेलेलं असतं ? त्याला मुलं असतात; परंतु त्याच्या मुलांना माहीत नसतं, हा बाप आहे म्हणून. तो जर आजारी पडून दिवसां घरीं राहिला तर त्याचीं मुलं विचारतात, ' आई ! हा पाहुणा कोण ग आला आज आपल्या घरीं ? ' वाहवा रे तें वात्सल्य-प्रेम ! श्रीमंताला सात लाख नव्हे, सात जन्म खर्चूनहि मिळणार नाहीं अशी प्रेमळ व निःस्वार्थी पत्नी त्याला मिळालेली असते. पण त्याला मघाच्या वक्त्यांनीं सांगितलेल्या भावना उपभोगण्यास असतात कुठं ? अशा भावना जगांत आहेत कीं नाहींत याची खात्रीहि नसते त्याला आणि तरीहि तो कशाकरितां जगतो ? थोडक्यांत काय, सर्वच माणसं प्रेमासाठीं जगत नाहींत. जीवनांत विलक्षण स्पर्धा, कलह चाललेले असतात. त्या आगींत प्रेमाच्या कोंबा-कोंबांची राख होऊन जाते आणि क्षणोक्षणीं निराशा व दुःख अनुभवास येत असतें. तीं हीं माणसं तें लाजिरवाणं जीवन काय प्रेमासाठीं जगत असतात ? नाहीं ! मग कशासाठी ?"

चवथ्यानें आपला विचार मांडला. त्याच्या बोलण्याचा मतितार्थ इतकाच होता, कीं ' माणसं ध्येयासाठीं जगतात '

त्याला एकानें प्रश्न विचारला, " अत्यंत स्वार्थी महत्त्वाकांक्षेलाहि तुम्ही ' ध्येय ' म्हणूं शकाल काय ? मग ध्येय आणि महत्त्वाकांक्षा यांत फरक काय?"

"देशाला व राष्ट्राला कोणत्याहि काळीं कांहींतरी ध्येय असतं. सर्व जनता तिकडे अप्रत्यक्षपणें खेचली जाते." मुख्य वक्ता ह्मणाला,

दुसरा म्हणाला, "ध्येय हा शब्दहि ज्याला उच्चारतां येत नाहीं असा सर्वसाधारण मनुष्य ध्येयासाठीं कसा जगणार? ध्येयवादी फार थोडे असतात. माणसें ध्येयासाठीं जगत नाहींत."

आणखीहि कित्येक बोलले आणि कित्येकांची मजल, "खाण्यासाठीं", "मजा मारण्यासाठीं" असें सांगण्यापर्यंतहि गेली.

"पण याशिवाय आतां सांगायचं काय राहिलं आहे?" प्रत्येकानें आत्म-निरीक्षण करण्यास सुरुवात केली. "मग कशासाठीं जगत होतों आपण आज-पर्यंत? आपलं जगायचं म्हणून जगत होतों, एवढंच." एकजण पुटपुटला.

एका मनुष्यानें गंभीरपणानें बोलावयास सुरुवात केली —

"मित्रांनों, आतांपर्यंत कितीतरी उदात्त विचार आपणांपुढें आले आहेत. परंतु हीं जीवनसर्वस्वं नव्हत असं आपणांस पटलं व तें खरं आहे. तीं एकेक भाग आहेत. कल्पना करा, तुमच्यापुढं एक विजयस्तंभ उभा आहे. त्याला पुष्कळ पैलू आहेत आणि गंमत ही, कीं तो स्तंभ इतक्या कौशल्यानं केलेला आहे, कीं त्याचे पैलू हे निरनिराळ्या लांकडांचे, दगडांचे व धातूंचे केलेले असून ते अत्यंत अभिनव व कलायुक्त पद्धतीनं त्या स्तंभांत बसविलेले आहेत. आतां प्रत्येक पैलूपुढं एकेका मनुष्यास उभं केलं आणि विचारलं, कीं सांगा पाहूं कशाचा केलेला आहे हा स्तंभ? ज्याच्यापुढं पैलू आहे तो ज्या वस्तूचा असेल त्याचा सर्व स्तंभ केलेला आहे असं तो सांगेल. तसंच, खरं सांगायचं तर, आतांपर्यंत पुढं आलेल्या प्रत्येक तत्त्वांतहि थोडं सत्य आहे. पण यावरून जीवनव्यापी तत्त्व नाहीं असं मात्र नव्हे. उलट मी असं म्हणेन, कीं तें तत्त्व आहे व त्यांतच इतरांचा समावेश होत असतो."

लोकांना खात्री पटली, कीं कांहींतरी नवीन सांगणार हा. त्यांनीं विचारलें,

"कोणतं तत्त्व?"

" तुम्हांला तें ऐकून आश्चर्य वाटेल. कित्येकांना तें पटणार नाहीं. परंतु थोडा विचार केला तर तुम्हांसहि पटेल कीं आपण सर्व त्यासाठींच जगत असतों. कुणाला त्याची कल्पना नसते. पण प्रत्येकजण न कळत तिकडे ओढला जात असतो. आतापर्यंतचा सर्व जगाचा इतिहास त्याच तत्वानं भरलेला आहे. तें तत्त्व दुसरं कोणतंहि नसून तें ' प्रगति वं विकास ' हें आहे.

" मित्रहो ! ज्या ज्या गोष्टींत विकास आहे अशी आपली कल्पना असते त्यासाठीं आपण जगत असतों आणि तेंच त्याला जीवनसर्वस्व वाटत असतं... शिवाजी-रामदासांच्या वेळीं धर्माच्या भावनेंत विकास होता. ती कल्पना त्या काळीं पुरोगामी होती. या विकासाच्या कल्पना कालपरत्वें बदलतात. कवीला वाटतं, जगाचा विकास प्रेमळपणानं अव्याहतपणं होईल आणि सर्वसाधारण समाजास वाटतं, पैसा मिळाल्यानं आपल्या विकासाचा मार्ग मोकळा होणार आहे.

" प्रत्येकजण सुखासाठीं धडपडत असतो हें मान्य आहे ना ? पण सुखाच्या कल्पना सर्वांच्या सारख्या असतात काय ? आणि एखाद्या गोष्टींत सुख वाटत असतं याचं तरी कारण काय? ती वस्तु प्रगतीकडे, विकासाकडे नेईल अशी आपली दृढ श्रद्धा असते म्हणून ! आणि म्हणूनच मी म्हणतों, ' माणसं विकासासाठीं जगत असतात.' ध्येयवाद्याची विकासाची अत्युच्च कल्पना म्हणजे ध्येयपूर्ती. धर्मनिष्ठांची कल्पना म्हणजे मोक्ष आणि ब्रह्मप्राप्ति.

" अगदी साधा कारकून घेतला आणि त्याला त्याच्या पगारावर बढती मिळाली तरी त्याला आनंद वाटत असतो तो कां ? त्याला वाटत असतं, की आपल्या जीवनाचा विकास होत आहे. रस्त्यांतला भिकारीहि एक प्रकारचं पशु-तुल्य जीवन कंठीत असतो. त्याला आशा असते, की एक दिवस येईल आणि माझ्या जीवनांत बदल होईल. मग आशा म्हणजे विकासाची व प्रगतीची पाऊल-वाट नाहीं का ?

" ज्या वेळीं समाजाची प्रगति खुंटते त्या वेळीं समाजाच्या जीवनांत आकांक्षा नसतात व त्यांचा मार्ग मोकळा होण्यास क्रांतीची आवश्यकता असते. मनुष्याला ज्या वेळीं वाटतं, की आपली प्रगति होणं शक्य नाहीं, त्या वेळीं तो

काय करतो माहीत आहे ? तो आत्महत्या करण्यास प्रवृत्त होतो. म्हणून मी म्हणतो, माणसं केवळ धर्मासाठी जगत नाहीत. प्रेमासाठीं काळ कंठीत नाहीत. तर ती विकासासाठीं, प्रगतीसाठीं जगत असतात. प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरीत्या ती विकासाकडे ओढली जातात."

लोकांत गंभीर शांतता पसरली. जो तो स्वतःशीं म्हणत होता, "बस् ठरलं कोणी विचारलें मला तर मी सांगेन, मी विकासासाठी जगतो. माझ्या विकासांत आड येणाऱ्या गोष्टीला मी कापून काढीन. आजची समाजरचना माझ्या विकासाच्या आड येत आहे. मग ती बदलून टाकायला नको का ?"

त्याला मघाचे धीरोदात्त उद्‌गार आठवले. "क्रांति ! क्रांति ! क्रांति !!"

इतक्यांत कोणीतरी बोलले,—

"माणसं विकासासाठी जगत असतात !"

# ७ स्पाडेतनि अर्थात ज्ञानप्रकाश !

( श्री. भिमराव त्रिंबक ढेकणे )

गुरुवार होता तो-- !

मी नुकताच सकाळीं उठत होतों.

तोंच माझ्या खोलीच्या दारावर थाप ऐकूं आली.

'कोण आहे ? ' मी म्हणलों; लगेच कडी काढली.

" आपलेंच नांव माधवराव ना ? " आलेल्या व्यक्तीनें प्रश्न केला.

ती व्यक्ती म्हणजे एक १६-१७ वर्षांचा छोकरा होता.

" होय, कां ? कांहीं काम बिम आहे वाटतं ? " मी विचारिलें.

" ही चिठी आपणांस द्यावयास विरकरांनीं सांगितलें आहे. असें म्हणून त्यानें आपल्या जीर्ण झालेल्या कोटांतून मला एक गुलाबी रंगाची चिठ्ठी दिली. " एवढंच काम ना ? बरं जा. " मला चिठी वाचावयाची असल्यामुळें मी त्यांस म्हणालों.

मी चिठ्ठी संपविली तरी तो मुलगा उभाच ! " कायरे, उभा कां ? " मी त्याला उलट प्रश्न केला ? " उगीच. " त्याचा चेहरा चिंतेनें काळवंडला होता. त्यावेळीं जगांतील सगळी करुणा जणूं त्याच्या डोळ्यांत भरून राहिली होती. त्याला बोलण्याचा धीर होत नव्हता.

त्याच्या तोंडावरील खाणाखुणा पाहूनच कीं काय माझा हात खिशांत गेला. दोन पैसे त्याला मी देण्यास घेतले ! पण त्यानें ते घेण्याचें नाकारलें.

"रोज तुम्ही कांहींतरी वर्तमानपत्र घ्याल कां ?"

कावळ्याच्या कावकावीनंतर चिमणीची चिव्‌चिव् ऐकूं यावी त्याप्रमाणें मला त्यानें विचारलें.

"नकोरे मी रोज कॉलेजच्या लायब्ररींत जात असतों."

परत मी त्याला म्हणालों, "धर कीं तुला दोन पैसे चहा प्यायला"

"मला नको पैसे-रावसाहेब." तो म्हणाला

"एकादें वर्तमानपत्र आपण रोज घेतलें तर मला गरिबाला तेवढीच मदत होईल."

मी त्याची सर्व कहाणी ऐकली. जागृत ज्वालामुखींतून वाहाणाऱ्या लाव्हारसाप्रमाणें त्याच्या डोळयांतून कढत अश्रू टपाटप बाहेर पडत होते !

तो अत्यन्त गरीब अशा ब्राह्मणाचा मुलगा होता. लहानपणींच त्याचे वडील वारले. घरांत इनमीन दोन माणसें; तो अन् त्याची आई.

आईशिवाय त्याला मायेचें कुणीच नव्हतें. आईच्या हृदयाचा तो एकुलता एक ठेवा होता. लोकाकडे तो वार लावून तो म्युनिसिपल शाळेंत शिकत होता. त्याची आई लहान लहान कामें करीत असे.

आईवर त्याचें व त्याचें आईवर प्रेम होतें.

ती माऊली जिवाची परवड रचून त्या आपल्या वंशवृक्षाचें रक्षण करीत होती. आधाराच्या त्या एकुलत्या एका धाग्याकडे पाहून तिला आनंदाच्या उकळ्या येत होत्या.

सकाळीं वर्तमानपत्र विकण्याचा तो धंदा करी.

त्याच्या कहाणीनें मला खरोखरच वाईट वाटले.

गरीबाच्या आयुष्याबरोबरच त्याचें दुर्दैवही वाढत असतें.

"बरं, टाकीत जा ज्ञानप्रकाश" मी म्हणालों.

त्यानें ज्ञानप्रकाश टाकला, मला नमस्कार केला-आणि निघून गेला.

तसाच मी अर्धा तास विचार करीत होतों. मी दिलेले दोन पैसे तसेच टेबलावर पडलेले दिसत होते.

तो नित्यनियमानें येत असे.

मी एल्‌एल्‌. बी. च्या क्लासमध्यें होतो.

असाच तो एकदां माझ्या घरीं वर्तमानपत्र टाकण्यास आला होता.

त्यानें ज्ञानप्रकाश नेहमींप्रमाणें टाकला. अन्‌ तो उभा राहिला.

तो शून्यदृष्टीनें माझ्याकडे पाहूं लागला.

माझ्या मनांत आले, " शून्यांत परार्धें भरलीं " असें कवी सांगतात. याच्या या शून्य दृष्टींत काय असावें बरें ?

मी खिशांतून एक रुपया काढून त्यांस दिला व म्हणालों " हिशेब करून सर्व पैसे घे. "

" रावसाहेब मला आज एक पुस्तक घ्यावयाचें आहे तरी आणखी आठ आणे देतां कां ? "

मी आणखी आठ आणे त्यास काढून दिले व म्हणालों, "हिशेब करतोस ना?"

" मग करूं सावकाश रावसाहेब. " तो निघून गेला.

जातांना तो विशेष आनंदांत दिसला.

दुसऱ्याच दिवशीं–आज तो नेहमींपेक्षां उशीरां आला !

पाकळ्या कुसकरलेल्या फुलासारखा त्याचा चेहरा निस्तेज दिसत होता.

" कायरे ! उशीरसा केलास ? "

" रावसाहेब ! आई कालपासून आजारी आहे. " त्याच्या डोळ्यांत पाणी खेळत होतें.

" मग औषध वगैरे ? "

" आणले. रावसाहेब काल दिलेल्या पैशांचा फारच उपयोग झाला. "

मला कळलं. कालचे पैसे पुस्तकाला खर्च न करितां आईच्या औषधाकरितां खर्च केले. त्याचें हें वर्तन पाहून मला आनंद झाला !

" आणखी एक रुपया देतां कां ? "

लगेच मी त्याला एक रुपया दिला.

त्यानें मागचा सर्व हिशेब केला होता.

माझे फक्त त्याच्याकडे आठ आणेच जादा होते.

मी पुढें पुढें रोजच्या रोज पैसे देत असे.

मला कसलीशीं सुटी असल्यामुळें खानावळींतून जेवून आल्यावर सकाळीं टाकून गेलेला "ज्ञानप्रकाश" मी वाचत होतों. तोंच माझ्या दारांवर थापेचा आवाज झाला. दार उघडलें गेलें.

फाटका एक सदरा, बोडकाच असा माझ्या समोर तो उभा होता.

बाहेर उजेड होता खरा, मात्र त्याच्या अंतःकरणांत निराशेचा अंधार पडत चालला असावा.

मोठ्यानें दुःखाचा हंबरडा त्यानें फोडला व कसावसा झालेला सर्व वृत्तांत त्यानें निवेदन केला व डोळ्यांत आसवें आणून म्हणाला, "तुम्ही माझे वडीलाप्रमाणें आहांत, मला मदत केल्यास मी जन्मभर आपले उपकार विसरणार नाहीं."

नशिबाच्या भोंवऱ्यांत तो गुरफटला गेला होता.

घरवाल्याचे त्याला तीन रुपये द्यावयाचे होते.

घरवाला दम धरीत नव्हता. त्यानें त्याचें सामान घराबाहेर काढलें होतें. आजारी आई उन्हांत उभी होती.

तें चित्र त्याला पाहावेना म्हणून पैशाकरतां तो आला होता.

गरीबाच्या दैवरेषा नेहमींच कशा उलट्या काढलेल्या असतात न कळे! हा जगाचा न्यायच आहे. त्याला तरी दोष देऊन काय फायदा. दैव फिरल्यावर तेथें तो तरी काय करणार.

मी त्याला तीन रुपये दिले.

त्याच्या हृदयक्षितिजावर आशेचा एक किरण प्रकाशला.

"रावसाहेब" नेहमींप्रमाणें त्यानें दीनवाणीनें हाक मारली, "साडेतीन रुपये झाले बरं कां!"

मी मानेनें होकार दिल्यावर तो निघून गेला.

. अफाट महासागरांत सोडून दिलेल्या एकाद्या होडीसारखी त्याची स्थिति झाली होती.

शिवतांना मध्येंच बोटाला सुई टोंचून अंग शहारतें तसेंच माझें अंग रोमांचित झालें !

पंधरा दिवसानंतर—

पुढच्याच आठवड्यांत माझ्या एल्‌एल्. बी. चा निकाल होता.

ते मी त्याला सांगितलें.

त्याला आनंद वाटला.

" रावसाहेब तुमचे साडेतीन रुपये पुढच्या महिन्याला देऊं बरं कां.

" सावकाश दे बरं. " मी म्हणालों.

बाहेर सारखा जोरानें पाऊस पडत होता.

मधून मधून मोठा गडगडाट होऊन विजा चमकत होत्या.

बाहेर सर्वत्र अंधःकार पसरत होता.

आजच एल्‌एल्. बी. चा निकाल होता.

कालच मी त्याला आजचा ज्ञानप्रकाश अगदीं सकाळींच आणावयास सांगितला होता.

साडेसातचा सुमार होता.

मुसळधार पाऊस अजून पडत होता.

शहरांतील रस्ते चिखलानें भरलेले दिसत होते.

" अजून कां बरें आला नाहीं हा ! "

माझ्या डोक्यांतून हा प्रश्न चमकून गेला.

अर्धा तास वाट पाहून स्वतः मीच बाहेर जाण्याकरितां अंगांत कोट चढविला. कोपऱ्यावर बरीच गर्दी जमली होती. मी एकदम त्या गर्दीत शिरलों.

मला सर्व हकीकत समजली. वाईट वाटलं ! दुःख झालं !-!

सकाळींच ! अगदीं लवकरच तो नेहमींप्रमाणें आईच्या व देवाच्या पायां पडून ज्ञानप्रकाश ऑफिसांत गेला होता.

पाऊस जोराचा पडतच होता !

त्याच्याजवळ एक मोडकी छत्री होती.

बुधवार चौकांतून ज्ञानप्रकाश घेऊन तो माझ्या विन्हार्डीं येंत असतांनाच त्याचा पाय रस्त्यावर घसरला. आकाश काळ्या ढगांनीं भरून गेलें होतें. तो आडवा पडला. समोरून एक लॉरी येत होती, पाऊसाच्या योगानें व अंधप्रकाशामुळें मोटारवाल्याला हा दिसला नाहीं. मोटार त्याच्या अंगावर गेली !

" माझ्याकरिता त्यानें कितीतरी मोठे असे हे श्रम घेतले. मला अगदीं गहिंवरून आलं.

तें चित्र मीं पाहिलें !

रीतसर पंचनामा झाला. त्यांत पुढाकार मीच घेतला होता.

त्याच्या कोटांत तीन पैसे व एक वही होती.

वहींत पहिल्याच पानावर " श्री. रा. रा. मधुराव पानसे यांचे फक्त ३॥ रु. देणें आहे. " एवढाच मजकूर होता.

मला आश्चर्य वाटलें. त्याच्या आईला ही हकीकत कळली.

माऊली धाय् धाय् रडत होती. निराशेचा चटका हृदयाला बसला व त्यायोगें तिच्या मुखावरील टवटवी अजीबात कोमेजून गेली !

फाटक्या व पाण्यानें चिंब झालेल्या कपड्यांनीं जखडलेला त्याचा मृत देह जमिनीवर पडला होता, आत्मा तर केव्हांच हा अस्थीचा पिंजरा टाकून बाहेर पडला होता ! तो गेल्यामुळें पंख तोडलेल्या पक्षिणीप्रमाणें तिची अवस्था झाली !

" साडेतीन रुपयांकरितां.........त्यानें आपला.........साडेतीन हातांचा देह ........खर्ची घातला !"

माझ्या कानांत सारखें मोठ्यानें घुमत होतें.

" अरेरे !" नकळत उद्गार माझ्या तोंडाबाहेर पडले !

मी उत्तम रीतीनें पास झालों खरा, पण सर्व खोलीभर मला त्याचा साडेतीन हातांचा देह मात्र दिसत होता !

---

८ सूर्यग्रहण

( श्री. अनंत गाडगीळ, बी. ए. )

त्या दिवशीं ऑफिसांतून जरासा उशीराच आलों मी. दररोज अगदीं चार वाजतां मी येत असे. पण त्या दिवशीं हॉलमधील घड्याळांत सहाचे ठोके पडायला आणि मी फाटकांतून आंत शिरायला एकच गांठ पडली.

यामिनी—!

माझ्या जीवाभावाची अर्धांगी !

सकाळींच तिनं मला बजावलं होतं–संध्याकाळीं लवकर घरीं परत येण्याबद्दल ! पण आज झालेल्या उशीराबद्दल यामिनीला काय थाप मारावी या विचारांत मी फाटकाचा दरवाजा उघडला. ती झोंपाळ्यावर कांहीं तरी विणीत बसली होती. आणि टॉमी–! झोंपाळ्याखालीं, 'जगाची फिकीर नाहीं' अशा रुबाबांत पहुडला होता. पण त्याचं लक्ष बाहेर असल्यांमुळे मला आलेला पाहतांच तो धांवतच मला सामोरा आला. इतक्यांत माझ्यापुढून एक मांजर आडवं गेलं ! मला तें आडवं आलं म्हणून कीं काय, टॉमी त्याच्यावर तुटून पडला. कुत्रं अन् मांजर हाडवैरी असतं म्हणतात तें कांहीं खोटं नाहीं.

टॉमीचं भुंकणं ऐकून यामिनी व्हराड्यांत आली. रुसव्यामुळं गालांवर चढलेली लाली पाहून मी ओळखलं कीं वातावरण गरम आहे आज !

' किती उशीर हा ! माणसानी आपली वाट पहात बसावं—पुरुषांना कांहींच नाहीं त्याचं ! ' यामिनी फणकाऱ्यानें म्हणाली.

' पण माणसानी वाटच का पहावी म्हणतो मी ! प्रत्येक बायकोला नवऱ्यानं कुठं बाहेर जाऊं नयेसं वाटतं—' मी टॉमीच्या पाठीवर हात फिरवीत म्हटलें.

' आणि प्रत्येक नवऱ्याला आपल्या बायकोनं त्याच्या अर्ध्या वचनांत राहणं आवडतं '—

' पण आम्ही एवढे कष्ट करतों–ते बायकोला सुख देण्यासाठींच ना–? '

' सुख देण्यासाठीं ? नाहीं घेण्यासाठीं ! '—–

' म्हणजे–Explain it '

' जाऊं दे बाई–उद्यां आहे म्हटलं ग्रहण–सकाळीं अगदीं लौकर जेवायचं हं ! आतां भाजीबिजी आणून ठेवली तर ? '—–

' बरं–बरं ! आतां फक्कडसा चहा कर बुवा ! '

यामिनी चहा करण्याकरितां आंत गेली आणि कपडे काढून मी आरामखुर्चीवर पडलों.–' सूर्यग्रहण आहे उद्यां ? कशाकरतां बरं येतात ही ग्रहणं ? यांच्या येण्यांत मनुष्यावर सूड उगवण्याचा हेतू असतो का ? चंद्रसूर्याला लागलेलीं ग्रहणं सुटतात. पण शशिला लागलेलं ग्रहण कायमचं ठरलं ! चंद्रसूर्य हे देव आहेत. आणि शशिकांत—' माणूस ! ' देव मानवापेक्षां अप्पलपोटे असतात ! ! '

—शनिवार होता त्या दिवशीं. दहा एक वर्षं होऊन गेलीं असतील त्या गोष्टीला. सूर्यग्रहण होतं. आमच्यासारख्या उनाड पोरांची पर्वणीच ती ! पुष्कळ वेळ पाण्यांत डुंबायला मिळतं. कवठं चिंचा खायला मिळतात. याहून जास्त काय पाहिजे पोरवयांत ?

आठ नवाचा सुमार असेल. आम्ही मुलंमुलं गेलों होतों नदीवर. आमच्यांत शशि होता त्या दिवशीं ! शशी—किती हुषार पोरगा होता. आईचा एकुलता एक ! पण आपल्याकडे म्हण आहे ना—' जितकं शहाणं पोर '—तितकी

त्याच्या आयुष्याची कमी कोर !' शशिच्या आईनं जातांना आम्हांला बजावलं होतं लवकर येण्याबद्दल. अजून अंगावर शहारे येतात ती आठवण झाली कीं !

नऊ वाजतां ग्रहण लागलं ! ग्रहण पाहण्याकरितां काळी कांच—अन् त्याला मध्यें एक पांढरा डोळा ठेवून आणली होती आम्हीं बरोबर. पाहतां पाहतां कांच कोणाच्याशा हातांतून खालीं पडली नि फुटली ! कांचेची वस्तू आणि माणसाचें जीवन ! फुटलेली कांच पुनः तशीच मिळवितां येईल—पण गेलेलं माणूस परत येणार आहे थोडंच !

कांच फुटतांक्षणीं माझ्या हृदयांत चररर झालं ! पण पोरवयांत शकून-अशकुनाचा विधिनिषेध असतो कुठें ? ग्रहणास सुरुवात झाल्यावर स्नानाकरितां आजूबाजूच्या लोकांनीं पाण्यांत उड्या टाकल्या. मग आम्हालाहि चेव चढला—आम्हीही पाण्यांत डुंबू लागलों ! नदीला पाणी चांगलंच होतं ! आम्हांपैकीं पुष्कळांना उत्तम पोहतां येत होतं. पण काळापुढें माणसाची शक्ति अन् बुद्धि लुली पडते. मानव जातीवर अखंड राज्य चालविण्याकरितां ईश्वरानं हें शस्त्र हातीं ठेवलं आहे—नाहींतर त्याचें सिंहासन माणसांनीं काबीज करून त्याला अंधार-कोठडीचा स्वामी बनवलं असतं !

—शशी बिचारा माणूस होता. पाण्याला ओढ बरीच असल्यामुळें शशीला पाणी काटतां येईना—तो पाण्याच्या ओघाबरोबर जास्त आंत ओढला जाऊं लागला. लोकांनीं त्याला वांचविण्याचे हरएक प्रयत्न केले. पण काळ त्याला ओढून नेत होता. कांहीं वेळानें शशी त्या अनंत पाण्याच्या पात्रांत दिसेनासा झाला. त्याच्या आईचा अरुण पुनः कधींहि न उगवण्याकरितां अस्तास गेला ! काय करावं हें मला सुचेना—सारखी शशीच्या आईची मूर्ति डोळयांपुढं येई—मी आतां त्या माऊलीला काय सांगू ? तिच्याकडे जायला मी कचरू लागलों ! माझा शशी गेला होता—अन् तो देवाकडे गेलाय् हें सांगण्याकरितां मला त्याच्या आइकडे जावं लागलं ! शशी पाण्यांत बुडून मरण्यापेक्षां मी मेलों असतों तर ? पण मरणं माणसाच्या हातांत आहे थोडंच ! ”

इतक्यांत यामिनी चहाचा ट्रे घेऊन बाहेर आली. माझी छाती धडधडत होती. तिची चेष्टा करण्याचें सोडून मी तसाच निपचित पडून राहिलों. त्यामुळं

यामिनी इतकी घाबरली कीं, जवळ असलेल्या टेबलावर चहाचा कप ठेवून तिनं धांवत येऊन माझ्या कपाळाला हात लावला !

' किती गरम झालंय कपाळ ?—इतकं काय बरं लावून घ्यायचं ?—चूक झाली माझा ' यामिनी काकुळतेनें म्हणाली.

तिला बिचारीला काय कल्पना–मी कोठल्या विचारांत दंग होतों याची ! मी हांक मारली—' यामिनी–'

' जाऊं दे म्हणते ना—डोकं का दुखतंय ? थांबा हं बाम लावतें. ' असं म्हणून अमृतांजनची बाटली आणून ती माझ्या कपाळाला तें लावूं लागली––

' यामिनी––सूर्यग्रहण सूर्याला लागतं कीं माणसाला ग––? '

' म्हणजे ––? '

' मला कां लागत नाहीं ग्रहण ! मला ग्रहण लागलं तर तूं काय करशील ग ? '

' मी या सूर्याला ग्रासणाऱ्या त्या राहूला गिळून टाकीन–– '

मी तिचा हात माझ्या छातीवर ठेवत म्हणालों––

' आणि मग '

' या सूर्याला त्या दुष्ट राहूच्या तडाख्यांतून सोडवीन.'

' आणि तुला सोडवतां नाहीं आलं तर ? '

' मी जीव देईन '

किती सहज पण हृदयांतलि उत्तर होतं ते ! मी हंसलों ! माझ्या हृदयांत गोड भावनांचा झरा वाहूं लागला—यामिनीच्या शुद्ध अन् सात्विक प्रेमाचं प्रतिबिंब मी त्यांत पाहूं लागलों ! प्रेम––! जगांत दोनच माणसांच्या प्रेमाला मोल असतं ! एक आईचं प्रेम–अन् दुसरं अर्धांगीचं !

' यामिनी–तुझा या ग्रहणावर विश्वास आहे. ' मी म्हणालों––

' म्हणजे '––तिनं विचारलं.

' कांहीं नाहीं. आपण चहा घेऊं या आतां–'

चहा पितां पितां मी म्हटलं––

' यामि तूं चहा फारच छान करतेस बुवा–'

' इश्श, ' छान कसला ! आपल्याला तो आवडतो इतकंच !

———

# १ : माझें १९५० चें हिंदुस्तान

( श्री. दत्तात्रय सखाराम दरेकर, बी. ए. )

१९५० सालीं हिंदुस्थान देश कसा असावा ? हा प्रश्न वाचला म्हणजे लहानपणीं वाचलेल्या-कल्प-वृक्षाखालीं बसलेल्या माणसाच्या गोष्टीची आठवण होते. सर्व सुख प्राप्त होऊन शेवटीं राक्षसानें खाल्लें तर ? असा प्रश्न उभा राहताच, शेवटीं राक्षसानें खाल्लें. तसाच हा प्रश्न आहे. परिस्थितीचा राक्षस इतका भयंकर आहे कीं कांहीं विचारूं नये. कल्पनेंतले राजवाडे आणि राज्यें पृथ्वीवर उभारतां आलीं असतीं तर काय मजा झाली असती ? पण सत्यसृष्टीचा दैत्य आहेच ना आडवा उभा. म्हणून कल्पना आणि सृष्टि यांचें संगनमत होणें अशक्य आहे. आज १५० वर्षे इंग्रजांची आणि त्याच्या अगोदर ७।८ शतकें यवनांची गुलामगिरी आम्ही कल्पनेच्या साम्राज्यांत हांकलून लावून नुसत्या हिंदुस्थानचेंच नव्हे तर जगाचें सम्राट होण्याचें चिंतिलें असतें. पण सत्यसृष्टींत आजतागायत गुलाम-पिळलेले-उष्ट्या पत्रावळीवर जगणारे म्हणूनच जिवंत आहोंत. म्हणून १९५० सालीं माझें हिंदुस्थान संपूर्ण स्वातंत्र्यांत असावें असें न चिंतणारा महाभाग कोण आहे ? धार्मिक स्वातंत्र्य-आर्थिक संपदा-सामाजिक स्वातंत्र्य मिळून जगांत पहिल्या प्रतीचा श्रेष्ठ असा माझा हिंदुस्थान होऊन गेला. ८।१० शतकाच्या पूर्वीचें भारत व्हावें असें कोण चिंतणार नाहीं ? पण ' १९५० सालीं

हिंदुस्थान कसें असेल ? ' हा प्रश्न विचारला कीं मात्र परिस्थितीचा राक्षस आ-वासून पुढें उभा राहतो. ही सत्यसृष्टीची कल्पना येतांच मन किंचित गांगरून गेल्याशिवाय रहात नाहीं. पण परिस्थितीला भिऊन तिला पाठ न दाखवितां तिच्याशीं टक्कर देऊन साध्य मिळविण्यांतच खरी कर्तबगारी आहे. म्हणून तिचा विचार करणें जरूर आहे. थोडक्यांतच संपवावयाचें आहे म्हणून विषयाच्या सोयीसाठीं राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक व शैक्षणिक असें भाग पाडून विचार केला आहे. प्रथमतः सर्वांत महत्त्वाचा राजकीय प्रश्न त्याचा विचार करूं.

**राजकीयः**—एकंदर जागतिक परिस्थितीचा आढावा काढल्यास युद्ध होणार हें निश्चित. आणि १९१८ सालच्या युद्धामुळें जशी आम्हांला थोडीफार सत्ता मिळाली तशीच थोडीफार भावी युद्धामुळें मिळण्याचा संभव आहे. आज हिंदुस्थानांत राजकीय क्षेत्रांवर जीं प्रभावी माणसें आहेत त्यांचा पण विचार करायला हवा. गांधी आणि त्यांचे ८ प्रांतांतले प्रधान, बोसबाबूजी आणि क्रांतीची गर्जना करणारे रॉय. अधिकारग्रहणाच्या धोरणामुळें आज गांधी-वादाचा उदोउदो आहे व बहुजनसमाज हा अशिक्षित, भोळसट, अल्पसंतुष्ट, कमी कष्टांत जास्तीची आशा करणारा आणि पोटाच्या विवंचनेंत पडलेला आहे. अशा दुःखी, कष्टी समाजाला मधाचें बोट या अधिकारग्रहणानें लागलेलें आहे. आणि हें गांधीवादी लोक जाणून आहेत. पण या बिनदुधाच्या सडांत कांहीं नाहीं. सत्य, अहिंसा, ब्रह्मचर्य हीं अध्यात्माचीं साधनें राजकारणांत आणून सोडल्यामुळें व तीं साध्य आहेत कां साध्याकडे नेणारीं जशीं इतर साधनें त्यांपैकींच हींही आहेत, हें फारसें कोणाला कळत नाहीं. आंतला आवाज आणि नवा प्रकाश हीं बोथट साधनें व्हॉइसरॉयकडे लोटांगण, नेहरू, भुलाभाई यांचे 'प्रकृतिस्वास्थ्य' करतां निघणारे विलायतेचे दौरे, फेडरेशन विरोधाची बेगडी भाषा आणि अल्प-संख्यांकांना डोक्यावर बसविल्यामुळें त्यांनीं चालविलेली दंडेली आणि त्यांच्या भरमसाट मागण्या या सर्व गोष्टी आमच्यादेखत घडत असतां त्यांच्याकडे आम्हीं डोळेझांक करणें शक्य नाहीं. बोस आणि गांधीवाद हा एक राजकीय विचार-क्रांतीचा स्फोटच आहे. जुनाट, हट्टी, एककल्ली, ढोंगी यांनीं भरलेल्या गांधींच्या पुढारीपणाला सुभाषनीं लावलेला हा सुरुंग व त्याचा अखिल भारतांतून उमट-

लेला प्रतिध्वनी व त्यामुळें झालेली विचारक्रांतीची वाढ ही एक इष्टापत्तीच होय. गांधींच्या राजकारणाच्या अगदीं उलट्या टॉकांस रॉय यांचे राजकारण आहे. विचारांचा प्रामाणिकपणा कितीही असला तरी बहुजनसमाजाची मनोवृत्ति, त्याचा भित्रेपणा, व्यक्तीपूजनाची हौस, स्वार्थांधता, या गोष्टी विचारांत घेतल्या म्हणज रॉयवाद सामान्य जनतेच्या आवाक्याबाहेरचा आहे असें म्हणणे भाग पडतें. त्यांना अनुयायी फारच थोडेसे राहतील. कारण विचारांचा प्रखरपणा कितीही असला तरी आचरणांत असणारे किती सांपडतील ? गांधीवाद आणि रॉयवाद यांपैकीं एकाचा तिटकारा व दुसऱ्याचा अशक्यपणा विचारांत घेतां यांतील सुवर्णमध्य म्हणजे सुभाषवाद होय. विचारांचा स्वतंत्रपणा व उदारता त्याला व्यवहाराची जोड आणि लोकशाहीच्या तत्त्वांना पटणारीं तत्त्वें यामुळें १९५० सालीं तुम्हाला सुभाषचंद्र बोस यांचेच राजकारण दिसेल असा माझा भरंवसा आहे. राष्ट्रांतील तरुण हेच खरेखुरे प्रतिनिधी आहेत आणि आज सुभाष हेंच त्यांचे पुढारी आहेत. फेडरेशनच्या बाबतींत निर्वाणीच्या खलित्याचा प्रश्न युद्धाच्या ऐन धुमश्चक्रींत निःसंशय फायदेशीर होईल. आणि योग्य बदलानुसार झालेलें फेडरेशन १९५० सालीं दिसेल किंवा सुभाषबाबूंच्या मनांत नेहमीं घोळत असलेली इजिप्तची राज्यघटना कदाचित् १९५० सालीं दिसेल. कारण, राजकीय चळवळ, जगांतली अशांतता, युद्धाचा पेंच यांनीं पिळून कदाचित् सुभाषच्या इजिप्तच्या राज्यघटनेप्रमाणें राज्यघटना देण्यास बरेच प्रयत्न केल्यावर ब्रिटिश सरकार तयार होईल. संस्थानी चळवळ आहे या प्रमाणांत जोरांत चालली कीं खालसा प्रजा व संस्थानीं प्रजा यामध्यें फार थोडा भेद १९५० सालीं दिसेल. त्याचप्रमाणें राजकारणांत जीं बाळें स्वतःच्या भित्रेपणानीं कॉंग्रेसनीं लाडावून ठेवलेलीं आहेत. व त्यांनीं जीं विषबीजें पेरून ठेविली आहेत त्यांचीं कटू फळें १९५० सालीं दुर्दैवानें चाखावीं लागणार असें अनुमान आजच्या जातीय वादावरून काढायला तरी हरकत नाहीं. १९५० सालीं राष्ट्रीय सभेइतकीच हिंदुमहासभाही समबल होईल. आज तिच्याविषयीं जी अनुदारवृत्ति आणि एकांगी हल्ले होतात ते त्यावेळीं होणार नाहींत. कारण प्रत्येक धर्म आज आपापल्या धर्माकडेच पहात आहे. पुस्तकांतून शिवाजीचें उल्लेख गाळणें १४ च्या २० अटी होणें, वंदेमातरम् व राष्ट्रीय निशाणांची गळचेपी करणें या मागण्या व

त्यांना भिऊन कॉंग्रेस श्रेष्ठींनीं केलेली पिछेहाट व अल्पसंख्यांक म्हणून त्यांनीं चालविलेली हिंदुस्तान विभागण्याची चळवळ या चळवळीं पुढें हिंदूमहासभाच लढवील. आज सावरकरांचे जे वजन आहे त्याच्यापेक्षां १९५० सालीं तें कितीतरी पटींनीं वाढेल. त्यांच्या हातांत असलेली व आज 'अराष्ट्रीय' ठरलेली हिंदुमहासभा अंतःर्बाह्य राष्ट्रीय होईल. अंदमानहून काळेपाण्याची शिक्षा भोगून आलेल्या रणगाजीचे आणि गुळगुळीत मार्गानें अधिकारप्राप्ति झालेल्या महात्म्यांचे कांहीं बाबतींत पटलें नाहीं तर त्यांच्यावर आंतल्या आवाजाच्या नव्या प्रकाशानें जसा शिस्तभंगाचा बडगा देण्यांत येतो. आणि एकाद्या मोटार एजंटाचें काम करीत असलेल्या म्युनिसिपल कौन्सिलरला पावली भरतांच जसा देशभक्तीचा पास देण्यांत येतो असलीं सत्य अहिंसेची लेबलें वाटेल त्याला लावण्यांत येणार नाहीं. १९५० सालीं आजच्यापेक्षां तरूण बंडखोर विचाराचे बनतील. शेतकरी कामकरी हे आजच्या पेक्षां जास्त प्रभावी असे राजकारणावर वजन पाडणारे होतील. राजकीय वातावरणांत आज जितके पक्ष दिसतात तितके किंवहुना जास्तही दिसतील पण त्या सर्वांचें Common causeएकच राहील. राजकीय अस्पृश्यता त्यावेळीं दिसणार नाहीं. थोडक्यांत १९५० सालीं ठोकळमानानें सुधारलेले फेडरेशन किंवा इजिप्तसारखी राज्यघटना दिसेल. 'राष्ट्रीय' म्हणून कोणत्याही एकाच पक्षाला पेटंट मिळणार नाहीं. बहुजनसमाज राजकीय बाबतींत जागृत होऊन प्रभावी होईल. तरुण उदार, स्वतंत्र विचाराचे आणि बंडखोर प्रवृत्तीचे होतील.

सामाजिकः—१९५० सालच्या सामाजिक परिस्थितीचा आवांका आजच्याच सामाजिक पद्धतींहून काढला पाहिजे. आजचे वैवाहिक प्रश्न, पिता–पुत्र संबंध, पोशाखाचे प्रश्न, व्यवहाराचे प्रश्न यांचाच प्रामुख्यानें पुढें विचार करूं. १९३९ सालच्या प्रौढ कुमारिकांना पडलेली विवाहाची विवंचना सुंदर व सुसंपन्न, सुशिक्षित व सुदृढ असाच "सर्वगुणसंपन्न" पति हवा असतो. पण शेवटीं निराशा होऊन वाटेल त्याशीं विवाह घाईनें उरकून टाकतात किंवा लग्न म्हटलें म्हणजे वाईट मुलं नको असा हा जो "फॅशनेबल" वागण्याचा हल्लींचा कुमारिकेचा विचार पुढें तो वेळ येतांच खोटा ठरतो. मग अशा रीतीनें वाग-

ऱ्या मुलींना पेंचप्रसंग उद्‌भवून विवाह करावा लागतो. याचा विचार हल्लींच्या तरुणी निःसंशय करतात. व याचें फळ १९५० सालीं खास मिळेल. तरुण व तरुणीचें वैवाहिक जीवन जास्त सुखमय होईल. त्यांच्यांत मिळतें घेण्याची प्रवृत्ति Compromising spirit वाढेल. प्रीतिविवाहांची संख्या वाढेल. आज वडील व पुत्र यांत जो खटका उडतो तो १९५० सालीं इतका तीव्र भासणार नाहीं. आज ज्या कारणानें पितापुत्रांचे खटके उडतात त्याचा विचार करून आजचे तरुण म्हणजे १९५० चे "वडील" जास्त उदारपणे वागतील. दोघां-नाही मतस्वातंत्र्याची किंमत कळेल. स्त्रीपुरुषसंबंधाविषयीं आजचे जें मत आहे तें जास्त जास्त उदार होत जाईल. आज ज्या गोष्टींत अश्लिलता वाटते ती त्या गोष्टींत वाटणार नाहीं. प्रत्येक समाजाविषयीं आपण आस्थेवाईक दृष्टीनें १९५० सालीं विचार करूं. आज जो समाजांतला 'अस्पृश्य' अस्पृश्य वर्ग म्हणून राहात आहे तो १९५० सालीं तसा राहणार नाहीं. त्या समाजाची सर्वांगीण उन्नति होईल. रोटी-व्यवहार तर सर्रास चालू होतील आज जी सहभोजनाची चळवळ मुद्दाम करावी लागते ती लागणार नाहीं. मिश्रविवाहासंबंधीं हल्लींचे तरुण विचार करतात. मिश्रविवाहांत वडिलांची हल्लीं जी अडचण आहे ती आज जे तरुण बुरसटलेली म्हणतात, ते तरुण 'वडील' झाल्यावर हमखास आपल्या मुलांच्या बाबतीत अडचण उपास्थित करणार नाहींत. मिश्रविवाहितावर जो थोडाफार सामाजिक बहिष्कार पडत असतो तो १९५० सालीं मुळींच पडणार नाहीं. शुद्धीकृतासंबंधीं आज जो फारसा जिव्हाळा दाखविला जात नाहीं तो देखील १९५० सालीं दाखविला जाईल, म्हणजे आज ज्या ज्या सामाजिक अडचणी तरुणापुढें आहेत त्यांचा अवश्य विचार होऊन संपूर्ण नाहीं तरी कांहीं अंशानें त्यांचें निराकरण खास होईल. समाज आजच्यापेक्षां सामाजिक बाबतींत १९५० सालीं जास्त उदार होईल.

**धार्मिक**--१९५० सालीं आज जे धार्मिक वाद आहेत त्याचा निःसंशय परिणाम दिसेल. विशेषतः हिंदूंच्या दृष्टीनें १९५० साल खास जास्त सुदृढ होईल. बॅ. सावरकर यांनीं हा आकाळविकाळ पडलेला जो हिंदुसमाज आहे तो जागा करण्याचें ठरविलें त्याचा परिणाम १९५० सालीं स्पष्टपणें दिसेल. धार्मिक

ज्ञान संशोधनाच्या दृष्टीनें पाहून तें एक वैभव आहे. त्यांत कांहीं तत्त्व आहे. स्विकारण्यास योग्य आहे. तें पाहून घ्या असा लोक विचार करतील. प्रो. माटे, महादेवशास्त्री दिवेकर यांच्या विचाराचा व लिखाणाचा परिणाम १९५० सालीं दिसेल. अल्पसंख्यांक म्हणून 'वंदेमातरम्' किंवा 'तिरंगी झेंडा' यांची जी पिछेहाट होत आहे, १४ च्या २१ मागण्या मान्य होत आहेत, असा लाड त्यावेळीं चालणार नाहीं. ख्रिश्चन व पारशी वगैरे धर्मातील लोक जास्त जागरूक होतील. बाटवाबाटवींचा प्रकार बंद होऊन शुद्धिकरणाची चळवळ जोर घेईल. हैद्राबादचा लढा – उद्यांचा भोपाळचा लढा, परवांचा गोव्याचा लढा असे धार्मिक लढे सुरू झालेले आहेत. त्यांचा परिणाम झाल्याशिवाय राहणार नाहीं. स्त्रीला पळविणें, देवळें फोडणें, मशिदीवरून वाद्यें वाजविणें याला जसजसा प्रतिकार होईल तसतसे भांडखोर लोक नरम होतील. म्हणजे आज जी नागवणूक हिंदूंची होते ती ते संघटित व प्रतिकारसमर्थ झाल्यानंतर १९५० सालीं होणार नाहीं. देव न मानणारे देखील मग तत्त्वांकरितां प्रतिकार करतील. कारण बॅ. जिना, शिकंदरहयातखान, फजलूल हक्क, सर अकबर हैदरी यांच्या भाषणांचा परिणाम जसा मुसलमानांवर होतो तसाच तो हिंदुवर होतो. पण उलट एवढाच! आणि धार्मिक वाद कदाचित् योग्य वेळीं बंदोबस्त केला नाहीं तर विकोपास जाण्याचा संभव आहे. म्हणजे आज जो हिंदुसमाज विस्कळित आहे तो आजच्या डोळ्यापुढें घडणाऱ्या गोष्टी पाहून जास्त संघटित – धीर – प्रतिकारसमर्थ होईल आणि हें दृश्य १९५० सालीं दिसेल.

**शैक्षणिकः**––वर्धा शिक्षण योजना १९५० सालीं कॉंग्रेसचें राज्य राहिलें तर हमखास अमलांत येईल. धंदेशिक्षणाकडे आजच्याही कॉंग्रेस मंत्रिमंडळाचें लक्ष आहे व त्याला मूर्तस्वरूप १९५० सालापर्यंत खास येईल. वैमानिक शिक्षणाकडे जास्त लक्ष द्यावें लागेल. बोटींच्या शिक्षणाचें महत्व वाढत जाऊन त्याचेंहि शिक्षण सरकारला द्यावें लागेल. कारण प्रत्येक राष्ट्रास आतां आरमारी व वैमानिक विद्येचें महत्त्व पटलेलें आहे. आज जो सहशिक्षणाचा बाऊ करण्यांत येत आहे तो १९५० सालीं करण्यांत येणार नाहीं. कारण तें रूळत चाललेलें आहे. स्त्रिया विश्वविद्यालयीन शिक्षण मोठ्या प्रमाणावर घेऊं लागतील. तसेंच आज

U. T. C. व P. T. हे विद्यार्थी व विद्यार्थीनींना आज कॉलेजमध्यें सक्तीचें आहे. तेव्हां याचें महत्त्व वाढून कदाचित् व्यायाम हा विषय परिक्षेंत ठेवला जाईल. रायफल क्लबस्, आज जे स्थापन होत आहेत, नागपूर युनिव्हर्सिटीचे कुलगुरू श्री. केदार यांनीं जो लष्करी शिक्षणाचा प्रसार करण्याचें ठरविलें आहे, शस्त्रबंदीविरुद्ध जी चळवळ सुरूं आहे. भोसला शिवाजी मिलिटरी अशी जी लष्करी शिक्षणाचीं केंद्रें सुरूं आहेत या सर्वांच्या परिणामानें १९५० सालीं व्यायाम व लष्करी शिक्षण याचें महत्व वाढेल. हिंदी भाषा ही माध्यम होईल. भाषावार विश्वविद्यालयें स्थापिलीं जातील. थोडक्यांत १९५० सालीं शिक्षण ही राजकीय महत्वाची बाब होईल.

**वाङ्मय**:—आज बहुजनसमाजाचीं, शेतकऱ्यांचीं, कामकऱ्यांचीं उसना कळवळा आणणारीं कथानकें, चित्रपट, लघुकथा वरच्या वर्गाच्या लेखकांकडून लिहिलीं जातात तशीं १९५० सालीं तीं त्याच वर्गाच्या लेखकाकडून लिहिलीं जातील. राष्ट्रीय विचारास पोषक अशींच राजकारणप्रधान कथानकें लिहिलीं जातील. कथानकें जास्त जास्त वास्तववादी होतील. अनुभवानें लिहिणारे लेखक तयार होत आहेत. पूर्वीच्या वाङ्मयाविषयीं आदर वाढूं लागलेला दिसेल. वाङ्मयाच्या प्रत्येक अंगांचा लेखकवर्ग समाचार घेईल. वीररसास पोषक असाच शृंगार यापुढें सजविण्यांत येईल. कारण आज आपलें राष्ट्र राष्ट्रीय विचार-क्रांतीच्या फेऱ्यांत आहे त्याचा परिणाम वाङ्मयावर झाल्याशिवाय कसा राहील? राष्ट्रीय विचारांचा उहापोह म्हणजे समाजसत्तावाद, रॉयिस्ट, कम्युनिष्ट, नाझीझम् फॅसिस्ट वगैरे राजकीय आंदोलनें समजावून सांगणारीं व प्रचारकी थाटाचीं पुस्तकें जोरानें खपविण्यांत येतील. कारण मतप्रचार प्रत्येक पक्षास पाहिजेच. वर्तमानपत्रांना आज जें महत्त्व आहे त्याच्यापेक्षां जास्त येईल.मतप्रचाराचीं तीं हस्तकें होतील. वर्तमानपत्रें वाचणें हें नित्याचें होऊन बसेल. बंदिस्त वाङ्मयाच्या बाबतींत मात्र जी चालढकल आज चालू आहे तिच्यासाठीं चळवळ केली तर लवकर उठेल. आज जी राजकीय विचारक्रांति होत आहे तिला पोषक असें वाङ्मय १९५० सालीं वाचायला मिळेल.

**आर्थिक**:—१९५० सालची सर्व परिस्थिति आर्थिक सुबत्तेवर अवलंबून राहणार आहे. श्रेष्ठ, मध्यम व कनिष्ट असे भेद आर्थिक टंचाईमुळें झालेले आहेत.

बेकारीचा भस्मासूर जो नाच करीत आहे त्याला आजच आळा घातला तर ठीक नाहींतर १९४० सालीं फारच बेकारी दिसेल. आज ज्या योजना बेकारी निवारण्यासाठीं होतात त्या ताबडतोब अंमलांत आल्या तर १९५० साल बरें दिसेल. व्यापारास संरक्षण देण्यांत येईल. मोटारी-सायकली-यंत्रें वगैरे धंदे सुरूं होतील व सरकार त्यास मदत करील. सुशीक्षित लोक आज व्यापार-धंद्यांत पडलेले आहेत ते १९५० सालीं मोठ्या प्रमाणांत पडलेले दिसतील शेतकीकडे राष्ट्रीयतेच्या दृष्टीनें पाहण्याचा कल आजच सुरूं झाला आहे, त्याला सर्वतोपरी मदत सरकार करील व सुशीक्षित वर्ग तो धंदा खास हातांत घेईल. केवळ नोकरीवर अवलंबून राहणारे लोक फारच थोडे दिसतील; कारण नोकऱ्या सरकार आणणार कोठून? म्हणून नोकरीकरितां शिक्षण हें ध्येय मागें पडेल. स्त्रिया पण सर्वत्र दिसतील. आज फक्त डॉक्टर व शिक्षक याच धंद्यांत दिसतात. १९५० सालीं व्यापार, वकील वगैरे सर्व क्षेत्रांत आजच्यापेक्षां मोठ्या प्रमाणावर चमकतील. तात्पर्य आजच पुढें होणाऱ्या संकटाची काळजी घेतली तर १९५० साल आर्थिक दृष्टीनें सुखाचें दिसेल असें मानण्यास हरकत नाहीं.

थोडक्यांत व मोजक्याच पण महत्त्वाच्या गोष्टी १९५० सालीं कशा दिसतील हें मीं दाखविलें आहे. १९५० साल हें कांहीं आकाशांतून पडणारें नाहीं. मैलाचे दगड जसें मोजून आपण मार्ग क्रमून इच्छित स्थळीं जातों तसेंच १९५० साल हें १९३९-४०-४१ वगैरे वर्षे ओलांडूनच जाणार आहे. तेव्हां कांहीं अद्भुत दिसेल अशी आशा असेल तर ती चूक आहे. १९२९ सालानंतर जसें १९३९ साल फरक पडलेलें दिसतें तसेंच १९५० साल दिसेल म्हणून आजच्या आंदोलनांचा सर्व दृष्टीनें विचार करून, व आज जी विचारक्रांति तरुणांत दिसते, व जी परदेशाची परिस्थिति आहे तिच्याच अनुरोधानें १९५० साल दिसणार. या राजकीय, सामाजिक, धार्मिक, आर्थिक दृष्टीनें १९५० चें हिंदुस्थान संपूर्ण आशादायक दिसेल आणि तसें तें दिसावें यासाठीं जीं दोन आयुधें आम्ही तरुणांनीं तीक्ष्ण केलीं पाहिजेत कीं त्यांच्या जोरावर आम्ही १९५० साल आशादायक करूं, तीं दोन हत्यारें तरूणांनीं पाजळून ठेविलीं पाहिजेत आणि तीं महत्त्वाचीं आयुधें म्हणजे पोलादी मनगट आणि मन !

———

# १० : : : जरीचें पातक !

(श्री. विष्णु प्रल्हाद महाजन)

" उत्पद्यन्ते विलीयन्ते " या सुभाषिताची आठवण त्यांच्याकडे पाहून कुणालाही सहज व्हावी असें तें कुटुंब होते.

तामसी लोकांना आपल्या हट्टाग्रही स्वभावाला वाटेल त्याप्रमाणें घरांतील इतर मंडळींना सक्तीनें वागायला लावण्याचे एक जबर तीक्ष्ण हत्यार त्यांच्याजवळ असतें. आणि अविचारानें असे लोक त्याचा उपयोग वाटेल त्यावेळीं आणि वाटेल त्या बाबतींत सर्रास करीत असतात.

ते हत्यार म्हणजे ' जुनें वळण ' !

मनुष्यप्राणी स्वभावतःच शांततेचा भोक्ता असतो. अपवाद म्हणून एकादे उदाहरण सोडून दिले, तर ज्या योगानें घरातली शांतता बिघडून विनाकरण बखेडे माजतील व एकाकरतां सर्वांच्याच चित्ताला दुःख होईल अशी गोष्ट मनुष्य स्वतःच्या बाबतींत पुष्कळदा कमीपणा घेऊनही करण्याचे टाळीत असतो. परंतु याचा परिणाम उलटा होतो. ज्या व्यक्तीच्या हेकटपणाला कंटाळून इतर मंडळी वेळेवर स्वतःची मतें बाजूला ठेवूनही, जों, जों, त्यांच्या इच्छेप्रमाणें–मनांतल्या मनांत चरफडत–बाह्यात्कारी शांतपणें वागत असतात तों तों त्या हेकट व्यक्तीला आपल्या कर्तृत्वाची फारच फुशारकी वाटून त्याचे वर्तन अनिर्बंध होत जाते.

आणि शेवटीं व्हायचा तोच परिणाम होतो.

पोटांत साचलेला लाव्हा अत्यंत तप्त झाला, म्हणजे ज्वालामुखीचे शिखर उडून जाते आणि त्यांतून बाहेर पडणाऱ्या रसानें आजूबाजूच्या सर्व प्रदेशाची खराबी होते.

हीच अवस्था पंतांच्या संसाराची झाली होती.

हट्टी, तामसी आणि शिरजोर स्वभावामुळें त्यांचे लहानपणापासून कुणाशीहि पटलें नाहीं. घरची स्थिति जेमतेमच असल्यामुळें व त्यांच्या असल्या स्वभावामुळें घरांत दररोज बखेडे होऊं लागल्यामुळें पंतांना वडलांनीं रागानें घराबाहेर होण्यास सांगितलें.

पंतांनीं घर सोडले. पण स्वभाव सोडला नाहीं. दुसरा कांहीं आसरा नसल्यामुळें त्यांना नोकरी शोधणें भाग पडले. पण त्याही बाबतींत तें अयशस्वी ठरले. खराब स्वभावामुळें त्यांचे कुणाशीहि जमत नसे. त्यामुळें त्यांना सत्रा ठिकाणीं नाचावे लागे. ' मी कुठल्याही बाबतींत कुणालाही शरण जाणार नाहीं.' हे त्यांचे ब्रीदवाक्य होते.

आणि यामुळें त्यांच्या संसारांतील एकहि दिवस त्यांना किंवा त्यांच्या बायकांमुलांना सुखाचा गेला नाहीं.

बाप जमदग्नी आणि आई अत्यंत भेदरट, त्यामुळें त्या मुलांच्या मनोविकासाला किंवा त्यांना स्वतःचीं कांहीं निश्चित मतें बनविण्याला मार्गच उरला नाहीं. घरांत अठराविश्वे दारिद्र्य; गरिबांचीं मुलें, कधींकाळीं चार चौघांत जाण्याचा प्रसंग आला, तर सर्वांनीं त्यांच्याशीं तुच्छतेनें किंवा उपकाराच्या दृष्टीनें पाहावे. त्यामुळें मनाचा मोकळेपणा ही काय चीज आहे हें त्यांना आजिबातच कळलें नव्हतें.

अशा रीतीनें पंतांचा चाललेला संसाराचा गाडा मध्यें एकाएकीच खुंटला. पंतांच्या पत्नी कांहीं किरकोळ आजारांतच आटोपल्या. त्यामुळें तर त्या कुटुंबाची दैना अधिकच झाली.

नाहीं म्हणायला दुःखांत सुख इतकेंच होतें कीं, पंतांच्या मुलीचें लग्न मात्र तिच्या आईदेखत झाले होते. पंतांच्या तिरसट स्वभावामुळें मुलें सहसा

त्यांच्या पुढेंही जात नसत. परंतु आई वारल्यानंतर मात्र घरांत दुसरें कोणीच नसल्यामुळें सहाजीकपणेंच नेहमीं बोलाचालीचे प्रसंग येऊं लागले.

परिस्थिती बदलली म्हणजे मनुष्याचा स्वभाव बदलतो थोडाच ! पंतांचे मुलांशी कोणत्याच बाबतींत पटत नसले तरी आपल्याच हेक्याप्रमाणें मुलांना ठायी ठायी वाकविण्यास ते अद्यापहि खंबीर होते.

घरांत अडचण, शिक्षणाची व्यवस्था नाहीं. पंतांची नोकरी खाजगी आणि तींत पगाराचे कायमचे वांधे. अशा परिस्थितींत दादाची मॅट्रीकची परिक्षा कशी-बशी पास झाली. याच सुमारास पंतांची पत्नी वारली आणि पंत आजारी पडले. झाले. थोरल्याची मॅट्रीक झाली म्हणून आणि दुसऱ्या दोघांची शिकवण्या-जोगी परिस्थिती नाहीं म्हणून सर्वांच्या शिक्षणाची एकदमच इतिश्री झाली.

पंतांचा ज्योतिषावर विश्वास फार. त्यामुळें चुकून माकून एखाद्या मुलानें कांहीं नवीन गोष्ट करण्याचे मनांत आणले कीं सर्व पापग्रहांचे बळ एकवटून घेऊन पंत त्यावर वक्रदृष्टी करून त्याला पूर्ण नाउमेद करून टाकीत. " तुमची नशीबंच नाहींत कार्ट्यानों धड ! एकाद्याच्याही नशिबी पैसा नाहीं, कीं कर्तब-गारी नाहीं. सारे ग्रह पालथे ! " अशा तऱ्हेची बडबड पंत नेहमीच करीत असल्यानें त्या मुलांचीही वृत्ती कांहींशी भेकडच बनली.

पण असें चालणार तरी कुठवर ! परिस्थितीला कलाटणी मिळाली पाहिजे असे तिघाही भावांना वाटे; पण त्यांना इलाज सापडत नव्हता.

धंदा करावा, तर धडाडी नाहीं, पैशाचे तर नांवही नव्हते. नोकरी म्हणावें तर गरिबीमुळें शिला नाहीं. आणि वडिलांच्या तिरसट स्वभावामुळें कुणाला त्यांच्याबद्दल फारसा आपलेपणाही नव्हता. अशा परिस्थितींत ते तिघे कधीं कधीं आपापसांत चालू परिस्थितीचीं चर्चा करीत, कधीं एकमेकांवर चिडत, तर एखादवेळ एखादी तोडही सुचवीत. पण निश्चितता मात्र कुणाच्याही वागण्या-बोलण्यांत नसे.

त्यांतल्यात्यांत नाना-मधला भाऊ- जरा जास्त लटपट्या होता. वडि-लांच्या धाकात असतांही कांहीं वेगवेगळे हस्तव्यवसाय त्यानें शिकून घेतले

होते. तो थोडासा बोलका आणि कष्टाळू असल्यामुळें बऱ्याच ठिकाणी त्याची कारणपरत्वें जा–ये असे. त्याच्या कष्टाळू वृत्तीमुळें तो कोणाला नकोसा नसे.

अशाच कांहीं कारणामुळें तो एक दिवस शाळेच्या सुपरिन्टेन्डेन्टच्या घरीं गेला होता. त्यावेळीं शाळेंत एका खालच्या वर्गावर शिक्षक नेमण्याबद्दल आसिस्टंटशीं त्यांचें बोलणें चाललें होते.

" मला आलेल्या अर्जावरून फारसं समाधान होत नाहीं. यापेक्षां जास्त लायक, एकादा कष्टाळू माणूस मिळाल्यास जास्त बरं होईल " मुख्याध्यापक म्हणाले.

" सर, मध्यें एकादा शब्द बोललो तर रागावणार नाहीं ना तुम्ही ? " नानानें मध्येंच विचारलें.

" कशाबद्दल " ! त्यांनीं कुतुहलानें विचारलें.

" आमच्या दादा बद्दल "

" म्हणजे ! "

" म्हणजे सध्या तो मोकळाच आहे. तो मॅट्रिकच्या वर्गांत तुमच्याच हाताखालीं होता. गणित विषय त्याचा चांगलाच आहे. तो लाजाळू असला तरी मेहनती आहे. आणि वर्गही खालचाच आहे. त्याची सोय लावाल तर उपकार होतील आमच्यावर. "

मुख्याध्यापक हंसून म्हणाले " बरं त्याला मला भेटायला सांग " आणि दुसऱ्या आठवड्यापासून शाळेच्या शिक्षकांच्या पटावर दादाचे नांव दाखल झाले.

पंतांकडून याचें सर्व श्रेय त्याच्या पत्रिकेंतील अज्ञात ग्रहांना बहाल करण्यांत आले.

दादाचे शिकवण्याचें कार्य समाधानकारक होत असल्यानें तो शाळेत बहुधा कायम होईल असें एक दिवस कोणाच्यासें बोलण्यांत आले मात्र; हेकट पंतांची एका हरीच्या लालाशी गाठ पडली आणि नेहमीच्या स्वभावाला अनुसरून दादाच्या विनवणीकडे दुर्लक्ष करून, आरडून, ओरडून आग्रहाने पंतांनीं त्या गृहस्थाशीं आपले व्याहीपण जोडून घेतले.

घरांत एक माणूस वाढले. आणि पंत कमी झाले. थोड्याशा आजारीपणा-तच पत्नीप्रमाणें पंतही आटोपले. पण मुलाच्या संसाराचा पसारा मात्र त्यांनीं मांडून ठेवला होता.

लग्नाला फार दिवस झालेले नव्हते. दादाचा पगार अपुरा. दोन्ही भाऊ अद्याप बेकार; त्यामुळें दादाचे चित्त अस्वस्थ असें. नाना थोडेफार इकडे तिकडे करून कांहीं तरी धडपड करी. पण त्याला संसाराला उपयोग होण्याइतकी प्राप्ती होत नसे.

वहिनींचा स्वभाव वाईटच होता असे म्हणता आले नसले, तरी त्या जरा चिडखोरच होत्या. कल्पना नव्हती इतक्या गारिबींत, येऊन पडल्यामुळें त्या थोड्या नाखूषच असत. त्यांतूनही आपल्या नवऱ्यानें कष्ट करावे आणि जाणत्या भावांनी त्यांच्या जिवावर चैन करावी याचें त्यांना वैषम्य वाटे.

हळु हळु 'रिकाम्या' भाऊजींची एकेक गोष्ट दादांच्या कानावर जाऊं लागली. आणि मधून मधून भावाभावांची कुरकूर सुरू झाली.

दादा शिकवणीला गेले होते. सकाळी वहिनी कांहींशा रागानेंच नानाला कांहींसे बोलल्या. नानानें ते शब्द विनोदावर नेऊन त्यांच्यावरच उलटवले. त्या सरशा वहिनी चिडल्या आणि बाचाबाची सुरू झाली. धाकटा भाऊ मध्यें पड-ल्यामुळें "तुम्ही दोघे माझा सूड घेण्यासाठींच इथें थांबला आहांत," अशा तऱ्हेची बडबड करून वहिनी खूप रडल्या.

घरांत अडचण आणि शिकवणीच्या घरचे तीन महिन्यांचे थकलेले पैसे तगादा करूनही न मिळाल्यामुळें दादा खूप चिडून आले होते. वहिनींकडून, त्यांतून आज जेवणाला जास्त वेळ झाला. त्यामुळें तर त्यांच्या संतापात जास्तच भर पडली.

जेवतांना नाना, भाऊच्या कानांत कांहींतरी कुजबुजला. झाले ! वहिनींनी सकाळचा राग उकरून काढला. आणि दादाच्या तोंडावर बडबडण्यास सुरु-वात केली.

" वहिनी आतां गप्प बसतां कां ? " वास्तविक नाना काकुळतीनें बोलला होता. पण दादांना काय वाटले कोण जाणे. ते एकदम उसळून म्हणाले, " तू कोण रे तिला दापून ठेवणार ? "

झाले, शब्दावरून शब्द वाढला आणि, " लेकाच्यांना मिळवण्याची अक्कल नाहीं. नुसते पोळाप्रमाणें खायला सांगा, बेशरमपणानें वाटेल ते बकतात, मला मुळींच पटणार नाहीं. बाहेर सारखी भगभग आणि घरांत पाऊल टाकावे तर ही कटकट. जीव नकोसा झाला आहे मला. तुम्ही तरी बाहेर चालते व्हा नाहींतर मलातरी मरायला सांगा, ". अशा तऱ्हेची बडबड दादांनी सुरू करतांच वहिनींचाही तोंडाचा पट्टा जोरांत सुरू झाला.

भाऊ आणि नाना दोघेही भरल्या पानावरून उठले दादा शाळेत गेले होते. जेवणावरून उठल्यापासून भाऊ आणि नाना एकमेकांशीं बोलत नव्हते. दोघेही आपापल्या परी विचार करीत जागच्या जागेवर चाळवाचाळव करीत पडले होते. मधून मधून दोघेही एकमेकांकडे पहात. दोघानाहीं कांहीं तरी बोलण्याची इच्छा होती खास. परंतु कोणी व काय बोलावे हेच त्यांना सुचत नसे.

अखेर ऐन दुपारचे सुमारास भाऊ उठला नाना शांतपणें जुन्या गादीच्या वळकटीशीं डोके टेकून डोळे मिटून पडला होता. त्याला झोप लागली होती कीं तो बळेंच शांत मुद्रा करून विचारमग्न झाला होता हे समजणेंच कठीण होते. भाऊ खिडकींत जाऊन उभा राहिला. त्यानें एकवार नानाकडे निरखून पाहिलें. तो हालचाल करीत नाहीं. असे पाहून त्यानें हळूच कपडे घातले. कोनाड्यांतील त्याच्या शाळेंतील त्या त्या वेळीं चालणारी दोनतीन पुस्तकें उचलली आणि तो जिन्यांत हळूच आला.

एकवार त्यानें वडलांच्या तसबिरीकडे निरखून पाहिले. त्याला काय वाटले कुणाला ठाऊक ! मागे मान वळवून त्यानें आंतील खोलीकडे नजर टाकली. वामकुक्षी करणाऱ्या वहिनींनीं सहजगत्या कुशी वळून त्यांच्याकडे पाठ फिरविली. पाऊल न वाजवितां भाऊ जिना उतरला.

डोक्यांत भिरभिरणाऱ्या विचारांच्या चक्रामुळें नाना स्थिरचित्त नव्हता. इच्छा आणि सवय नसताना त्यानें बळेंच झोप घेण्याचा प्रयत्न केला होता. अर्धवट सावधानता आणि अर्धवट गुंगी यांच्या मिश्रणानें त्यानें स्वप्नांत कसला तरी विचित्र देखावा पाहिला. त्यामुळें तो दचकून जागा झाला. त्यानें डोळे चोळून एकवार पुन्हां इकडे तिकडे पाहिले. मस्तक सुन्न झाल्याप्रमाणें त्याला वाटत होते.

शेजारच्या खोलींत वहिनी कुणाशी तरी बोलत होत्या. "पसरले असतील अथांग, मिळतय आयतं तेव्हां घेताहेत दुसऱ्याचा सूड." त्यांच्याशीं बोलणारी दुसरी व्यक्ती हंसली.

तिरीमिरी आल्याप्रमाणें नाना पुन्हा वळकटीवर पडला. पण दुसऱ्याच क्षणाला तो उठला. नळावर जाऊन त्यानें चूळ भरली. त्यानें डोळ्याला पाणी लावले. पण वरून लावलेल्या पाण्यापेक्षांही आंतील पाणी गालावर झटकन् उतरले.

खोलीत येऊन त्यानें अंगावर कपडे चढवले. विषण्ण चित्तानें तो खिडकी बाहेर नजर देऊन उभा राहिला होता. रस्त्यावरच्या नित्याच्या सवयीच्या देखाव्याकडे त्याचे लक्ष लागत नव्हते. पण कोणीही उच्चारलेले शब्द मात्र त्याच्या कानांत शिरत होते.

रस्त्यावर बावळट दिसणारा एक माणूस कसले तरी जादुचे प्रयोग करीत होता. त्याच्या प्रयोगाला हंसून त्यांची टिंगल करणारा माणूस सहज दुसऱ्याला म्हणाला "गरीब आणि दरिद्री असला तरी त्याच्या अंगी कांहीं कला असेल तर तो उपाशी कधीच रहाणार नाहीं."

बोलणारे निघून गेले. पण विषण्ण मनास्थितीतही नानाच्या मेंदुपर्यंत ते शब्द पोचले. त्यानें आपणाशीच मान हालविली. आणि डोक्यावर टोपी चढवून तो घराबाहेर पडला.

नाना बाहेर जातांना वहिनींची त्याची नजरानजर झाली. पण त्यांनीं त्याला एका अक्षरानेही विचारले नाहीं.

आई लहानपणीच वारलेली, वडील करड्या स्वभावाचे आणि मनोवृत्ती एक प्रकारें भेदरटच बनलेली त्यामुळे इतर मित्रमंडळी किंवा चहाते या भावंडांना फारसें कोणी नव्हतेच म्हटले तरी चालेल. येऊन-जाऊन तिघानाही जिवाभावाचा एकच मोठा आधार वाटे. आणि तो म्हणजे गिरजामाई-त्यांची सर्वांची थोरली बहीण.

कुणालाही कुणाशीं कांहीं महत्त्वाचे काम असले आणि आपल्या बोलण्याला भाऊ ऐकणार नाहींत असे वाटले की तिघापैकीं कोणतरी जाऊन आपले म्हणणे गिरजामाई समोर मांडी. आणि तिनें ती गोष्ट पटवून देऊन मान्य केली कीं त्यांचा कार्यभाग होई, अशीच त्यांची आजपर्यंतची पद्धत होती.

याच न्यायाला अनुसरून, नाना घरून निघाला आणि त्यानें तडक माईच्या घरचा रस्ता धरला.

दाराशीं येतांच चेहरा शक्य तेवढा निर्विकार करण्याचा प्रयत्न करून तो आंत शिरला.

" काय चाललं आहे माई ? " त्यानें पाटमोऱ्या बसलेल्या माईला प्रश्न केला.

तोंड फिरवून माई म्हणाली " ये, आंत ये. "
नाना दचकला. सतत हास्यमुख असणाऱ्या माईच्या डोळ्यांत आज पाणी तरारत होते. तिचा आवाजही कांहींसा बदलला होता.

तो मुकाट्यानें आंत जाऊन माईसमोर बसला. " काय झाले माई " त्यानें जरा काळजीच्याच स्वरांत प्रश्न केला.

" तूंच सांग मला काय झाले घरीं. सांगना, अगदी खरं सांग ? "

किंचितकाल स्तब्ध बसून त्यानें माईकडे नजर लावली.

" नाना सांगना काय झाले. माझा जीव किनई—"

" काय सांगायचं माई, आम्ही त्यांच्या जिवावर खाऊन त्यांचा सूड घेतो आहोत, मग त्याना कां अधिकार असणार नाहीं आम्हाला बोलायला. दादा मिळवते आणि वहिनी कष्ट करत्या; आम्ही दोघे ऐदोबा. माई आमच्या-

करून आम्ही कांहीं खटपट करीतच नाहीं का आजिवात! पण सध्यांच्या कठीण काळांत कुठें जमतच नाहीं त्याला काय इलाज? बोलूं देत. आजपर्यंत बोलून घेतलें पण यापुढें कुणाला बोलतील?

" म्हणजे " ?

" म्हणजे काय माई! पुन्हां मी यापुढें दादांच्या घरांत पाऊल ठेवीन तर शपथ. देवाच्या दयेनें माझ्या अंगीं हस्तव्यवसायाच्या दोन कला आहेत तेही नाहीं जमले तर शरीर धडधाकट आहे. कुठेंही हमाली करीन पण आतां पुन्हां दादांना न् वहिनींना तोंड दाखवणार नाहीं. तसें कशाला, मी स्पष्टच सांगतों माई, मी तुझा निरोप घ्यायला आलो आहे. झाली भेट तर होईल योग असेल तर. नाहीं तर.........

आणि त्याच्या डोळ्यांत पाणी आलें.

" एऽ बाबा " माई घाबरून जवळ जवळ ओरडलीच. " अरे काय तुमच्या मनांत आले आहे हें. तो एक मघाशीं येऊन असाच रडून बोलून गेला. म्हणाला, बाहेर भीक मागेन, धंदा नाहीं म्हणून तुरुंगांत जाईन नाहींतर जीवाचें वाटेल तें करीन, पण पुनः त्यांच्या घरीं नाहीं जाणार. अगदीं पिसाटा सारखें बोलला. रडला किती तरी. आणि वेड्यासारखें बोलतां बोलतां तिरी- मिरीनंच उठला न् चालूं लागला. त्याला म्हटलें अरे तूं जाणार कुठें? दिडकी तरी आहे कां तुझ्या खिशांत? तर म्हणाला, जुन्या पुस्तकांनीं दिला आहे. मला थोडासा आधार. हांका मारतां मारतां गेला. अगदीं मागें देखील नाहीं वळून पाहिलें त्यानीं."

" आतां तूं देखील तसेंच म्हणतोस! अरे रागाच्या भरांत मनुष्य नाहीं कां बोलून जात एखाद वेळ? त्याचें एवढें कशाला मनावर घ्यायला पाहिजे! दादा म्हणजे वैरी कां आहेत तुमचे? आणि वहिनी परक्याच्या असल्या तरी शेवटीं आपल्याच ना? असा अविचार नको करूं बाळ. जा. त्यालाच शोधून आण. आणि वाटेल तर दोन दिवस माझ्या घरीं रहा. "

" मान काय हलवतोस. वेड्यासारखें करूं नकोस. शपथ आहे तुला माझी. "

थोडा वेळ कोणचि कुणाशीं बोलले नाहीं. घरांत कांहींतरी पडझड झाल्याचें ऐकून माई उठून घरांत गेली.

झटकन् उठून तिच्या मागोमाग दारांत येऊन नाना ओरडला, "माई, जातो ग मी."

माई तितक्याच झपाट्यानें बाहेर गेल्या.पण नाना तिच्या दृष्टीच्या टप्प्या-बाहेर गेला होता.

आपेक्षेप्रमाणेंच रात्रीं दहाच्या पुढें दादा जवळजवळ घाबरल्यासारखेंच माईच्या घरीं आले.

अण्णासाहेब घरींच होते. पण दादांना पाहूनहि माई किंवा अण्णासाहेब कांहींच बोलले नाहींत. दादांना तशाहि मनःस्थितींत कसेसेंच वाटलें.

"ते आले होते इकडे ?" दादांनीं विचारलें.

माईनीं फक्त होकारार्थी मान हलविली.

"आहे कीं नाहीं चमत्कार ?" दादा खालीं बसतां बसतां म्हणाले. कसें वागावें हेंच समजेनासें झालें आहे मला. अगदीं त्रासून गेलों आहे मी. घरांत भांड्याला भांडें नाहीं कां सहजीं लागत ? मी तरी किती कांच सहन करूं ? बाहेर नोकरीचा ताप. घरांत हिची रोजची कटकट, मन तरी स्वस्थ कसें राहणार ? सहज दोन शब्द नाहीं बोललों तर तोंडांत मारून घ्यायची वेळ आणली पोरट्यांनीं. कुठें गेलीं कारटीं ? सांगून गेलीं आहेत ना तुला ?

दादांच्या नजरेला नजर लावीत माई म्हणाली, "नाहीं हो दादा, कुठं जाणार तें एका अक्षरानेंहि सांगितलं नाहीं मला. मीं खूप विचारलं, बोललें, पुनः घरीं जा म्हणून देखील सांगितलं होतं त्यांना."

"तुझ्याजवळून कांहीं पैसे बियसे घेतले कां त्यांनीं ?"

"छे. अन् मजजवळ असणार कुठून पैसे त्यांना द्यायला ?"

पुनः कांहीं वेळ स्तब्धता झाली.

थोडा वेळ विचार करून दादा म्हणाले, "उद्यां सकाळीं माझ्याबरोबर याल अण्णासाहेब ?"

"नाहीं." माईकडे एकवार पाहून अण्णासाहेब म्हणाले, "मला नाहीं येतां येणार." दादा आळीपाळीनें दोघांच्या तोंडाकडे पाहूं लागले. तशाहि मनःस्थितींत त्यांना अण्णासाहेबांच्या उत्तरानें एक प्रकारचा अपमान वाटला. दादा कांहींच बोलत नाहींत असें पाहून माई म्हणाली, "भलती शंका येऊं देऊं नका दादा, तुम्हाला नाहीं म्हणालें म्हणून; एक मोठी भानगड झाली आहे."

"म्हणजे?"

"म्हणजे असं!" आण्णासाहेब सांगू लागले "आमचे रावसाहेब किती गुणी आहेत तें ऐकून माहीत आहेच तुम्हाला. बरेंच दिवस प्रकरण आंतल्याआंत शिजत होतं शेवटीं आज एकदम हंडी फुटली. बऱ्याच मोठ्या रकमेच्या अफरातफरीबद्दल आज त्यांना अटक झाली होती. जामिनावर मोकळे आहेत आतां. वरच्यांचा अंगावर लोंढा आला कीं खालच्यापर्यंत त्याचे शिंतोडे यायचेच. तोच न्याय आम्हाला लागू झाला. पण पट्टेवाल्यापासून थेट अखेरपर्यंत माझं शुद्ध वर्तन सर्वांनाच माहित असल्यानं बचावलो. तथापि संगतीचा परिणाम भोवतोच कीं! संस्थेच्या कार्यकारी मंडळानं दुसऱ्या शाखेवर माझी तातडीनं बदली करून तीन दिवसांतच तिथं रुजू व्हायचा हुकूम दिला आहे. प्राणावर आलेलं शेपटावर निभावलं. नाहींतर आजच्या कठीण काळांत करतां काय?"

"हं"

मग सांगा आतां, उद्यां, तुमच्याबरोबर येऊं, कां इथून मुक्काम हालविण्याची तयारी करूं. आपण पडलों गरीब पोटार्थी लोक. आपल्याला स्वतःच्या मनाप्रमाणं वागतां येणार आहे थोडंच!"

दादा कांहींच बोलले नाहींत.

आणि त्यानंतरच्या चोवीस तासांतच दादा त्या ठिकाणीं आप्तस्वकीयांशिवाय राहिले.

चार वर्षें झालीं होतीं या गोष्टीला. स्वकीयांशिवायच्या एकलेपणाची जाणीव दादांना आणि काटेतोल सत्य बोलायचे म्हणजे वहिनींनाच जास्त जाणवत होती. आपलीं माणसें कोणी तरी आपल्याजवळ असावीं असें त्यांना अली-

कडे जास्त तीव्रतेनें वाटूं लागले होते. त्यांतून वहिनींचे वडील आजारीपणानें वारल्यामुळें व माहेरीं दुसरें कोणीच नसल्यामुळें त्यांचा तो एक निर्बळ मनांचा आधार नाहींसा झाला.

तशांतच दादा आजारी पडले. घरांत कुठल्याहि तऱ्हेची मदत करायला कोणी नाहीं; आणि कांहींशा तुसड्या स्वभावामुळें वहिनींचीही जास्त गट्टी कुणाशीच नव्हती; त्यामुळें त्यांना आपला एकटेपणा फारच जाणवूं लागला होता. तापाच्या भरांत दादा भावांचीं नांवें घेऊन हाका मारूं लागले म्हणजे त्यांना अतोनात वाईट वाटे. " किती झाले तरी त्यांची माणसं ती " त्या मनांत म्हणत.

एक दिवस दादांचा ताप अतोनात वाढला होता. डॉक्टर देखील त्यांना तपासल्यानंतर रोजच्याप्रमाणें मनमोकळेपणानें बोलले नाहींत. त्यामुळें वहिनींचा धीरच खचल्यासारखा झाला होता. त्यांना कांहीं सुचत नव्हतें. दुपारच्या वेळीं डोळे उघडून चौफेर पाहिलें. त्यांनीं तोंड उघडल्यावर वहिनींनी चमच्यानें पाणी घालून विचारले " काय पाहिजे ? "

नानातऱ्हेच्या उलटसुलट विचारांनीं त्यांना वेड्यासारखें झालें होतें. सकाळपासून त्या उपाशी तापाशीच दादांच्या अंथरूणाजवळ बसून होत्या. तापाच्या गुंगींत दादांनीं आतापर्यंत डोळे देखील उघडले नव्हते. त्यामुळें त्यांनीं त्यांचाकडे पाहून कांहीं बोलण्याची इच्छा दर्शवितांच त्यांना हायसे वाटून त्यांनीं प्रश्न केला.

" भाऊ, नाना आले कां ? " दादांनीं विचारलें.

वहिनींनी नकारार्थी मान हालविली. पण त्यांच्या डोळयांतून टचकन् पाणी आलें. " वन्मना लिहिलेल्या पत्राचं उत्तर नाहीं आलं अजून, पत्ता कळला तर तारेनेंच बोलावून घेऊ त्यांना आपण. येतील ते खात्रींनं. " वहिनी बोलत होत्या पण दादा आपल्याच तंद्रीत होते. त्यांचा नाना व भाऊचा ध्यास कायम होता.

त्याच दिवशीं संस्थेच्या कामाच्या निमित्तानें आण्णासाहेब आल्यामुळें वहिनींच्या काळजीचा भार बराच हलका झाला. दादांची रजा वाढवून घेण्याची

खटपट करून व स्वतः चारदोन दिवस तेथें राहून दादांना जरा बरे वाटतांच ते त्यांना आपल्या घरीं घेऊन गेले.

रजेची मुदत संपेपर्यंत दादांना पुष्कळच बरें वाटूं लागले होते. बहीण भावंडाना सारखा अचंबा वाटत होता तो एकाच गोष्टीचा, कीं दोघांहि भावांना दादाकडे राहूं द्या, पण चार वर्षांत माईकडे देखील एकहि पत्र नव्हते. दादा उद्यां परत जाणार म्हणून माई आज जरा उदासच होती. साहजिकच त्यांच्या भाषणांत धाकट्या भावांचा विषय निघाला होता. " बाकी पोरं इतकीं हट्टी आणि निग्रही निघतील अशी मला कल्पनाहि नव्हती. " असें दादा म्हणताहेत तोंच पोस्टमननें दारांत टाकलेलें पत्र आणण्यासाठीं ताईचा अरूण धांवत जाऊन त्यानें तें हस्तगत केलें.

दादांनीं कुतुहलानें तें पत्र घेतलें, आणि " अग माई ! " असें तें जवळ जवळ ओरडलेच.

" काय झालं ? " वहिनी आणि माई दोघींनीही एकदम विचारले.

दादांचा चेहरा खुलला. हंसऱ्या नजरेनें माईकडे पाहून ते म्हणाले, "सांग पाहू काय झाले असेल ? "

" रजा वाढली असेल झालं " वहिनी उद्गारल्या.

" छट् "

" मग आमची बदली झाली पुन्हां ? " माईनीं विचारलें.

" दोघीहि चुकलात मला पाहिजे होतें तें मिळाले ! "

" काय तें ? "

" नानांचा पत्ता. "

' अगबाई नानांचं का आलय पत्र ? अगदीं देवच पावला दादा.

आपणाला कायमची अंतरलेली मौल्यवान जिन्नस पुन्हा मिळाल्याच्या आनंदांत दादा दिवसभर होते. इतक्या दिवसापेक्षां आजच्या एका दिवसांतच त्यांना कितीतरी जास्त बरे वाटू लागले होते.

लौकरच तूंही माझ्याकडे आलेच पाहिजेस असें माईला आग्रहानें बजावून दादा आणि वहिनी घरीं परतली.

घरीं आल्याबरोबर दादानी पहिली गोष्ट केली ती ही कीं, अगदी काकुळतीनें त्यांनी नानाला घरीं येण्याबद्दल निदान भेटून तरी जा आणि भाऊचा पत्ता ठाऊक असल्यास त्यालाही घेऊन ये म्हणून लिहिले.

व्यक्ती नाहींशी होते पण आठवण कायम असते. वेळ निघून गेली तरी शब्द घुमत राहतात. जळून राख झाली तरी सुंभाचा पीळ कायम असतो. जखम भरून आली तरी त्या ठिकाणीं सहज लक्ष गेले तरीही सारा गतेतिहास अंतःश्चक्षू पुढें उभा राहून मनुष्य क्षणभर तद्रूप होतो.

दादांचें पहिलें पत्र लक्ष न देतांच नानानें हातावेगळें केलें होतें. पण एरवी आळशी वाटणारे दादा या बाबतींत मात्र पक्के प्रयत्नवादी बनले होते. नानानें त्यांच्या एकाही पत्राला उत्तर देण्याचे मनांत आणले नव्हते. पण त्यांचा दर आठपंधरा दिवसांना त्यांना बोलावून घेण्याचा क्रम मात्र त्यांनी सोडला नव्हता.

परवा परवापर्यंत नानाला आणि भाऊला देखील एकमेकांची खबर नव्हती. नाना सहज आपल्या व्यवसायानिमित्त एका संस्थानच्या गांवीं गेला होता. एका शेटजीना त्याला भेटायचे होते. त्याच्या एका शेजाऱ्याचा निरोप कळवावयाचा होता त्याला. दोन वेळ दुकानी जाऊनही शेटजी त्याला भेटले नाहीत. तिसऱ्या खेपेला एक नोकर त्याला म्हणाला "धाकटे दिवाणजी येईपर्यंत बसा. थोरले दिवाणजी गेले आहेत गांवाला तेव्हां धाकट्यांच्या जवळ निरोप ठेवा म्हणजे समजेल शेठजीना."

"कोणीतरी आले आहे शेटजींच्याकडे" नोकरानें कोणालातरी दिलेली माहिती ऐकून वर्तमानपत्र वाचणाऱ्या नानानें मान वर केली.

"कोण भाऊ ?" तो आश्चर्यानें उद्गारला.

"नाना तूं आणि इकडे कसा आलास ?"

किती दिवसांनीं-नव्हे वर्षांनीं त्या दोन भावांची भेट झाली होती. आणि तीही किती अकस्मिक रीतीनें. सांगावयाचा निरोप विसरून नाना कितीतरी वेळ आपल्याच सुखदुःखाच्या गोष्टी सांगत बसला.

नाना स्वतंत्रपणें कांहीं व्यवसाय करीत होता. आणि भाऊ नोकरीला राहिला होता. परंतु समाधानकारक प्राप्ती एकालाही नव्हती. स्वतःचा भार त्यांना दुसऱ्यावर टाकावा लागत नव्हता इतकेंच कायते !

त्यांचा तो दिवस अतिशय आनंदात गेला.

बोलतां बोलतां भाऊ म्हणाला " जवळ जवळ चार वर्षे होऊन गेली. पण अद्याप एक दिवस देखील घरीं जायची इच्छा झाली नाहीं. जाणार तरी कुणा-साठीं, दादांना आमची गरज नाहीं. "

" अरे खरंच ! सांगायचे राहिलेच तुला बोलावयाच्या नादांत. सहा महिन्यापासून दादांची पंचवीस पत्रें आली आहेत मला. "

" काय, दादांची पत्रें ? "

" होय खुद्द दादांच्याच हातची. आणखीं परवाच्या पत्रांत तर त्यांनी इतकें लिहिले आहे कीं माझ्या भेटीच्या इच्छेचा अंत आणखी किती पाहणार ? माझ्या काकुळतीला भीक न घालण्याइतकें तुम्ही असे निष्ठूर कसें बनलात ? तुम्हाला माझी भेट माझ्या घरीं येऊन घ्यायची नसेल तर आतां मलाच मुद्दाम रजा आणि कर्ज काढून तुझ्याकडे यावे लागेल. मी गरीब माणूस ! रागाच्या भरांत मर्यादा सोडून कांहीं बकलो असलो तरी मी माणूसच आहे. मलाही भावना आहेत. प्रेम आहे.

अशा तऱ्हेची त्यांची पत्रें सारखी येत असतात.

भाऊ द्रवला. कांहीं वेळ विचार करीत तो म्हणाला ' दादा इतकें निव-ळले अं, पण कायेर समज आपण तिकडे गेलो तर मला खरी भीती वाटते माईची काय म्हणेल ती ! दादांची गोष्ट सोडून दे. पण माईकडे कधी मी एकादे कार्डही टाकले नाहीं कीं तिची चौकशी सुद्धां केली नाहीं. खरंच तिच्या समोर जायची देखील शरम वाटेल मला "

" अरे पण माई तिथं कुठं आहे ? "

" मग "

'' आपण निघालो ना त्याच्या दुसऱ्याच दिवशीं तिही तिथून बदलून गेली. सहा महिन्यापूर्वीं मला कळलें. आणि मी सहज पत्र टाकले तिला. तें नेमके पडले दादाच्या हातांत.

'' दादांच्या ? ते कसे ? "

" दादा आजारी होते, म्हणून आले होते तिथें, आणि त्यावरून तर माझा पत्ता मिळून त्यानी पत्रं धाडली मला.

आणि एक दिवसाच्या मुक्कामांत अनेक वेळां चर्चा करून एकदां दादांना भेटायला जावयाचेच असे त्या बंधुद्वयाच्या बैठकींत ठरले.

पण नानाला मोकळीक करून घेता आली असली तरी भाऊ परस्वाधीन होता. त्यामुळें तितक्या सबळ कारणाखेरीज त्याला रजा मिळणें कठीण होते.

अखेर दादानी या पेचातून त्यांची मुक्तता केली. त्यांनी पत्रांत लिहिले होते " अनायसे बाबांचा श्राद्धदिन येतोच आहे. माई याच वेळीं येणार आहे. तरी तुम्हीही निदान चार दिवसांची तरी सवड काढून या. "

आणि जवळ जवळ पांच वर्षानंतर ते बहीणभाऊ एका घरांत जमले. एकमेकांच्या संगतींतला एक आठवडा कुणीकडे गेला हे त्यांना कळलेच नाहीं ! भाऊची रजा संपली. नानानें हातीं घेतलेले काम पुरें करून देण्याची मुदत भरत आली. आणि यजमानांना जास्त त्रास पडतो म्हणून माईही जाण्याची चुळबुळ करू लागली.

उद्यां दोघे भाऊ आणि परवां माई जाणार होती.

वहिनींच्या स्वभावांत इतका पालट पडला होता कीं याच कां त्या पूर्वीच्या वहिनी असा त्यांनाच प्रश्न पडे !

माईला एकही काम करू न देण्याचा निश्चयच वहिनींनीं केला असल्यामुळें सहाजीकच तिला भावंडांशी गप्पा मारण्याशिवाय उद्योगच नव्हता. आणि उद्यांच सर्वांची पांगापांग होणार म्हणून आज ते मनसोक्त बोलून घेत होते.

दुपारच्या जेवणानंतर दादा पेपर तपाशीत बसले होते. कोपऱ्यांत वर्तमानपत्र तोंडावर घेऊन भाऊ आडवा झाला होता. नाना आणि माई मधल्या खणांत बोलत बसली होती. तिन्ही भाऊ माईला सारखेच असले तरीही ती जास्त मनमोकळी नानाशीच बोले.

बोलतां बोलतां सहज विषय निघून माई म्हणाली, " खरंच नाना किती वर्षं गेली मध्यें, तुम्ही केव्हां येणार आतां माझ्या घरीं ? "

" यायची पुष्कळ इच्छा आहे माई; पण सवड आणि कारण दोन्ही एकदम जमली पाहिजेत ना ? "

माईचा अरुण रंगीत चित्रांचें पुस्तक चाळीत बसला होता. तो एकदम धांवत येऊन म्हणाला " ए मामा, हे बघ किती दिवे, जशी काय दिवाळीच. "

माई हंसून म्हणाली " पाहिलंस किती शाहाणा आहे माझा अरूण ! कसं सुचवलं मामाला दिवाळीला ये म्हणून. " आणि लगेच दादांच्याकडे वळून ती म्हणाली " खरंच दादा देवाच्या दयेनं मला सख्खे तीन भाऊ आहेत. पण गेल्या पांच वर्षांत मला आपलं दुसऱ्यालाच ओवाळण्याचा प्रसंग येतो. याल कां तुम्ही सारेचजण आमच्याकडे दिवाळीला ! खरंच याल कां ? "

दादा हंसून म्हणाले " बरं पाहूं "

" पण इतक्या वर्षांची तुंबलेली ओवाळणीची खंडणी कोणत्या रूपानं पाहिजे तुला " नाना मध्येंच म्हणाला.

" इश्श नाना, ओवाळणीसाठीं कारे मी बोलावते तुम्हाला ? "

" तसं नव्हे ग पण सांग तर खरं. समज आलो दिवाळीला, तर आपलं."

" ते मी सांगायचं असतं वाटतं. "

" पण मी विचारीत असतांना काय हरकत आहे सांगायला ? समज तुझ्या मनांत एकादी जिन्नस हवी असली, आणि आम्ही आणली भलतीच ! तर तुला फारसा उपयोग नाहीं आणि मनापासून समाधानही नाहीं. "

माई किंचित हंसून म्हणाली " ते खरं. "

" मग सांग पाहू तुला काय हवं तें तुला कांहीं तरी मनासारखी जिन्नस मागावीशी वाटत आहे. पण तूं संकोच करते आहेस सारखा. हं सांग लाजतेस कां ? "

" तसे नव्हे रे " किंचित चाचरत ती म्हणाली " अन् ती जिन्नस महाग असली तर ? "

तुला काय करायचं आहे त्याच्याशी ? पुढचा प्रश्न आमचा आहे ! "

" मग सांगू ? काल दुपारीं शेजारच्या वैजयंतीबाई नेसल्या होत्या ना तसलं जरीचं पातळ नेसायची मला फार दिवसापासून हौस; पण आपण पडलो गरीब माणसं " तिनें आळीपाळीनें तिन्ही भावांकडे पाहिले.

जणू काय प्रश्नाला इतके मार्क देणें योग्य होईल कीं नाहीं अशा अविर्भावानें दादांनीं नजर वर करून आढ्याकडे लावली. जागच्या जागेवरच भाऊ या कुशीच्या त्या कुशीवर झाला. आणि नानानें नुसतें हास्यमुख करून " असं काय ! " एवढाच उद्गार काढला.

तसलं जरीचं पातळ, कमीतकमी चाळीस रुपये किंमत ! तिघानी मिळून घ्यायचं ठरवलं असतं तरी देखील जडच गेलं असतं.

प्रत्येकजण स्वतंत्रपणे विचार करूं लागला. सर्वजण घरांत गेले.

पुन्हा तो विषय देखील निघाला नाहीं. माई आणि भाऊ, नाना आपल्या ठिकाणीं गेले. मात्र वरचेवर पत्र पाठवून मधून मधून भेट घेण्याचे आश्वासन घेण्यास मात्र दादा विसरले नाहींत.

माई गेल्यापासून दादा नियमानें घरीं उशीरा येऊ लागले. वहिनींना प्रथम प्रथम याचा अर्थच कळेना. ते सकाळीही उठून लौकर बाहेर पडत आणि रात्री येत ते उशिरा, आणि दमलेल्या स्थितींत.

" हल्ली इतकीं कसली कामं वाढली आहेत ? कशाला इतके श्रम घेतां तुम्ही ? " असें वहिनींनी एक दिवस विचारले. त्यावर दादा हंसून म्हणाले " तुला नाहीं समजायचं ते. मनाच्या समाधानासारखं सुख नाहीं जगांत. '

पण इतक्या श्रमांत कसले समाधान आणि कसलं सुख ठेवलं होतं, याचें कोडे मात्र वहिनींना शेवटपर्यंत न उकलल्यामुळें त्या संशयांतच राहिल्या.

अलीकडे नाना देखील आपल्या व्यवसायांत अधिकच गढलेला असे. यापूर्वी तो कांहींसा बेफिकीरच असे. पोटापुरते मिळाले म्हणजे मग जास्त मिळण्याबद्दल त्यानें फारशी कधी दरकार बाळगली नव्हती. पण सध्यां मात्र थोड्याश्या जास्त प्राप्तीसाठीं देखील तो खूपच मेहनत घेई.

" काय लग्न करायचा विचार आहे वाटतं ? फार श्रमतां आहां हल्लीं " असें कोणी त्याला सहज म्हटलें तर तो हंसून म्हणे "लग्नानं कुणी खरं समाधान मिळवलं आहे कां ? "

भाऊ कामावर रुजू झाला. पहिल्यापेक्षांही इमानानें आणि मेहनतीनें काम करीत होता तो. पण शेठजी पक्का चिक्कू ! त्याच्या प्राप्तीत त्याला पैची वाढ होण्याचें चिन्ह दिसेना. दिवाळी जवळ येत चालली तसतसा तो मनांतून नाराज होत चालला विचारा !

आणि एका पत्रांत तर त्यानें नानाना लिहिले देखील. " मला वाटलं होतं दिवाळीला माईकडे जातां येईल तर ठीकच. निदान तुला तरी इकडे बोलवावं, पण तेही दिसत नाहीं. शेठजी कुठंतरी नेमके त्याच वेळेला गांवाला पाठवणार आहेत. आणि परत फिरेंपर्यंत दिवाळी संपेल देखील एखादवेळ. "

दिवाळीच्या आधी चार सहा दिवस शेठजींच्या घरीं पाहुणे आले होते. सर्वांच्या डोक्यांतून कल्पना निघाली आणि जवळच्याच एका प्रसिद्ध ठिकाणीं जाण्याचे ठरले. परत फिरतांना शेठजींच्या गाडीला दुर्दैवानें जबरदस्त अपघात झाला. शेठजींचा एकुलता एक मुलगा भाऊच्या शिताफीनें – त्याच्या स्वतःचा जीव धोक्यांत घालून वाचविला गेला. म्हणून इतर नुकसानीची पर्वा न करता शेठजी आनंदांत होते.

भाऊला झालेल्या किरकोळ जखमांचे डॉक्टरचे बिल शेठजींनी मोठ्या उदारतेनें स्वतःकडे घेतलें.

दिवाळीच्या आदल्या दिवशीं भाऊ दुकानांत गेल्यावर शेठजी त्याला म्हणाले "भाऊ तूं काम तो लई नामी केला. पुढल्या म्हैन्यापासून तुला एक रुपया पगार वाढ केली. पर तुला आतावी काय पायजे ती बक्षिसी मागून घे."

भाऊच्या डोक्यांत विचार चमकून गेला.

"अरे खरंच सांगते हमी, लाजू नको, काय पायजे बोल?"

तरी भाऊ लाजलाच. आणि शेठजींचा आग्रह मनापासूनच आहे हे पाहून तो म्हणाला, "देणारच असाल तर काल नवीन माल आला आहे नां त्यांतलं तें नवीन डिझाइनचं 'जरीचं पातळ' द्या."

"अरे बालाजी" शेठजी जीभ चावून स्वतःशींच उद्गारले. त्यांनीं आपला शब्द खालीं पडूं दिला नाहीं. पण मनाच्या संशयास्पद स्थितींत आपलें वचन पुरें केलें.

भाऊची रजेची मागणी देखील त्यानें आनंदानें मान्य केली.

"प्रत्येकाला वाटत होतें, मीच एकटा चाललो आहे माईकडे. माईच्या घरूनच दादांना पत्र लिहू असा विचार करीत. आणि आपल्या आगमनाची वार्ता आगाऊ न कळवितां माईला थक्क करूं पाहणारा नाना दाराशींच अरुणाशीं चेंडू खेळणाऱ्या दादांना पाहून स्वतःच वरमला.

आणि भाऊ दारांत दिसतांच धावतच जाऊन अरुणानें शेजारच्या बाबूला वर्दी दिली "ए, बघ. आमच्या घरीं तीन तीन मामा."

त्या दिवसाइतका मोकळ्या मनानें घालविलेला आनंदाचा दिवस त्या भावंडांना आठवत नव्हता.

संध्याकाळीं फिरून आल्यावर नानानें भाऊला विचारलें "कायरे, काय ओवाळणी आणलीस माईला?"

"कां तुला काय करायचय्, आणली आहे आपली गरिबी सारखी"

"पण सांगशील तर खरं"?

"आणलं आहे 'जरीचं पातळ'"

"अरे जा"!

" जा काय ? तुला काय वाटतं तूंच तेवढा माईचा भाऊ आणि आम्हाला तिच्याबद्दल आपलेपणा नाहींच वाटतं ? "

" अस्सं, तरी म्हटलं स्वारी मघापासून आंतच काय करीत होती ? नक्की माझी ट्रंक उघडून पाहिलीस "

" छट्."

" तर मग माझी पिशवी पाहिली असशील. " दादा म्हणाले.

" पण तसं कशाला. हातच्या काकणाला आरसा कशाला ? पहाच कीं प्रत्यक्ष. "

सर्वजण आपापल्या देणगीकडे आंत धावले.

तोच रंग, तेच कांठ, तोच पदर. तिघांचीहि एकच देणगी बाहेर पडली.

तिघेंहि एकमेकांकडे पाहून अत्यंत मोकळेपणानें हंसले !

× × ×

बैठकीवर बसलेल्या भावांना ओवाळायला गिरजाबाई समोर उभी होती.

निरांजनाचा मंद प्रकाश तिच्या खुललेल्या शांत सात्त्विक चेहऱ्यावर पडून तिची तेजस्विता अधिकच भासवीत होता.

आणि प्रेमाश्रुंनीं ओल्या चिंब झालेल्या माईच्या अंधुक दृष्टीला त्रिमूर्ती बंधूंची एकच प्रेममय प्रतिमा दिसत होती.

---

# ११ : 'उपेक्षितांचीं मृत्युपत्रें'

( श्री. वि. त्र्यं. गर्दे )

मी एक गरीब मास्तर आहे. माझें मृत्युपत्र वाचून माझ्या नातेवाईकांना आनंदाऐवजीं नवीन संकटाची चोरटी चाहूल लागून वाईट मात्र वाटायचं. मास्तराजवळ अशी माहिती काय असणार कीं, त्याच्या वारसदारांनीं त्याच्या मृत्युपत्राचें आनंदानें आह्मी--स्वागत करावें; व त्याच्या मृत्युची उत्कंठतेनें वाट पहावी.

ज्यांच्याजवळ कांहीं प्राप्ति आहे अशीं माणसें आपलें मृत्युपत्र करून, आपल्या आशा आकांक्षांना कायदेशीर स्वरूप देतात. गरिबांच्या आशा--आकांक्षा त्यांच्या मरणावरोबरच मरतात. त्यांच्या दहनाबरोबरच जळून खाक होतात. त्यांची ओझरती आठवण सुद्धां उरत नाहीं. सुखाच्या सुरेल संगीतापुढें दुःखाच्या जगाला कर्कशपणाचीं कुणाला हाव असणार ? कोकिळेचीं गाणीं ऐकणाऱ्यांना, रातकिड्यांची किरकिर कशी ऐकाविशी वाटणार ?

कॉलेजचें शिक्षण पुरें करून खाजगी शाळेंत नोकरी धरितांना मनाला कोण आनंदाचें भरतें आलें ! आपण देशभक्तीचें कार्य करीत आहोंत. अंधःकारांत चाचपडणाऱ्या राष्ट्रांत ज्ञान-दीपांची रोषनाई करूं, असं मला वाटलं. शाळेंत शिकवायला गेलो. त्या पहिल्या दिवशीं मन आनंदांत नि उत्साहांत बुच-

कळून निघालं होतं. पूर्वी कधीं काळीं आकाश ठेंगणें होतें असें म्हणतात. मला पण माझें ध्येयाचें आकाश तसेंच हातां दोन हातांवर आल्यासारखें वाटत होतें.

सुरुवातीला मला शिकवण्या पुष्कळ मिळत असत. शाळेंत मिळणाऱ्या अल्प वेतनाकडे मी मुळींच लक्ष देत नसे. खाजगी शाळा चालवावयाच्या म्हणजे मास्तरांनीं त्याग करायला नको काय? त्यागाशिवाय राष्ट्रकार्य थोडेंच उरकणार आहे? मग मीच कां त्याग करायला कच खावी? शिकवण्याचा मिळणारा पैसा मी आसपासच्या भिल्लांच्या मुलांना शिकविण्यांत खर्च केला. पण आमच्या वरच्या अधिकाऱ्यांना तें सत्कार्य पाहवलें नाहीं. त्यांनीं आह्मा मास्तरांना शिकवण्या घेण्याचीच बंदी केली. चीड, संताप, उद्वेग सर्व कांहीं माझ्या मनांत आलें. पण खाजगी शाळेचे मुख्याधिकारी म्हणजे युरोपांतल्या सर्वाधिकाऱ्यावर ताण! पाण्यांत घाव घातला म्हणून त्याचें स्वरूप थोडेंच बदलतें? मधेंच शाळा सोडण्याचा विचार माझ्या मनांत आला. पण कितीहि जीव त्रासला तरी बोटीवरच्या प्रवाशाला, बंदराला लागल्याशिवाय बोट सोडतां येत नाहीं. माझें पण तसेंच झालें. शाळा सोडून जायचें तरी कुठें? शिवाय लहान मुलांच्या चिमण्या जगांतला मी राजा होतो. तें जग सोडून मला बाहेर जावेसेंच वाटेना. हीं मुलें माझ्याभोंवतीं जमतात, हंसतात, खिदळतात, संक्रांतीच्या दिवशीं तिळगुळाकरितां घरीं मुलांची रीघ लागून रहाते. जीवनांतील अमिश्र आनंद आणखी दुसरा कोणला असणार? आपल्या आई–बापांशीं बोलत नसतील इतक्या मोकळेपणानें माझ्याशीं हीं मुलें बोलतात. माझ्या सहवासाच्या कोंवळ्या उन्हांत हीं सारीं कमळें फुलतात, उमलतात. हीं सारीं माझींच नाहींत कां कमळें?

मनुष्याला दुःखाचे चटके लागूं लागले म्हणजे तो, काल्पनिक जलसिंचनानें आगीचा दाह कमी करितो. शाळेंतल्या मुलांच्या सहवासांत, पैशाच्या अभावीं बायकापोरांचे होणारे हाल मी असेच विसरून गेलो होतो. संध्याकाळ झाली कीं, सांवल्याप्रमाणें मुलें पण आपआपल्या घरीं निघून जात. किती केलें तरी ती दुसऱ्याचीं मुलें. त्यांच्या सहवासाला भुकेलीं अशीं माता-पितरें त्यांना पण होतींच कीं. घरीं आल्याबरोबर माझ्यापुढें संकटांचा डोंगर उभा असायचा. नदीपुढें डोंगर उभा राहिला म्हणजे ती त्याला वळसा घालून पुढें जाते. संक-

टांच्या डोंगराला वळसा घालण्याची क्षमता माणसांत असती तर ? मग दुर्दैव कुणाच्या पाठीस लागलें असतें ? वाढत्या वयाबरोबर मुलाबाळांचे कसें होईल याची विवंचना पण वाढूं लागली. रात्रीच्यारात्री मी जागून काढल्या. पण संकटें हीं जीवितांतलि न उलगडणारीं कोडीं असतात; मृत्यूला कवटाळल्याखेरीज हीं सुटूं शकतच नाहींत. शिवाय दैव-दुर्विलासाचे पाण्यांत पेरलेले पाणसुरंग असतात ते वेगळेच. वाढत्या वयामुळें माझा कान जरा नीट काम देत नव्हता. वर्गांत मुलें मला ऐकूं येणार नाहीं अशा आवाजांत मिस्किलपणे बोलायचीं. माझें लक्ष नाहींसें पाहून माझे जोडे पहिल्या बाकापासून मागच्या बाकापर्यंत पळवायचीं. मी एक हास्याचा विषय दिवसेंदिवस होत होतो. आदराची जागा थट्टेनें घेतली होती. मुलांच्या सहवासांत मला आतां आनंदापेक्षां उद्वेग वाटतो, उत्साहाऐवजीं निराशेची निशा चढते. रत्नाकरितां मी, ध्येयाच्या समुद्रांत उडी मारली, नाकांत तोंडांत पाणी गेलें, मी तें सहन केलें. पण शेवटीं माझ्या हातांत रत्नाऐवजीं शंख शिंपला मात्र आल्या. पिंजलेल्या कापसाचा एक एक धागा आपली वाट चालूं लागतो. त्याप्रमाणें माझ्या जीवितांतलि एक एक आशा पण मला सोडून जाऊं लागली. माझें ध्येयाचें आकाश नजरेसमोर आहे. पण पंख तुटलेल्या पक्ष्यागत उड्डाण करायला मी असमर्थ आहे, माझें शरीर आज वार्धक्याच्या स्वाधीन झालेलें आहे.

वार्धक्याला आर्थिक अनिश्चितीचें प्रखर ऊन सहन होत नाहीं. त्याला निवांतपणाची सावली हवी. तारुण्याची ऐन उमेद राष्ट्रसेवेला देणारे आम्ही खाजगी शाळेंतले मास्तर, म्हातारपणीं वारा नेईल तिकडे भटकणाऱ्या हवेंतल्या 'म्हातारी 'प्रमाणें परिस्थिति नेईल तिकडे जात असतो. वार्धक्य हें जीवित आणि मृत्यू यांना सांधणारे लोडसंस्थान आहे. आज मृत्यू माझ्या नजरेच्या टप्पांत आहे, त्याचें भेसूर स्वरूप मला भेडसावत आहे. माझ्या मागे मी लावलेल्या या चिमुकल्या फुलझाडांना ऊन-पाणी कोण देईल ? माझ्या वृक्षाच्या साहायानें वाढलेली ही वेल, करपून तर जाणार नाहीं ना ? तो पहा आमच्या समोरचा म्हातारा पक्षी; त्याला सुद्धां राहायला घर आहे. या क्षुद्र मुंग्या ! पण त्यांनीं सुद्धां आपत्कालाची सोय करून ठेवलेली असते. आणि आम्ही माणसें मात्र, जीवितांतलि

जमाखर्च जमवितां जमवितां जन्म वायां घालवतो. म्हातारपणीं आमच्या वाट्याला दुःख, निराशा, उद्वेग, पश्चात्ताप, येवढी बाकी मात्र उरलेली असते; ती आम्हाला कधींच चुकत नाहीं. वार्धक्याच्या सबबीवर मला शाळेंतून काढून टाकण्यांत आले. जणूं कांही तो माझाच गुन्हा होता. आतां पुढें घनदाट अंधःकार आहे. मातीचा गणपति अवघ्या दहा दिवसाच्या सहवासानंतर बोळवतांना लोकांच्या डोळ्यांत पाणी उभें राहिलेलें मी पाहिले आहे. पण आमची बोळवण करितांना मात्र वरिष्ठांच्या डोळ्यांचा उन्हाळ्यांतला मारवाड होतो. सहानुभूतीचा साधा ओलावा सुद्धां आम्हांला मिळत नाहीं. उलट मास्तर म्हणून सारे जग आमची कुत्सितपणें हेटाळणी करते. शाळा मास्तरच्या अभागीं मुलांनो! तुमच्या बापानें अनेकांच्या आयुष्यांत ज्ञानदीप लावला, पण तुमचे आयुष्य मात्र अंधःकारमय केलें. मेणबत्ती कितीही प्रखरपणें जळत असली तरी तिच्या ज्योतीची सावली मात्र काळी कुट्ट पडते. आम्हा मास्तरांच्या मुलांचे जीवित पण आम्ही असेच काळे कुट्ट करून टाकतो, मुलांनो! जा. अनाथालयें नि अर्भकालयें तुमची उत्सुकतेनें वाट पहात आहेत. तेथील हालअपेक्षा तुमचें आगतस्वागत करायला तत्पर आहेत. मी काय असून नसून सारखाच आहे. प्रखर ऊन पडल्यावर देव किती वेळ टिकूं शकेल? '

बांधल्या पेंढीचा सुटलासे आळ। तृण रानोमाळ भटकतें॥

बांधल्या तळ्याचा फुटलासे पाट। ओघ बाराबाट, धांवतात॥

पिंजला कापूस सुटे झाले धागे। धांवतील वेगे चहुवाटा॥"

अशीच तुमची स्थिती झाली आहे. जीवितांत कितीहि चुकलांत तरी ध्येयवादी शाळा मास्तर होण्याची चूक करूं नका. येवढीच माझी माझ्या मृत्युपत्रांत तुम्हाला ठेवलेली प्राप्ती आहे.

\+ + +

हा एक गिरणींतला म्हातारा झाडूवाला आहे. वयाचीं पंचावन्न वर्षे असून त्याला लिहितां वाचतां मुळीच येत नाहीं. कारण त्यानें हिंदुस्थानांत जन्मण्याचें पाप केलेलें आहे ना!

ज्या वयांत निवांतपणें आयुष्य काढायचें, मुलाला कॉलेजांत, मुलाली बोर्डिंगांत ठेऊन संध्याकाळचा वेळ हिंडण्या फिरण्यांत, सभा-व्याख्यानांत घालवायचा; त्या वयांत हा म्हातारा, ' ब्लोरूम ' मधल्या ' बीटरच्या ' घणघणाटांत, दिवसाचे आठ तास काढतो. मोहोरमांत निघणाऱ्या वाघाच्या सोंगामारखा, नखशिखांत हा कापसानें भरलेला असतो.

ह्याच्या सांगण्यावरून मी ह्याचें मृत्युपत्र लिहित आहे. भाषा आणि विचार मांडण्याची पद्धति माझी आहे. अनुभवाचा सही-आंगठा त्याचा आहे.

' मी पिकलें पान आहे. केव्हां गळून पडेन याचा नेम नाहीं. माझ्या आयुष्याचें हें घनदाट धुकें, विरल होऊन केव्हां अदृश्य होईल त्याचा नेमच नाहीं. मी जगलेलें जीवित रोख होतें. आतां बाकीचें उधार आहे. त्याची कांहींच शाश्वती देतां येत नाहीं.

वयाच्या आठव्या वर्षापासून मी कष्ट करीत आहे. पण रोज, नव्या उगवणाऱ्या सूर्याबरोबर पोटा-पाण्याचा प्रश्न मला सोडवावा लागतो. आठव्या वर्षी मी हॉटेलांत कप-बशा विसळून म्हाताऱ्या बापाला खयला देत असें. माझे सहकारी शाळेंतल्या वातावरणांत रममाण झाले होते. फुरसतीच्या वेळीं ते मला शाळेंतल्या मौजा सांगायचे. नोकरी सोडायची म्हणजे म्हाताऱ्या बापाच्या जीविताची वाताहत होणार होती. बापाकडे पाहून शिक्षणाची हौस मी मारून टाकली.

कायमचे डोळे मिटण्यापूर्वी आपल्या मुलाचे दोनाचे चार हात व्हावें असें माझ्या वृद्ध पित्याला अलीकडे अतिशय उत्कटत्वानें वाटू लागले होते. पित्याची शेवटची इच्छा म्हणून तिचा अव्हेर करूं नये अशा कल्पनेनें मी त्यांच्या म्हणण्याला होकाराची साथ दिली. एका अजाण, अल्पवयी गरिबाच्या मुलीनें मला नवरा केले. तिच्याही बापाला मुलीचें लौकर लग्न करून डोळे मिटायची इच्छा झाली असेल. त्या मुलीच्या बरोबरच आमच्या घरांत वाढतें दारिद्र्य आलें. अशीच कांहीं वर्षे लोटली. मुला-बाळांच्या पोटाकरितां तिला पण नोकरी करणें भाग होते. नाइलाजास्तव ' वाइंडिंग ' खात्यांत मी तिला नोकरी करण्याला परवानगी दिली.

पण दैव आमच्या पाठीमागे हात धुवूनच लागलें होतें. तिथल्या जॉबरची पापी नजर तिच्यावर फिरली. पगार वाढीचें आमिष तो तिला दाखवूं

जमाखर्च जमवितां जमवितां जन्म वायां घालवतो. म्हातारपणीं आमच्या वाट्याला दुःख, निराशा, उद्वेग, पश्चात्ताप, येवढी बाकी मात्र उरलेली असते; ती आम्हाला कधींच चुकत नाहीं. वार्धक्याच्या सबबीवर मला शाळेंतून काढून टाकण्यांत आले. जणूं कांही तो माझाच गुन्हा होता. आतां पुढें घनदाट अंधःकार आहे. मातीचा गणपति अवघ्या दहा दिवसाच्या सहवासानंतर बोळवतांना लोकांच्या डोळयांत पाणी उभें राहिलेलें मी पाहिले आहे. पण आमची बोळवण करितांना मात्र वरिष्ठांच्या डोळयांचा उन्हाळ्यांतला मारवाड होतो. सहानुभूतीचा साधा ओलावा सुद्धां आम्हांला मिळत नाहीं. उलट मास्तर म्हणून सारे जग आमची कुत्सितपणें हेटाळणी करते. शाळा मास्तरच्या आभागीं मुलांनो! तुमच्या बापानें अनेकांच्या आयुष्यांत ज्ञानदीप लावला, पण तुमचे आयुष्य मात्र अंधःकारमय केलें. मेणबत्ती कितीही प्रखरपणें जळत असली तरी तिच्या ज्योतीची सावली मात्र काळी कुट्ट पडते. आम्हा मास्तरांच्या मुलांचे जीवित पण आम्ही असेच काळे कुट्ट करून टाकतो, मुलांनो! जा. अनाथालये नि अर्भकालये तुमची उत्सुकतेनें वाट पहात आहेत. तेथील हालअपेक्षा तुमचें आगतस्वागत करायला तत्पर आहेत. मी काय असून नसून सारखाच आहे. प्रखर ऊन पडल्यावर देव किती वेळ टिकूं शकेल? ‘ ,

बांधल्या पेंढीचा सुटलासें आळ। तृण रानोमाळ भटकतें॥

बांधल्या तळ्याचा फुटलासे पाट। ओघ बारावाट, धांवतात॥

पिंजला कापूस सुटे झाले धागे। धांवतील वेगे चहुवाटा॥”

अशीच तुमची स्थिती झाली आहे. जीवितांत कितीहि चुकलांत तरी ध्येयवादी शाळा मास्तर होण्याची चूक करूं नका. येवढीच माझी माझ्या मृत्युपत्रांत तुम्हाला ठेवलेली प्राप्ती आहे.

+ + +

हा एक गिरणींतला म्हातारा झाडूवाला आहे. वयाची पंचावन्न वर्षे असून त्याला लिहितां वाचतां मुळीच येत नाहीं. कारण त्यानें हिंदुस्थानांत जन्मण्याचें पाप केलेलें आहे ना!

ज्या वयांत निवांतपणें आयुष्य काढायचें, मुलाला कॉलेजांत, मुलाली बोर्डिंगांत ठेऊन संध्याकाळचा वेळ हिंडण्या फिरण्यांत, सभा-व्याख्यानांत घालवायचा; त्या वयांत हा म्हातारा, ' क्लोरूम ' मधल्या ' वीटरच्या ' घणघणाटांत, दिवसाचे आठ तास काढतो. मोहोरमांत निघणाऱ्या वाघाच्या सोंगामारखा, नखशिखांत हा कापसानें भरलेला असतो.

ह्याच्या सांगण्यावरून मी ह्याचें मृत्युपत्र लिहित आहे. भाषा आणि विचार मांडण्याची पद्धति माझी आहे. अनुभवाचा सही-आंगठा त्याचा आहे.

' मी पिकलें पान आहे. केव्हां गळून पडेन याचा नेम नाहीं. माझ्या आयुष्याचें हें घनदाट धुकें, विरल होऊन केव्हां अदृश्य होईल त्याचा नेमच नाहीं. मी जगलेलें जीवित रोख होतें. आतां बाकीचें उधार आहे. त्याची कांहींच शाश्वती देतां येत नाहीं.

वयाच्या आठव्या वर्षांपासून मी कष्ट करीत आहे. पण रोज, नव्या उगवणाऱ्या सूर्यावरोबर पोटा-पाण्याचा प्रश्न मला सोडवावा लागतो. आठव्या वर्षी मी हॉटेलांत कप-बशा विसळून म्हाताऱ्या बापाला खयला देत असें. माझे सहकारी शाळेंतल्या वातावरणांत रममाण झाले होते. फुरसतीच्या वेळीं ते मला शाळेंतल्या मौजा सांगायचे. नोकरी सोडायची म्हणजे म्हाताऱ्या बापाच्या जीविताची वाताहत होणार होती. बापाकडे पाहून शिक्षणाची हौस मी मारून टाकली.

कायमचे डोळे मिटण्यापूर्वी आपल्या मुलाचे दोनाचे चार हात व्हावें असें माझ्या वृद्ध पित्याला अलीकडे अतिशय उत्कटत्वानें वाटू लागले होते. पित्याची शेवटची इच्छा म्हणून तिचा अव्हेर करूं नये अशा कल्पनेनें मी त्यांच्या म्हणण्याला होकाराची साथ दिली. एका अजाण, अल्पवयी गरिबाच्या मुलीनें मला नवरा केले. तिच्याही बापाला मुलीचें लौकर लग्न करून डोळे मिटायची इच्छा झाली असेल. त्या मुलीच्या बरोबरच आमच्या घरांत वाढतें दारिद्र्य आलें. अशीच कांहीं वर्षे लोटली. मुला-बाळांच्या पोटाकरितां तिला पण नोकरी करणें भाग होतें. नाइलाजास्तव ' वाइंडिंग ' खात्यांत मी तिला नोकरी करण्याला परवानगी दिली.

पण देव आमच्या पाठीमागे हात धुवूनच लागलें होतें. तिथल्या जॉबरची पापी नजर तिच्यावर फिरली. पगार वाढीचें आमिष तो तिला दाखवू

लागला. घरीं पोराबाळांचे होणारे हाल पाहून तिच्या पोटांत धस्स होत असें. त्यांच्या मुक्तीचा मार्ग नजीकच होता. पण तो अनीतीच्या काट्यांची पसरल। विखुरला होता. पेला ओठापाशीं आला होता. पण विषाचा प्याला होता.

आधुनिक गोष्टी—कादंबरींतल्या नायिकेप्रमाणें तिनें आपलें शील पैशाला विकलें नाहीं. शीलावर खरें खुरें प्रेम करणारी स्त्री वाटेल तें गमावेल पण शील गमावणार नाहीं. जिला शिलाची पर्वाच नाहीं तिनें तें विकलें नाहीं तरच नवल!

पण तेवढ्या करितां जॉबरची इतराजी होऊन तिला घरीं स्वस्थ बसावें लागलें. होतें तें पण गेलें. गिरणींत असतांना तिला दुःखाचा डोंगर दुरून साजरा तरी होता. पण आतां मात्र विस्तवानें वेढलेल्या विंचवासारखी तिची अवस्था झाली. तिनें नक्कीच हाय खाल्ली होती. चरकांत पिळून निघणाऱ्या उसाप्रमाणें ती पिळून निघत होती. दुःखाची दाट छाया तिच्या मुखावर पसरली होती. कधीं हंसलीच तर तेंही दोन कळ्या घासल्यासारखें. त्यांत जिवंतपणाचा मुळीच अंश नसे. माझी बायकोच काय ती माझ्या सुखाचें निधान होती. पण तिनें आपल्या गैर हजेरीनें वादळांत सांपडलेल्या होडीगत माझें आयुष्य करून टाकलें आहे. जुन्या आठवणींनी ऊर फाटून निघतो मात्र. कापडांतले आडवे धागे निखळले म्हणजे उभे धागे लुळे पडतात. बायकोवाचूनचें माझें आयुष्य पण तसेंच झालें. कच्च्या बच्च्यांना भुकेला भाकरी देण्याकरितां अविश्रांत मेहनत करावी; नि बोलावणं आलें कीं हजेरी द्यायला इथून निघून जावें इतकेंच माझें जीवित.

वाईट इतकेंच वाटतें कीं, आयुष्यभर श्रम करणाऱ्याचें जीवित पैशाच्या अभावीं वाऱ्यावरच्या पाचोळ्यागत व्हावें, नि ऐतखाऊपणाला कवडीमोलानें सुख विकलें जावें. समाजांत श्रमाला योग्य मान मिळेपर्यंत आमची मृत्युपत्रें हीं अशींच रक्तांकित व्हायचीं. निराशा, विषण्णता, आर्थिक व्यवस्थेबद्दलची चीड: येवढीच माझी माझ्या मुलाबाळांकरितां जतन केलेली प्राप्ति आहे.

# १२ : रामायणाचे जैन अवतार !

( श्री. दि. मो. हातवळणे, एम्. ए. )

आदि कवि वाल्मीकि यांनीं प्रणीत जें राम चारित्र, याची थोरवी भारतीय आबाल-वृद्धांस सांगणें नलगे. रामायणाचा मोठेपणा, त्यांतील इतिहासावर अवलंबून नसून त्याच्या कथानकांतील आदर्श व्यक्तींच्या चारित्र्यावर आहे. आपल्या मनावरील त्यांची छाप इतकी दृढ झालेली आहे कीं, आज दोन हजार वर्षांच्या कालांतरानें ती यत्किंचितही कमी झालेली नाहीं. या वस्तुस्थितीचा परिणाम, आर्यावर्तांत उदय पावलेल्या इतर धर्मांवर झाल्याशिवाय राहिला नाहीं. शकपूर्व ६०० वर्षांच्या सुमारास वैदिक धर्मांतून फुटून निघालेले असे बुद्धधर्म व जैनधर्म हे होत. वैदिक धर्माची यज्ञयागपद्धति या सुमारास इतकी परमोच्च कोटीप्रत पोचली कीं त्याची प्रतिक्रिया ( Reaction ) होणें अगदीं अपरिहार्य होतें. व शेवटीं गौतम व महावीर हे क्षत्रियकुलांतील दोन ‘ सुधारक ’ ब्राह्मण्याच्या म्हणजे वैदिक यज्ञधर्माच्या कक्षेंतून बाहेर पडले व आपापल्या कल्पनेप्रमाणें पंथस्थापना करून स्वमतप्रचार करूं लागले. हा साधारण इतिहास व त्याचे हिंदुधर्मावर झालेले परिणाम बहुतेकास विश्रुत आहेतच.

कालेंकरून दोन्ही धर्मांनी आपल्या धर्माची ग्रंथनिष्पत्ति केली व धर्मग्रंथ अस्तित्वांत आल्यावर त्याला पूरक अशीं इतर उपांगे निर्माण होऊं लागलीं. धर्म

म्हटला कीं, त्याला बहुजन समाजाकरितां कथावाङ्मय म्हणजे धर्मकथा, आर्य-कथा, पुराणें या वाङ्मयाची निर्मिति करणें क्रमप्राप्तच असतें, हें उपबृंहक वाङ्मय वैदिक धर्मांत रामायण, महाभारत, अष्टादश पुराणें इत्यादि रूपांत होतेंच. बुद्ध व जैन धर्माचे अनुयायी हिंदु धर्मांतून आले असल्यामुळें त्यांच्यावर हा हिंदु संस्कृतीचा ताबा पूर्णपणें होता. तेव्हां तो ताबा नाहींसा होणें ही अशक्य कोटींतील गोष्ट आहे हें नव्या पंथांच्या प्रचारकांस कळून चुकलें. ताबडतोब त्यांनी एका विशिष्ट उपायाचा अवलंब केला. तो म्हणजे हिंदुकथावाङ्मयाला, आपल्या धर्माच्या चौकटींत बसवून व नवा पेहराव देऊन तीं कथानकें आत्मसात करणें हा होय. या दगडानें दोन पक्षी मारतां आले. एक तर ह्या नव्या धर्माची कथा-वाङ्मयाची जी उणीव तीही भरून आली, व आपल्या कळपांत आलेल्या हिंदुंच्या भावनेला व संस्कृतीला कायम ठेवून नव्या धर्मावरील त्यांची श्रद्धाही बळकट करतां आली.

या उपायाचा अवलंब बुद्धधर्मीय व जैनधर्मीय या दोघांनीं पुरेपूर केला. धर्माचें प्रमुख अंग श्रद्धा व भक्ति ही दृढ होण्यास सत्पुरुषांचीं उदात्त चरित्रें कारणीभूत होतात. अशा चरित्रांची वाण पडूं नये व त्यासाठीं दुसऱ्या धर्मांतील ग्रंथाकडे पहाण्याची पाळी येऊं नये, ही जाणीव जशी बळावत चालली तसे चरित्रग्रंथ निर्माण होऊं लागले. आरंभीं म्हटल्याप्रमाणें रामायण हे अशा आदर्शचरित्रांचें उत्तम उदाहरण होय. हा ग्रंथ बौद्धांना व जैनांना हवासा वाटूं लागला. अर्थात् त्यांचे पंडित रामचरित्रावर ग्रंथ लिहूं लागले. अशा रीतीनें रामायणाला बौद्ध व जैन अवतार दिला गेला . हा अवतार देतांना , प्रयोगाचे सोईसाठीं फेरफार ' करावे त्याप्रमाणें आपल्या धर्मतत्त्वांना शोभून दिसेल असें फेरफार मूळ रामायणांतील कथानकांत झाले. आज आपण त्यांपैकीं जैनधर्मीयांनीं केलेली रामायणाची नवी मांडणी किंवा आवृत्ति कोणत्या स्वरूपाची आहे, हें पहाणार आहोत. हिंदुधर्मीयांनीं सुद्धां वाल्मीकि रामायणानंतर आनंद रामायणासारखीं इतर रामायणें केलीं. परंतु त्यामुळें मूळ ग्रंथाची हानि न होता कथानक तसेंच राहून उपकथात्मक भाग वाढला. म्हणून त्याचा विचार करण्यांत स्वारस्य नाहीं. जैनांचें तसें नाहीं. धर्माचीं तत्वेंच बदललीं तेथें जैन राम व

जैन सीता बदलणार यांत नवल काय ? ह्या बदलामुळें रामायणाची सौंदर्यहानि झाली किंवा त्याच्या मूळ निसर्गरमणीय मनोहरतेंत भर पडली काय हें आपणास पहावयाचें आहे.

जैन वाङ्मय हें पुष्कळच विस्तृत आहे. रामचरित्रावर अनेक ग्रंथ असून त्रोटक वृत्तांतही इतस्ततः विखुरलेले आढळतात. परंतु ठळक असें वृत्तांत असणारे ग्रंथ किंवा रामचरित्रें खालीलप्रमाणें होतः—

( १ ) विमलसूरिकृत 'पउमचरिय' इ. इ. १ लें शतक or 300A.D.

( २ ) रविषेणकृत पद्मपुराण, ५००

( ३ ) गुणाढ्यकृत उत्तरपुराण-पर्व ६८.

( ४ ) अभितगतिकृत धर्मपरीक्षा.

( ५ ) हेमचंद्रकृत त्रिषष्ठिशलाकापुरुषचरित—पर्व ७ वें. 1200 A. D.

( ६ ) वासुदेव हिंदी. ८०० A. D.

यापैकीं कांहीं ग्रंथ प्राकृत म्हणजे जैन महाराष्ट्री व कांहीं संस्कृत भाषेंत रचिले आहेत.

रामायणाचे सर्वांत जुनें जैन रुपांतर म्हणजे पउमचरिय हें होय. तेव्हां प्रथमतः त्याचा सविस्तर विचार करूं:—

## ( १ ) पउमचरिय

' पउमचरिय ' ( सं. पद्मचरित ) म्हणजे पद्माचें चारित्र. राम पद्मदलांप्रमाणें श्यामवर्ण असल्यामुळें जैनग्रंथांत त्याचें नांव पद्म असें आहे. पद्मचरित हा ग्रंथ म्हणजे जैनांचें रामपुराण अर्थात् रामायणच होय. याचा कर्ता ' विमलसूरी ' हा ' नागिलवंशां ' तील कवि असून त्यानें हें चरित्र इ. सनाच्या पहिल्या शतकांत रचिलें असें नमूद केलें आहे. परंतु ग्रंथांतर्गत पुराव्यावरून हा काल थोडा अगोदरचा वाटतो. वास्तविक रचनाकाल ख्रिस्तोत्तर तिसरें शतक हा असेल असें जर्मन पंडित याकोबी म्हणतो. श्री. उपाध्याय यांचे मतें तर हा ग्रंथ इ. स. ६००–७०० मध्यें लिहिला गेला. परंतु त्यांनीं जे पुरावे आधारभूत


घेतले आहेत ते विवाद्य व संशयास्पद दिसतात. असो. पद्मचरितामध्यें एकूण ११८ पर्वें किंवा ' उद्देशक ' असून महाकाव्याचे नियम पाळून रचना केलेली आहे. ग्रंथारंभीं प्रस्तावना करून सारांश दिला आहे व कथेस सुरुवात केली आहे.

उपोद्घात: मंगलाचरण व सज्जनप्रसंशा, दुर्जननिंदा करून कवीनें ' वस्तु-निर्देश ' केला आहे. रामचरित अत्यंत जुनें असून आद्य प्रणेता महावीर यानें तें प्रथम सांगण्यास सुरुवात केली. एकदां मगधदेशच्या श्रेणिक राजानें तें ऐकलें: परंतु त्या अद्भुत व उदात्त कथेवर त्याचा विश्वास बसेना. शंका निवारणार्थ तो राजा महावीराचा शिष्य गोतम याजकडे जाऊन रामचरित संपूर्ण स्वरूपांत ऐकण्याची इच्छा करूं लागला. गौतमानें रामायणाविषयीं कशा विचित्र समजुती जगांत प्रचलित आहेत व त्यामुळें खऱ्या रामायणाचा लोकांमध्यें विपर्यास केला गेला आहे हें सांगितलें

उदाहरणार्थ, रावणाला दहा तोंडें असून तो मांस खात असे. कुंभकर्ण सहा महिनें अन्न वर्ज करून झोप घेई; ह्या व अशा भ्रामक कल्पनामुळें रामायणाची हेळसांड झाली. तेव्हां खरी कथा सांगणें क्रमप्राप्तच आलें; व गौतमानें ती सांगण्यास आरंभ केला

कथानक:—सात पृथ्वी असून आपण राहतो ही रत्नप्रभा पृथ्वी. या पृथ्वींत पुरातन कालीं चार वंश होते. ते म्हणजे इक्ष्वाकु, सोम, वानर व विद्याधर हे सर्व मानववंशच होत इक्ष्वाकूवंशांत अनरण्य, दशरथ, राम हे जन्मले. वानर व विद्याधर हे मूलत: एकाच वंशाचें होत परंतु कांहीं विद्याधरांनीं आपलें निशाण वानरचिन्हांकित केल्यामुळें त्यांचा स्वतंत्र वर्ग पडला, तेच वानर होत, वानर म्हणजे ज्यांना आपण वानर म्हणतो ते नव्हत. तर, वानर नांवाचें मानव. यावंशांत वाली सुग्रीव, मारुती ( हनुमान ) हे उत्पन्न झाले. विद्याधर हें नांव ज्या वंशाला होतें त्यांत रावण, बिभीषण, भानुकर्ण (कुंभकर्ण), चन्द्रनखा ( शूर्पणखा ) वगैरे जन्मले. त्यांना निरनिराळ्या माया अवगत असल्यामुळें विद्याधर असें नांव पडलें. वास्तविक ते मानवच होत. पुढें ह्या सर्व वंशांत विवाहादि व्यवहार होऊं लागले. यानें चन्द्रनखेची मुलगी अनंगसेना इच्याशीं लग्न केलें.

विद्याधरवंशाची उत्पत्ति व नातीं पुढील वृक्षावरून स्पष्ट होतील:-




रावण जन्मल्यावर त्याच्या आईनें एक नवरत्नांचा हार घातला. त्या नऊ रत्नांमध्यें रावणाच्या मुखाचीं नऊ प्रतिबिंबें दिसून जणूं काय त्याला दहा मुखें आहेत असा भास होऊं लागला ! यावरून त्याला दशमुख असेंही दुसरें नांव पडलें. वास्तविक त्यांस इतरांप्रमाणेंच एक मुख होतें.

अंजनीला मारुती झाला तो अत्यंत शुभ मुहूर्तावर झाला. त्याच्या कुंडलींत अनेक ग्रह उच्च स्थानाचें होते.

वर वर्णिलेले वंश सर्व जिनधर्माप्रमाणें वागणारे असत.

एकदां रावणानें मंदरपर्वतावर जैन देवालयांत एका ज्योतिषाकडून ऐकलें कीं दशरथ पुत्र पद्म ( राम ) हा आपल्या मृत्युस कारणीभूत होणार आहे. हें कळतांच त्यानें दशरथ, जनक यांना मारण्याकरितां माणसें पाठविलीं. परंतु नारदानें हीं बातमी दशरथास अगोदर दिल्यामुळें त्यांना जीव बचावतां आला. दोघांनीं आपले पुतळे घरांत करून ठेवले. इकडे रावणदूतांनीं ते लाखेचे पुतळे न ओळखतां त्यांचीच डोकीं कापून नेलीं ! व रावणास जनक, दशरथ मेले असें कळविलें. या अज्ञातवासांत दशरथ, कैकेयीचें स्वयंवर चाललें होतें तेथें आला. कैकेयीनें त्यालाच माळ घातली. असल्या अज्ञात कुलशील पुरुषास कैकेयीनें वरल्यामुळें सर्व राजे क्रुद्ध झाले व तेथेंच दशरथ व राजे यांचे युद्ध जुंपलें. परंतु कैकेयीनें दशरथाचें सारथ्यकर्म केलें त्यामुळें एकट्यानें सुद्धां त्याला सर्वांचा पराभव करता आला. येथें कैकेयीनें दोन 'वर' दशरथाकडून मिळविले. नंतर कांहीं वर्षांनीं कौसल्या, सुमित्रा, कैकेयी यांना पुत्र झालें. त्यांत राम सर्वांचा

आवडता, श्रेष्ठ गुणवान असा होता. थोड्याच अवधींत सर्व राजपुत्र अस्त्रादि कलेत पारंगत झाले.

इकडे जनकाला सीता व भामंडल अशीं जुळी मुलें झालीं. भामंडलास कांहीं विद्याधरांनी पळवून नेले. सीता मोठी झाल्यावर जनकानें तिचा विवाह रामाशीं ठरविला. कारण या वेळेपर्यंत रामानें अनेक म्लेच्छ, भिल्ल इ. पराक्रमी शत्रूंचा निःपात करून कीर्ति मिळविली होती.

सीतेच्या सौंदर्याची ख्याति देवलोकीं जाऊन पोचली होती. म्हणून तिला एकदां पहावी, या हेतूनें नारद जनकाच्या वाड्यांत आला व अंतःपुरांत शिरला. त्याचा विचित्र वेष पाहून स्त्रिया ओरडत पळू लागल्या, तेव्हां कंचुकींनीं त्याला पकडलें व ते त्याला चोप देऊं लागले. पण नारद चलाखी करून एकदम वर आकाशांत उडून गेला. झालेल्या अपमानाची भर करण्याकरितां त्यानें सीतेला त्रास देण्याचे ठरविलें, सीतेची तसवीर तिचा भाऊ भामंडल याच्या नजरेस पडून तो प्रेमविव्हल होईल अशी नारदानें व्यवस्था केली. पुढें भामंडालला स्वतःची चूक कळून आली. वहिणीवर प्रेम केल्यामुळें त्याला जगाचा तिटकारा आला व पुढें तो प्रवाजक झाला. इकडे सीता-स्वयंवरांत रामानें विद्याधरांचें 'वज्रावर्त' धनुष्य वाकविलें. त्यामुळें सीतेशीं त्याचा विवाह झाला भरताला वैषम्य वाटूं नये म्हणून त्याचाही सीतेच्या चुलत बहिणीशी विवाह करून दिला.

दशरथ वृद्ध झाल्यामुळें यतिदीक्षा घेण्यास प्रवृत्त झाला, तेव्हां कैकयीनें भरताला राज्य मिळावें असा वर मागितला. राजानें कबूल केले. पण भरतच तयार होईना! शेवटीं रामाच्या आग्रहास्तव त्यानें राज्यारोहण केलें. आपण तेथेंच राहिलों तर भरतास मोकळें वाटणार नाहीं. म्हणून राम, लक्ष्मण व सीता यांना घेऊन वनवासाला गेला.

वनवासांत रामानें पुष्कळ सत्कृत्यें केलीं. लक्ष्मणानें अनेक शत्रु मारिलें. त्यानें बऱ्याच राजेलोकांना मदत केली व त्यांनीं दिलेल्या कन्यांशीं विवाह केले. व कांहींना आभयवचन दिलें. रामानें प्रत्यक्ष लढाई कोणाशीं केली नाहीं. फक्त लक्ष्मणास मदत करण्यापुरतें शस्त्र उचललें. वनांत सुद्धां त्यानें श्रद्धाळू जैनाप्रमाणें सात्त्विक वर्तन ठेविलें होतें. एकदां लक्ष्मणानें शंबूकाला मारलें तेव्हां त्याची आई

चंद्रनखा ( रावणाची बहीण ) पुत्रशोकानें वेडी झाली व तिनें आपला पति "खरदूषण" याला लक्ष्मणाचा निःपात करण्यास पाठविलें. खरदूषण मोठें सैन्य घेऊन आला. पण एकट्या लक्ष्मणानें सर्वांचा धुव्वा उडविला. रावणहि मदतीला आला होता, पण सीता दिसल्यावर त्यानें खरदूषणास मदत करण्याऐवजीं सीतेला पळवून नेलें. कारण राम त्यावेळेस लक्ष्मणाकडे गेला होता. त्याला लक्ष्मणाची हांक ऐकूं आली होती. वास्तविक ती हांक रावणानें लक्ष्मणाच्या कृत्रिम स्वरानें मारली होती. जटायूच्या प्रतिबंधास न जुमानतां रावण विमानांतून लंकेस सीतेसह चालता झाला. त्यानें सीतेचें प्रेम आपल्यावर बसावें म्हणून खूप प्रयत्न केले; कदाचित् त्यानें अत्याचारहि केला असता परंतु पूर्वी एकदां त्यानें व्रत घेतलें होतें. तें व्रत असें कीं, कोणाहि स्त्रीला तिच्या संमतीखेरीज भ्रष्ट करावयाचें नाहीं. या व्रतामुळें सीतेला लंकेंत पवित्र राहतां आलें.

इकडे रामलक्ष्मण सीतेचा शोध करीत हिंडूं लागले. प्रथम त्यांची सुग्रीवाशीं ओळख झाली. हा सुग्रीव वानरांचा राजा होता. त्याचा थोरला भाऊ वाली पूर्वीच 'वानप्रस्थ' झाला असून त्या दोघांत वाकडें नव्हतेंच; परंतु तिसराच कोणी मायावी सुग्रीवाचें रूप घेऊन त्याच्या राजवाड्यांत शिरला, व खऱ्या सुग्रीवाला त्यानें हांकून दिलें! सुग्रीवाची पत्नी तारा व त्याचे अमात्य या तोतयालाच सुग्रीव समजूं लागलें. नंतर रामानें खऱ्या सुग्रीवाला मदत करण्याचें ठरविलें. अमात्याच्या म्हणण्याप्रमाणें दोघां सुग्रीवांत युद्ध लावून जो जिंकेल त्याची बाजू खरी असें ठरलें. युद्धांत खरा सुग्रीव हरला. पण पुनः द्वंद्व जुंपलें, त्यांत रामानें तोतयाशीं द्वंद्व करून त्यास ठार केलें. मरतांना त्याचें अंगांतून एक वेताळ बाहेर पडला!

पुढें वानरांनीं, रामानें सीतेचा नाद सोडून द्यावा म्हणून प्रयत्न केले. कारण रावण अति बलाढ्य असून अत्यंत अभेद्य जागेंत राहात होता. राम ऐकेना, तेव्हां त्याचें बल समजावें या इच्छेनें 'कोटिशिला' पर्वताचें शिखर जर त्यानें उपटलें तर त्याला मदत करावी असें वानरांनीं ठरविलें. रामाऐवजीं लक्ष्मणानेंच तें शिखर सहज उपटून टाकलें. यानंतर सर्व वानर लक्ष्मणाच्या आधिपत्याखालीं लंकेवर चालून गेले; व दोन्ही पक्षांत तुमुल युद्ध जुंपलें. शेवटीं लक्ष्मणानें रावणाला ठार मारलें. व बिभीषणास लंकेचा अधिपति केलें.

सीतेच्या अग्निदिव्याचे वेळीं अग्नीचें रूपांतर पाण्यांत झालें, हा चमत्कार पाहून सीतेविषयीं सर्वांना आदर उत्पन्न झाला.

यापुढील कथानक थोड्या फरकानें वाल्मीकीप्रमाणेंच आहे.

## कथानकांतील फरक व त्याची युक्तायुक्तता.

वर दाखविलेले फरक महत्त्वाचे असल्यामुळें तेवढेच विस्तरशः मांडले आहेत. याखेरीज अन्य बदल खूप सांपडतील, पण त्यांना तादृश महत्त्व नाहीं. आतां हे फरक जैन लेखकानें कां केले, त्यांत त्यानें काय मिळविलें याचा विचार करूं.

आरंभीं लक्षांत घेण्याची बाब म्हणजे जैनधर्म. तत्त्वांमध्यें हिंदुधर्मापासून भिन्न असल्यामुळें धार्मिक फेरफार करणें जरूर आहेत. तसें करतांना कथेंत पण बदल होणारच. उदाहरणार्थ राम हा एक जैन होता. तो सात्त्विक असल्यामुळें हिंसा करणें शक्यच नव्हतें. याचा परिणाम असा झाला कीं, प्रस्तुत कवीला मायामृग व मारीचहनन हा प्रसंग गाळून त्या ऐवजीं दुसरेंच कथानक तयार करावें लागलें. कारण जैन राम मृगाची शिकार कशी करील ? त्याचप्रमाणें खर-दूषणादि १४००० राक्षस व रावण यांना मारण्याचें काम लक्ष्मणावर टाकलें गेलें. शूर्पणखा व ताटका ह्या स्त्रिया असल्यामुळें ते प्रसंग अजिबात वगळले.

वाल्मीकिच्या कथानकाप्रमाणें रामाच्या धीरोदत्त चरित्रांत तीनच दोष रामावर येतात. ते म्हणजे ताटकावध, वालीवध व सीतात्याग हे दोष संस्कृत वाङ्मयांतील नाटककारांनीं व कवींनीं आपल्या ग्रंथांत काढून टाकण्याचा प्रयत्न केला आहे. किंवा त्यांचे गुण म्हणून समर्थन करण्याचाही प्रयत्न केला आहे. जैन रामायणकर्ता प्रस्तुतचा ‘ विमलसुरी ’ याच्या लक्षांत ही गोष्ट होतीच. त्यानें पहिला प्रसंगच गाळला व वालीऐवजीं एक तोतया सुग्रीव निर्माण केला ! येथें जरी वाल्मिकीला सुधारण्याचा प्रयत्न केला आहे तरी तो पटत नाहीं. एवढें मात्र निश्चित कीं वालीवधाचा दोष रामाच्या स्वभावाशीं विसंगत वाटण्यासारखा होता येथें तो नाहींसा झाला.

वाल्मिकीचा राम क्षत्रिय आहे. जैनांत वर्णभेद नसला तरी राम राजपुत्रच आहे. शिवाय चरित्रनायक तोच असल्यामुळें युद्धधर्म हा क्रमप्राप्तच आहे. परंतु

शक्य तितकी कमी हत्या व्हावी, किंबहुना हत्या दोषप्रदच आहे म्हणून रावण-वधादि महत्त्वाचीं कार्यें लक्ष्मणाकडे दिलीं आहेत. यामुळें नायक या संज्ञेची महती जैन चरितांत कांहींच राहिली नाहीं असें दिसून येईल.

रामायणाविषयीं प्रचलित समजुती नाहींशा करण्याचा प्रयत्न करण्यांत कवीचें कौशल्य आहे. केवळ श्रद्धेनें रामचरित विश्वसनीय आहे असें नसून त्यांतील प्रत्येक प्रसंग मानवी कल्पनेस धरून घडलेला आहे व त्यांत दैवी अद्‌भुत म्हणून अविश्वसनीय असें कांहीं नाहीं, असें जैन कवींचें म्हणणें आहे. याकरितां त्यांनीं रावणास व राक्षसांना मानव म्हटलें आहे. वानर हे सुद्धां मानवच होते. राक्षसांना राक्षसद्वीपावर राहावें लागलें म्हणून त्यांना ‘ राक्षस ’ संज्ञा प्राप्त झाली; तसेंच वानर हें नांव त्या संघाच्या प्रमुख चिन्हांवरून पडलें; रावणाला दशमुख फक्त लक्षणेनें म्हटलें जातें; या व एतत्सदृश कल्पना कोणत्या हेतूनें जैन ग्रंथांत आल्या हें स्पष्टच आहे. यावरून जैनांनीं प्रथम वास्तववादाची कास धरिली व रामायणादि कथांस सत्यसृष्टींत पूर्णत्वानें आणलें हें कबूल करावें लागतें. पुढें हिंदू ग्रंथांत या कल्पना आल्या, परंतु त्यांचा उगम जैन वाङ्मयांत आहे. पुराणग्रंथ झाले तरी व्यवहारांत घडणाऱ्या प्रसंगाशीं विसंगत अशा गोष्टी प्रतिपादण्यांत मानवी बुद्धीची व श्रद्धेची कसोटीच पाहाण्यासारखी आहे !

पण याबरोबर मूळ रामायणाच्या निसर्गरमणीय रूपांत बदल होऊन रूप थोडेफार विकृत झालें हा तोटा विसरून चालावयाचें नाहीं. मूळच्या सुंदर रूपाला अलंकार अधिकच शोभा आणतात हें खरें, पण त्यांतील काहीं अलंकार संज्ञेस पात्र आहेत कीं नाहीं हें ठरविलें पाहिजेच. या दृष्टीनें पहातां जैन रामायणांत बरेच दोष आले असून वाल्मिकीच्या कथेची खराबी खूप झाली आहे. कांहीं उदाहरणें घेऊन ही गोष्ट स्पष्ट करूं. रामायणांत अत्यंत हृदयस्पर्शी भाग म्हणजे दशरथाच्या शब्दाला मान देऊन रामानें केलेला अपूर्व स्वार्थत्याग. कैकेयीला मंथरेने चिथावणी दिली व तिनें क्रूरपणानें वर मागून घेऊन भरतास राज्य मिळावें अशी व्यवस्था केली. याचाच परिणाम दशरथाच्या मृत्यूंत झाला. परंतु जैन रामायणांत हा हृदयंगम कथाभाग पार गाळला आहे ! दशरथ स्वखुषीनें कैकेयीचें म्हणणें मान्य करतो; रामही वनांत जातांना भरताला राज्यावर बसवून मग बाहेर पडतो. यामुळें कैकेयीच्या वरांचें कांहींच स्वारस्य रहात नाहीं. कैके-

यीचें म्हणणे राम वनांत जावा असें मुळींच नाहीं. मग रामाला वनांत जाण्याचें कारणच उरत नाहीं! या फरकामुळें सर्व पात्रांचें स्वभावदर्शनही बिघडून गेलें आहे. वाल्मिकीचा भरत उदार अंतःकरणाचा आहे. तो रामाचा भाऊ पूर्णपणें शोभतो. पण 'पउमचरियां'त रामाचें लग्न झालेलें पाहून त्याच्या मनांत द्वेष व ईर्षा उत्पन्न झाली असें म्हटलें आहे! लक्ष्मणानें वनवासांत स्वतःचे अनेक विवाह केलेले दाखविण्यांत कवीनें काय साधले आहे? ब्रह्मचारी मारुती येथें दार-परिग्रह करून कौटुंबिक सुखांत मग्न झाला आहे. यामध्यें जैन कवीला वास्तव-दर्शनाची आकांक्षा किती त्रास देत आहे, हें दिसतें! खुद्द रामाचा स्वभावपरि-पोषही नीट साधलेला नाहीं. अरण्यांत एकदां त्यानें नर्तकीचा वेश घेऊन भरताच्या शत्रूला जिंकल्याचें वर्णन आहे. कवीचीं ही भरारी तर मति कुंठित करतें! रावणासारखा खलपुरुष जैन कथेंत बराच धार्मिक असून त्यानें व्रतें घेतलीं आहे. अशा माणसानें सीतेला पळवावी ही अंतर्गत विसंगती विमल-सुरीच्या ध्यानांत न यावी हें आश्चर्यकारक आहे. शिवाय अशोकवनांत तो तिला निरनिराळ्या मार्गानें भेवडावितो व मंदोदरीमार्फत सीतेचें मन वळविण्याचा प्रयत्न करतो. येथें मंदोदरी शक्तीच्या जोरावर सीतेला वश करण्याचा उपाय रावणाला सुचविते, हें तर अतिशय अनुचित आहे, वालिवधाऐवजी तोतया सुग्रीवाचें कथानक आणण्यांत व वाचकांच्या श्रद्धेवर भिस्त ठेवण्यांत कवीनें चूकच केली आहे.

याप्रमाणें ठळक दोष जैन स्वरूपांतरांत आले आहेत. व ही गोष्ट अपरि-हार्य होती. वाल्मीकीच्या स्वाभाविक कथानकांत ढवळाढवळ करण्यास जागाच नाहीं. पण तशी ती न केली तर स्वतःचें वैशिष्ट्य राहात नाहीं. त्याकरितां जैन लेखकाचे प्रयत्न आहेत.

पात्रांचीं नांवें बहुतेक बदलली असलीं तरी ती गोष्ट विचारांत घेण्याचें कारण नाहीं.

ग्रंथाचा विस्तार, त्यांतील उपकथा, वंशवर्णनें, जन्मांतरवर्णनें, धर्मतत्वांचीं प्रवचनें यायोगें झाला आहे. सारांश वाल्मीकिरामायणाचा सांगाडा कायम ठेवून जैनांनीं बाहेरून झिलई दिली आहे. त्यामध्यें त्यांचे डोळ्यापुढें एकच ध्येय होतें.

तें म्हणजे आपल्या धर्माच्या चौकटींत हें सुंदरसें चित्र बसवावें. त्यांच्या मतें ती चौकट व्यवस्थित आहे. मग इतरधर्मीयांस ती कितीही, बोजड, विरूप किंवा खिळाखिळी वाटो. मूळ रामायण व त्याची जैन प्रतिकृति यांची तुलना केल्यास सादृश्यस्थलें व भेददर्शन कितपत आहे,एवढ्याच हेतूनें हा लेख लिहिला आहे. तो कितपत सिद्धीस गेला आहे तें वाचकांनीं ठरवावें.

# १३ : : रंगदास चांभार

( श्री. विष्णु गणेश भिडे )

कचोपंतांचा चंद्रराव किंवा लहानगा चंदू गांवांत कांहीं कमी हिंडत नसे. आसपासच्या पोरांसमवेत तो खेळे. आई कोणाच्या घरीं बसायला म्हणून अगर कोठें देवाला म्हणून गेली, तर चंदू तिच्याबरोबर हटकून जाई. कचोपंत, बाजारच्या दिवशीं अथवा दुकानांत कांहीं खरेदी करण्याकरितां पेठेंत गेले, तर चंदूला घेऊन जात असत.

चंदूच्या पुष्कळांशीं ओळखी होत्या. बरोबरीच्या मुलांशीं तो नित्य खेळतही असे. पण हे सवंगडी ब्राह्मणगल्ली, फार फार तर मराठा आळी, यांपलीकडे नव्हते. महार अगर चांभारवाड्यांतील मुलांशीं चंदूचा किंवा त्याच्या सोबत्यांचा कधींच संबंध येत नसे. शाळेंतदेखील तीं बिचारीं इतर मुलांपासून अलग बसत. त्यांचा कोणाला कसलाच संपर्क पोहोंचत नव्हता.

म्हणूनच चंदूचा व रंगदासाचा केव्हांही परिचय होण्याचा योग ते उभयतां मराठी शाळेंत असतांना आला नाहीं.

पुढें इंग्रजी शिकण्यासाठीं चंदू शहरगांवीं बोर्डिंगांत राहिला. पहिल्याच वर्षी सुटींत प्रश्नपूरला येतांना त्यानें एक पतंग बरोबर आणला होता.

शहरांत तो वावडी उडविण्यांत पटाईत झाला होता. कित्येकांच्याहून त्याचा पतंग उंच जात असे.

आतां त्यानें मुद्दाम बरोबर आणलेल्या पतंगावर त्याचें विशेष प्रेम होतें. कारण या पतंगाला लावलेल्या मांजानें त्यानें दुसऱ्या कित्येकांच्या वावड्या भर-कटत लावल्या होत्या.

प्रश्नपुरांत आल्यावर पाहिल्याच दिवशीं त्यानें एक उंच पतंग आकाशांत विहरतांना पाहिला. लागलीच चंदूला स्फुरण येऊन त्यानें आपली वावडी उड-विली. दोनही पतंगांची टक्कर झाली, मांजाला मांजा बराच घांसला गेला. सरतेशेवटीं चंदूची वावडी तुटून कोठें पडली. प्रतिस्पर्ध्याची वावडी जोरानें उडतच होती.

चंदूला कोणी आपला पतंग कापला हें पाहण्याची उत्कंठा झाली, तेवढ्या-साठीं त्यानें सबंध प्रश्नपूर धुंडलें. फिरतां फिरतां तो चांभारवाड्यांत आला. तेथें एक त्याच्याचएवढ्या वयाचा मुलगा पतंग उडवीत होता

त्याची ओळख करून घेण्याची चंदूला इच्छा झाली. त्यानें त्या मुलाला विचारलें ' तुझें नांव काय ? '

' रंगदास ' तो मुलगा उत्तरला.

मग रंगदासानें जरा वेळानें प्रश्न टाकला. ' तुला काय म्हणतात ? '

' चन्दू '

नंतर रंगदासाला चंदूनें आपलें घर पहावयाला म्हणून नेलें. दोनही मुलें वागडत, गळ्यांत गळे घालून गेलीं.

पण चन्दू रंगदासाला घेऊन माजघरापर्यंत गेला न गेला तोंच काकोपंत कडाडले, ' चन्द्या, सोड त्याला आधीं ! '

अन् मग ते रंगदासाच्या अंगावर वसकन धावून जात म्हणाले, 'काय रे चांभारड्या, नीघ इथून; याद राख पुन्हा चन्दूबरोबर दिसलास तर, कंबरडें मोडीन बघ ! '

मुलें एकमेकांपासून बाजूला झालीं. रंगदास दुसऱ्याच क्षणीं मागें पाहतां सोसाट्यानें पळून गेला.

आणि याच वेळीं रंगदासाला प्रथमच विटाळचंडाळाची समजणूक झाली

*　　　*　　　*

प्रश्नपूर हें एक छोटेंसें खेडेगांव होतें. वस्ति कांहीं फार नव्हती, पंधराशें-दोन हजार इतका उंबरा असेल अधिकांत अधिक. असल्या खेड्याकडे वास्तविक कोणी शहरवासी चुकून सुद्धां डोळा वळवायचा नाहीं; तसाच कोणाचा विशेष नातेसंबंध असला तर कोर्ट-कचेऱ्यांच्या अगर कॉलेजच्या सुटीच्या दिवसांत कोणी यायचा व 'करमत नाहीं बुवा' 'कसा वेळ घालवावा तेंच समजत नाहीं,' इत्यादि वाक्यें उच्चारीत चार-दोन दिवसांत पुन्हा माघारी फिरायचा !

परंतु सुदैवानें प्रश्नपूरची स्थिति अशी नव्हती. त्याच्याजवळ एक सुंदर तलाव होता. मोठें गाजलेलें ठिकाण होतें तें ! लांब-जवळची किती तरी मंडळी तलाव पाहण्यास मुद्दाम सवड काढून येत. अशांना प्रश्नपूर हेंच उतरण्यास सोईस्कर गांव असे. तेथेंच धर्मशाळेंत किंवा दुसरी कोठें तरी ओळख काढून ही मंडळी मुक्काम ठेवीत, एखादा वाटाड्या मिळवीत, अडीच-तीन मैल पायीं अथवा बैलगाडींतून तलाव पाहण्यास जात व तलाव आणि त्याभोंवतालचें लावण्य पाहून धन्यवाद गात गात पुन्हा परत फिरत.

ही गोष्ट येथें मुद्दाम सांगितली पाहिजे कीं, चांभार अगर महारसमाजांत, या हौशी व रसिकांच्या येरझाऱ्यांची कोणालाच विशेष थांग नव्हती. पोटासाठीं अखंड खस्ता खाणाऱ्या गात्रांना आनंदासाठीं सृष्टिसौंदर्याची आठवण कोठून होणार ?

नाहीं म्हणायला सरकारी अंमलदार कधीं आले, तर गांवचा निरोप्या जो महार त्याला वाटाड्या म्हणून त्यांच्याबरोबर जावें लागे.

×　　　×　　　×

रंगदास आतां त्याच्या कुटुंबांतील कर्ता पुरुष झाला होता. खालच्या वर्गांतील एक झोंपडी म्हणजे एकखांबी तंबू कधींच नसतो. चारी दिशांच्या

असंख्य तणाव्यांनीं त्या तंबूची उभारत झालेली असते. त्या दृष्टीनें रंगदासाचे धाकटे दोन भाऊ व म्हातारे आई-वडील हेही दिवसभर कष्टत होते. चांभारीच्या धंद्यांत वाकबगार असून सुद्धां रंगदास कधीं फार पैसे मिळवूं शकला नाहीं. त्याला दुधाच्या व्यवस्थेकरितां घरीं एक शेळी ठेवावी लागली; इतर मिळकत थोडीफार व्हावी, म्हणून त्यानें कांहीं कोंबडयाही बाळगल्या; एवढेंच नव्हे तर एकाचें वावरही तो खंडानें करीत असे.

इतके जरी होते, तरी चांभारी हा रंगदासाचा मुख्य धंदा होता. त्याकरितांच तो रात्रंदिवस झटे. वहाणा व जोडे आसपासच्या गांवीं बाजारच्या दिवसांत विकायला नेणें, शेतकऱ्यांना नवीन मोटा करून देणें, त्यांच्या जुन्या मोटांची दुरुस्ती करणें, बैलांचे चाबूक करून विकणें या त्याच्या धंद्यांतल्या असंख्य लहानसहान बाबी होत्या. आपला माल खपावा म्हणून तो फार श्रम घेई. धंद्यांतल्या प्रवीणतेखेरीज आणखी एक रंगदासाचें वैशिष्ट्य होतें. तें म्हणजे नेहमीं नवीन गोष्टी ग्रहण करण्याचे. कोणतीही बाब, मग ती कितीही अलीकडची असेना, त्याला ती चटकन् आकलन होत असे. त्यानें शहर कधीं पाहिलें नव्हतें, पण शहरांतलीं जीं जीं म्हणून पादत्राणें त्याच्या नजरेखालीं आलीं होती, तीं तीं करून पाहण्याचा त्यानें यशस्वी प्रयत्न केला. रंगदासाशिवाय दुसऱ्या कोणच्याही चांभाराला अजून हें कसब साधलें नव्हतें.

पण आपल्या इतक्या रावणुकीला किंमत येत नाहीं, चरितार्थासाठीं आपणाला इतर उद्योग करावे लागतात, याचा रंगदासाला अत्यंत उद्वेग वाटे. या खेदाच्या भरांतच आईनें किंवा बापानें कधीं त्याच्या लग्नाची गोष्ट काढली, तर रंगदास ती गोष्ट धुडकावून लावी. एकदां तो म्हणाला होता,

"लग्नानंतर एक मनुष्य आपल्या कष्टांतला वांटा उचलायला येईल हें खरें; पण मेहनतीच्या भावाला पैसा कोठें विचारतो आहे? आपण चांभार, कातडीं उलथींपालथीं करणारे; म्हणून गांवांतले लोक आपल्याला दृष्टीसमोरही वागवायला तयार नाहींत; कांहींजण आपली सांवली पडली, तर विटाळानें न्हाऊन निघाल्यासारखे समजतात, याचे मला परवापर्यंत फार दुःख होत असे; पण आतां धंद्याची गोडी लागली. चांभारकी हें एक कसब आहे असें वाटूं लागलें व मी गांवांतल्या

लोकांच्या विटाळ-चंडाळाची खिसगणती करीनासा झालों, आपण चांभार आहोत याचा अभिमान धरूं लागलों, परंतु बायकोला व पुढें वाढणाऱ्या मुलां-लेकरांच्या पसाऱ्याला पोसण्याइतका हा धंदा कमाईचा नाहीं, ही गोष्ट मनाला कशी बोचून राहिली आहे ! जेथें आहे या माणसांचीच उपासमार व्हायची पाळी, तिथें मुद्दाम लग्न करून मनुष्य वाढवण्यांत कोणता मतलब ?"

आणि अशाच खिन्न मनानें त्याचे दिवस चालले होते.

एक दिवस सकाळचा, जवळ एका गांवीं जत्रा होती तिला जाण्याच्या तो गडबडींत होता. कातड्याचीं बऱ्याच प्रकारचीं पायतणें त्यानें बरोबर नेण्यासाठीं बांधून घेतलीं होतीं. याच वेळीं त्याला बाहेरून त्याच्या नांवाची हांक ऐकूं आल्यामुळें तो दाराशीं आला.

'कोण कचोपंत ?'

कचोपंत आपल्या दारापर्यंत आलेले पाहून रंगदासाला फार आश्चर्य वाटलें. आजपर्यंत जोडे घेण्याकरितां अगर केव्हां केव्हां मोट शिवण्याकरितां बाजारच्या दिवशीं क्वचित् त्यांचा व रंगदासाचा संबंध येत असे. लहानपणापासून कचोपंत किंवा त्यांचा मुलगा चंद्रराव यांपैकीं कोणाशींही त्याचें धंद्यापलीकडे फारसें बोलणेंचालणें कधीं झालें नव्हते.

'होय, रंगदास. मी तुझ्या भावाला बोलावण्यासाठीं आलों आहे. आमच्याकडे आलेल्या बड्या पाहुण्यांना तलाव पाहण्यासाठीं जायचें आहे. बरोबर वाटाड्या हवा. गांवचीं सगळीं मराठ्यांचीं पोरें जत्रेला गेलीं आहेत. मीही जत्रेला जाईन म्हणतों. चांभारवाड्यांत कोणी आमच्या जत्रेला येत नाहीं, म्हणून तुमच्याकडे आलों.'

'पण दोघेहि घरांत नाहींत. एक शेळीला चारायला घेऊन गेला आहे. व एक शेतावर गेला आहे.'

'मग तूं जातोस का ? नाही तर मलाच जायला पाहिजे.'

'पण मला माल घेऊन जत्रेला जायचें आहे.'

'अरे, पण तेथें तुझी कितीशी विक्री होणार !

पाहुण्यांच्या कामाला आलास, तर तिच्या दुप्पट बिदागी मिळेल.'

'ठीक आहे. तुम्ही व्हा पुढें. मी आलोंच.' रंगदास किंचित् कालानें बोलला.

कचोपंताकडे जे पाहुणे आले, ते अनपेक्षितच. दुसऱ्या दिवशीं जत्रेला जायचे विचार कचोपंत मनांत घोळवीत असतांना, कचोपंतांची चौकशी करीत संध्याकाळच्या वेळीं एक इसम आले. कचोपंतांचे एक लहानपणचे स्नेही हैद्राबादेला होते. पाहुण्यांनीं त्यांचेच चिठी बरोबर आणली होती. आलेल्या गृहस्थांच्या पोषाखावरून, हमालाच्या हातांत जी ऐटबाज बॅग होती त्यावरून, प्रथमदर्शनींच पाहुण्यांच्या श्रीमंतपणाविषयीं कचोपंतांनीं केलेला तर्क त्यांच्या मित्राच्या चिठीनें अक्षरशः खरा ठरला.

मार्तंडराव हे हैद्राबादच्या जवळच असलेल्या एका सोन्याच्या खाणीची मालक अशी जी एक इंग्लिश.कंपनी होती, तिच्या पदरीं असलेले एक बडे इंजीनियर होते. त्यांना प्रवासाची हौस होती व कचोपंतांच्या स्नेह्यांशीं सहज झालेल्या बोलाचालीवरून तलाव पाहण्याची संधि साधण्याची शक्यता त्यांना दिसली. आणि त्याप्रमाणें मुद्दाम रजा काढून ते आले होते.

मनामिळाऊपणा हा एक मार्तंडरावांचा स्वभावविशेष होता. समाजाच्या कोठल्याही थरांत ते सहज मिसळत.

अर्थात् कचोपंतांना लौकरच त्यांनीं आपलेसे करून टाकले. पांचशें रुपये दरमहा मिळवणाऱ्या पगारदाराशी शेतीवर जेमतेम गुजराण करणाऱ्या आपल्यासारख्यानें कसें वागावें ही अडचण कचोपंतांना मुळींच जाणवली नाहीं.

मार्तंडरावांनीं त्यांच्या कुटुंबाची हकीकत विचारली, तेव्हां कचोपंत म्हणाले, 'सध्यां प्रपंचाचा बिनीचा आधार म्हणजे माझा मुलगा चंद्रराव. यंदा तो बी. ए ला बसणार आहे. पोटाला चिमटा घेऊन त्याला शिकवला. मी शेतीवर जगणारा मनुष्य. वास्तविक ऐपतीची लांबीरुंदी न बघतां त्याला महिन्याच्या महिन्याला पैसे पाठवतों आहे. बी. ए. झाल्यावर कोठें नोकरी लागली म्हणजे खर्च झालेल्या पैशाचीं पारणीं फिटतील.'

‘ अहो, पण नोकरी लागेल तेव्हां ना ? ’ मार्तंडराव बोलले ‘ जिकडे तिकडे कपात चालू आहे. बी. ए. झालेले सुशिक्षित हमाली करूं लागले आहेत. एक सुशिक्षित म्हणे चांभार... !’

‘शिक्षणाची निव्वळ विटंबना आहे ही !’ कचोपंत रागानें म्हणाले, ‘हमाली-सारखें हलके धंदे शूद्रांनीं करावेत, ज्यांची सावली देखील आपल्याला वर्ज, असल्यांचे उद्योग आपण करायचे, पोरें एक चळलीं आहेत; पण त्यांचे आई-बाप कसे त्यांना वाटेल तसे वागूं देतात. अचंब्याची गोष्ट आहे मोठी ! !’

मार्तंडरावांना कांहीं बोलावेसें वाटलें. पण कचोपंतांचा एकंदर कल पाहतां आपलें सांगणें त्यांना रुचणार नाहीं, हें समजून त्या विषयापुरता त्यांनीं आपल्या जिभेला लगाम घातला व विषय बदलून ते म्हणाले,

“ कचोपंत, उद्यां आपल्याला एक वाटाड्या पाहा बरं का ? तलाव दोन तीन मैल आहे, तर चालतच जाईन म्हणतों. ”

दुसऱ्या दिवशीं प्रश्नपुराजवळच्या गांवीं जत्रा असल्यामुळें कचोपंतांना वाटाड्या मिळण्याबाबत थोडी चिंता पडली होती, पण ती अखेरी दूर झाली.

००० ००० ०००

रंगदासाचा उमदा स्वभाव मार्तंडरावांना फार आवडला. उलट रंगदासालाही मार्तंडरावांची आपल्याशीं असलेली मनमोकळी वागणूक पाहून आपला अत्यंत गौरव झाला असें वाटलें. त्यानें आपल्या हृदयांत कोणती कुसळे सलत आहेत तीं मार्तंडरावांना अदबीनें पण आडपडदा न ठेवतां सांगितलीं.

तलाव व त्या भोंवतालची सृष्टिशोभा रसिक मनानें अवलोकतांना मार्तंडराव आपल्या वाटाड्याचीहि उपेक्षा करीत नव्हते. ते रंगदासाला म्हणाले--

‘ एकंदरींत तूं मोठा महत्त्वाकांक्षी मनुष्य दिसतोस. तुझ्यासारख्यांना आजकाल शहरांत भरपूर वाव आहे. आमच्या हैद्राबादेंत जर एखादें दुकान उघडून धंदा चालवलास व कौशल्य दाखवलेंस तर मोठ्या नांवारूपाला पोंचशील.’

आणि रंगदास परत येतांना मार्तंडरावांचे हेंच विचार मनांत उलथेपालथे करीत होता. प्रश्नपूरला आल्यावर बूट फाटण्याच्या बेताला आला म्हणून असो,

अथवा रंगदासाला मदत करण्याच्या बुद्धीनें असो, मार्तंडरावांनीं त्याला एक बुटाचा जोड तावडतोब करण्यास सांगितला व नमुन्याला आपल्याजवळचें बूटहि दिलें.

रंगदासानें फक्कड काम केलेलें पाहून मार्तंडराव खूष झाले आणि त्याच्या हातावर पांच रुपयांची एक नोट ठेवून म्हणाले, 'रंगदास, येच तूं आमच्या हैद्राबादेला. खरोखरच मोठा कुशल कलावंत आहेस. तुझ्या व्यापारावर तुझें एकट्याचें नुसतें पोटच तूं भरशील असें नव्हे, तर तूं मोठा श्रीमंतहि होशील.'

दुपारच्या वेळीं मार्तंडराव जायला निघाले, तेव्हां कचोपंत परत आलेले होते. त्यांनीं ज्या वेळीं मार्तंडरावांची रंगदासाबद्दलची स्तुति ऐकली, तशी ते बोलले:

'उं, किती झालें तरी चांभार तो चांभार व ब्राह्मण तो ब्राह्मण. अंगणाबाहेर उभें करण्याची रंगदासाची योग्यता; तो काम कसोटीनें करतो यांत वाद नाहीं. पण तुम्हीहि त्याला पांच रुपये दिलेतच ना! मग गरज काय त्याला एवढ्या इंद्रपदावर चढवण्याची! मी म्हणतों त्यानें तुम्हाला फसवलें, लुबाडलें. मी त्यांपैकीं चार रुपये तुम्हाला परत देववतों...'

मार्तंडरावांनीं कचोपंतांना तसें कांहीं करूं दिलें नाहीं. त्यांच्या अंतःकरणांतून कचोपंतांना कांहीं सांगायचें होतें; पण पहिल्याप्रमाणें या वेळींहि मोठ्या मिनतवारीनें त्यांनीं आपली ऊर्मि आवरली.

मार्तंडराव गेल्यावर थोड्याच दिवसांत रंगदासानें त्याच्याहून दोन वर्षांनीं लहान असलेल्या पाठच्या भावावर प्रपंचाची मदार टाकून प्रश्नपूर सोडलें.

चंद्रराव बी. ए. होऊन सहा महिने झाले. अनेक कचेऱ्यांत त्यानें सफरी केल्या; पण त्यांपैकीं एकहि फलद्रूप झाली नाहीं. प्रत्येक ठिकाणाहून निराश मनानें परत आलेला चंद्रराव, कचोपंतांचे 'उगीच शिकण्यांत पैशांचा खराबा केला' 'कार्ट्याचें नशीबच धड नाहीं' असलें उद्गार ऐकले कीं अधिकच निराश होई.

एक दिवस कचोपंतांना मार्तंडरावांची—अर्धा एक दिवस आपल्या घरीं राहून गेलेल्या पाहुण्यांची—आचनक आठवण झाली. त्यांच्या वशिल्यानें कोठें-नोकरी लागली तर पाहावी म्हणून मार्तंडरावाकडे चंद्ररावाला एका पत्रानिशीं त्यांनीं रवाना केलें.

चंद्ररावाला उतरण्यासाठीं कचोपंतांनीं आपल्या मित्राचा पत्ता दिला होता.

चंद्ररावाला जाऊन चार महिने झाले, पण त्याचें कांहींच पत्र आलें नाहीं. कचोपंतांना व त्यांच्या घरांतील मंडळींना वाटलें, मुलगा कामाधंद्याला लागला, त्यास कागदाची चकतीहि लिहायला फुरसत नाहीं. कचोपंतांनीं आपल्या स्नेह्याला एक-दोन पत्रें टाकून पाहिलीं; पण त्यांचींहि उत्तरें आलीं नाहींत. कचोपंतांना स्वतः इतकें भाडें खर्च करून हैद्राबादेस जाणें वाजवी वाटलें नाहीं.

परंतु ही त्यांची पत्राविषयींची आवश्यकता फार ताणली गेली नाहीं. एक दिवस मनीं-मानसीं नसतां हैद्राबादेहून नुकताच आलेला रंगदासांचा धाकटा भाऊ कचोपंतांच्याकडे आला व त्यांना उत्सुकतेनें कांहीं सांगूं लागला. पण त्याच्या पहिल्याच वाक्यानें कचोपंत कोमेजून गेले व प्रत्येक शब्दागणिक त्यांची अस्वस्थता वाढतच होती.

कचोपंत व त्यांची बायको यांना क्षणापूर्वींच कळलेल्या बातमीनें विजेचा धक्का बसला.

कचोपंत हैद्राबादेस जाण्याच्या तयारीला बावरल्या चित्तानें लागले.

सुदैवानें म्हणा किंवा दुर्दैवानें म्हणा, कचोपंतांना कळलेला मजकूर खरा ठरला. चंद्ररावानें चांभाराचा पेशा पत्करला होता व तसे करतांना कचोपंतांच्या जुन्या मित्राचा सल्ला धुडकावून लावला आणि रंगदासाच्या हाताखालीं दोन महिने शिकून त्यानें आतां बूट, वहाणा इत्यादि कातडी मालाचें स्वतंत्र दुकान थाटलें होतें.

कचोपंतांच्या स्नेह्याला पहिल्यानें वाटलें, बापाच्या संमतीनेंच चंद्ररावानें या गोष्टी केल्या. शिवाय त्याची मसलत चंद्ररावानें उधळून लावल्यामुळें तो

१.गांतच होता व म्हणून त्यानें कचोपंतांच्या दोन्ही पत्रांना उत्तरें देणें हेतुपूर्वक टाळलें. चंद्ररावाला आग्रण करतों हें कचोपंतांना आवडणार नाहीं अशी खात्री असल्यामुळें तोही मुखस्तंभच राहिला.

चांभाराच्या धंद्यापासून चंद्ररावाला परावृत्त करण्याचें सर्व इलाज व्यर्थ ठरल्यावर कचोपंत मार्तंडरावांना भेटण्यास गेले व घडलेली हकीकत त्यांना सांगू लागले.

'मला माहीत आहे सारें कांहीं' मार्तंडराव मध्येंच त्यांना थांबवून म्हणाले. 'चंद्रराव माझ्याकडे तुमची चिठी घेऊन आला होता. पण मी तरी काय करूं? आमच्या कंपनींत सध्यां असलेल्या नोकरांचीच नोकरी टिकवितां टिकवतां त्रेधा तिरपिट उडत आहे, तेथें नवख्यांना कोण पुसतो? चंद्रराव आधीं रंगदासाला भेटला असावा; कारण माझा नकार दिसतांच चांभाराचें दुकान घालण्याची त्यानें आपली तयारी मजजवळ दर्शविली. मी कांहींच बोललों नाहीं त्या वेळीं. पण एकंदरींत झालें हें ठीक झालें असें मला वाटतें. दिवसेंदिवस पोटापाण्याचा प्रश्न मोठा बिकट होत चालला आहे. लाज वगैरे सोडून ज्यानें-त्यानें आपली भाकरी मिळविण्याचा सुचेल तो मार्ग शोधून काढावा. विशेषतः कलेवर भर द्यावा. आजकाल रंगदासासारख्या कलावंतांची-मग ते हलके असोत किंवा मोठे असोत-अधिक जरूर आहे आपल्याला. कसबामुळें पैशाची कुचंबणा त्यांना केव्हां भासायची नाहीं. स्वतंत्र रीतीनें ते आपला मार्ग काढतात. नोकरीचें जिणें परावलंबी आणि परधार्जिणी, म्हणूनच रंगदासासारख्यांना मी मान देतो.'

कचोपंत दिङ्मूढ झाले होते. त्यांना काय उत्तर द्यावें हेंच सुचेना!

४९८८

# १४ : : : पहिली चूक !

(श्री. शामकांत लक्ष्मण वर्वे)

पुण्याला जाण्यासाठीं म्हणून मी आणि मधुकर नागपूर स्टेशनवर उभ्या असलेल्या व बहुतेक रिकाम्या असलेल्या गाडींत येऊन बसलों. मधुकराचे वडील कृष्णराव आणि मधुकरची धाकटी बहीण उषा आम्हांला स्टेशनवर पोंचवायला आली होती. स्टेशनवर येऊन आम्हांला एक तास झाला तरी गाडी सुटण्याचें चिन्ह दिसेना. शेवटीं कंटाळा आला. पण उतारूंना कंटाळा आला म्हणून बरोबर साडेनऊला सुटणारी गाडी नऊला सुटणार होती थोडीच ! डब्यांत बसल्यामुळें जेव्हां भयंकर उकडायला लागलं —तेव्हां कांहीं तरी थंडगार ड्रिंक तरी घ्यावं असं ठरवून आम्ही स्टॉलवर जाऊन गार लेमन प्यायचं ठरवलं. थोड्या वेळानें गार्डानं शिटी देतांच गाडी हळू हळू स्टेशन सोडून जाऊं लागली. कृष्णरावांची पाठ गाडीकडे वळतांच उषेनें– 'प्रकृतीची काळजी घ्यावी हं' असें उच्चारलेलें शब्द मला ऐकूं आले. मीही जरासें हंसून म्हणालो 'तूंही मात्र तेवढीच काळजी घे हं-'

इतक्यांत मधुकर खवचटपणानें म्हणाला– 'सुहास, तुझ्या प्रकृतीची तेवढी काळजी आहे आमच्या ताईला– आम्ही काय– ?'

REFBK-0005978